# माझी जीवनकथा

मोहनदास करमचंद गांधी



शालेय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त आवृत्ती

# माझी जीवनकथा

**मोहनदास करमचंद गांधी**

संक्षिप्तकार

**भारतन कुमारप्पा**

पहिली आवृत्ति, ऑगस्ट २००८

ISBN 978-81-7229-373-4

मुद्रक व प्रकाशक

विवेक जितेंद्र देसाई

**नवजीवन मुद्रणालय**, अहमदाबाद-३८० ०१४

फोन ; ०७९ - २७५४०६३५, २७०४२६३४

E-mail : sales@navajivantrust.org

Website : www.navajivantrust.org

# प्रस्तावना

आत्मकथा किंवा जीवनवृत्तांत लिहिणे, हा माझा उद्देश नाही. मला आत्मकथेच्या नावाखाली सत्याचे मी जे अनेक प्रयोग केले, त्यांची हकिकत लिहावयाची आहे. त्या प्रयोगांमध्ये माझे जीवन गुरफटलेले असल्यामुळे ती हकिकत एखाद्या जीवनवृत्तांताप्रमाणे होऊन जाईल, ही गोष्ट खरी. राजकीय क्षेत्रातील माझे प्रयोग आता सर्वज्ञात झाले आहेत. पण माझे आध्यात्मिक प्रयोग, जे फक्त मीच जाणू शकेन आणि ज्यांतूनच माझी राजकीय क्षेत्रांतील शक्तीही उद्भवलेली आहे, त्या प्रयोगांचे वर्णन करायला मला आवडेल खरे. माझ्या प्रयोगांमध्ये तरी आध्यात्मिक म्हणजे नैतिक, धर्म म्हणजे नीती, आत्म्याच्या दृष्टीने पाळावयाची नीती, तो धर्म.

ज्या गोष्टींचा निर्णय बालक, तरुण व वृद्ध करतात व करू शकतात, अशा गोष्टींचाच समावेश या कथेमध्ये होईल. असली कथा जर मला तटस्थपणे, निराभिमानीवृत्तीने लिहिता आली, तर त्यापासून तसलेच प्रयोग करणाऱ्या इतर लोकांना थोडीबहुत सामग्री मिळू शकेल.

**मोहनदास करमचंद गांधी**

आश्रम, साबरमती

२६ नोव्हेंबर, १९२५

# संपादकांची नोंद

मूळ इंग्रजीत प्रकाशित झालेली 'गांधीजींचे जीवन-चरित्र'[१] आणि 'दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास'[२] ही दोन्ही पुस्तके जवळ जवळ १००० मुद्रित पृष्ठांची आहेत. १९५२ मध्ये नवजीवन ट्रस्टने या दोन पुस्तकांचे मिळून २८३ पानी संक्षिप्त[३] स्वरुप प्रकाशित केले. तरीही शालेय वापरासाठी अधिक संक्षिप्त आवृत्तीची मागणी झाली. या गरजेनुसार शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना फायदा व्हावा, यासाठी या आवृत्तीची रचना करण्यात आली.

जी प्रकरणे शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने फारशी महत्त्वाची नाहीत, ती गाळण्यात आली आहेत आणि शक्य तेथे भाषा सोपी करण्याचा प्रयत्न केला आहे. निबंध आणि चर्चेच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले प्रश्न पुस्तकात सर्वांत शेवटी दिले आहेत. उच्च आणि कनिष्ठ अशा दोन्ही वर्गांतील विद्यार्थ्यांसाठी ते उपयुक्त आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या क्षमतेनुसार योग्य प्रश्नांची निवड करावी. कठीण विषयांवर वर्गात चर्चा करून पुढील तासात विद्यार्थ्यांना त्या विषयावर निबंध लिहिण्यास सांगावे.

जुलै, १९५५ **भारतन कुमारप्पा**

---

१ नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद- ३८० ०१४, किंमत रू. २०, पॉप्युलर आवृत्ती.

२ नवजीवन पब्लिशिंग हाऊस, अहमदाबाद- ३८० ०१४, किंमत रू. १५

३ गांधीजींची आत्मकथा (संक्षिप्त), किंमत रू. १०/-

# प्रकाशकांची नोंद

या पुनरावृत्तीत सर्वात शेवटी निबंधासाठी आणि चर्चेसाठी विषय दिले आहेत.

ही आवृत्ती विशेषत: शालेय विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आली आहे. गांधीजींची वाढती लोकप्रियता लक्षात घेऊन तयार करण्यात आलेली ही आवृत्ती वाचकांसमोर ठेवताना आम्हाला आनंद होत आहे. काही स्वयंसेवी संस्थांद्वारे घेतल्या जाणाऱ्या सामान्य ज्ञानाच्या परीक्षांसाठी हे पुस्तक नेमण्यात आले आहे. त्यामुळे हे पुस्तक बऱ्याच मोठ्या वर्गाला फायदेशीर ठरेल, अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही.

मे, १९८४

# अनुक्रमणिका

प्रकरण
प्रस्तावना
संपादकांची नोंद
प्रकाशकांची नोंद
**खंड १: बालपण आणि उमेदीचा काळ**
१. जन्म आणि बालपण
२. हायस्कुलमध्ये
३. बालविवाह
४. दु:खद मैत्री
५. चोरी आणि प्रायश्चित्त
६. वडिलांचा आजार व मृत्यू
७. धर्मजागृती
८. विलायतेची तयारी
९. एकदाचं विलायत गाठलं !
**खंड २: लंडनमध्ये विद्यार्थी म्हणून**
१०. माझी पसंती
११. 'सभ्य' वेशात
१२. फेरफार
१३. लाजाळूपणा हीच माझी ढाल
१४. धार्मिक परिचय
**खंड ३: बॅरिस्टर म्हणून भारतात**
१५. भारतात परत
१६. पहिला अपघात
**खंड ४: दक्षिण आफ्रिकेत**
१७. दक्षिण आफ्रिकेत आगमन
१८. प्रिटोरियाला जाताना
१९. प्रिटोरियातील पहिला दिवस
२०. हिंदी लोकांची ओळखदेख
२१. दावा
२२. को जाने कल की
२३. तीन पौंडांचा कर
**खंड ५: हिंद भेट**
२४. हिंदुस्थानात
**खंड ६: दक्षिण आफ्रिकेत परत**
२५. दक्षिण आफ्रिकेत आगमन आणि तुफान
२६. साधी राहणी
२७. एक पुण्यस्मरण आणि प्रायश्चित्त
२८. बोअर युद्ध
२९. महागड्या भेटवस्तू
**खंड ७: स्वदेशी**
३०. महासभेमध्ये प्रथमच
३१. मुंबईत स्थिर झालो
**खंड ८: दक्षिण आफ्रिकेत**
३२. परत दक्षिण आफ्रिकेला
३३. गीतेचा अभ्यास
३४. एका पुस्तकाचा विलक्षण परिणाम
३५. फिनिक्सची स्थापना
३६. झुलू बंड
३७. पत्नीची दृढता
३८. घरात सत्याग्रह
३९. सत्याग्रहाचा जन्म
४०. कैद
४१. आघात
४२. सत्याग्रहाची पुनरावृत्ती
४३. सत्याग्रहाचा विजय
**खंड ९: स्वदेशी परत आणि आश्रमाची स्थापना**
४४. पुण्यामध्ये
४५. आश्रमाची स्थापना
**खंड १०: चंपारण्य**
४६. निळीचा डाग
४७. निळीचा डाग धुतला
**खंड ११: अहमदाबादचे मजूर**
४८. मजुरांशी संबंध
**खंड १२: खेडा सत्याग्रह**
४९. खेडामध्ये सत्याग्रह
५०. मृत्युशैय्या
**खंड १३: रौलॅट ॲक्ट आणि राजकारणात प्रवेश**
५१. रौलॅट ॲक्ट
**खंड १४: खादीचा जन्म**
५२. खादीचा जन्म
५३. पूर्णाहुती
निबंधासाठी विषय

# खंड १: बालपण आणि उमेदीचा काळ

## १. जन्म आणि बालपण

माझे वडील करमचंद गांधी पोरबंदरमध्ये दिवाण म्हणून काम करीत. ते कुटुंबप्रेमी, सत्यप्रिय, धीट, उदार, पण रागीट होते.

वडिलांनी द्रव्यसंचय करण्याचा लोभ कधीच धरला नाही, त्यामुळे आम्हा भावंडांसाठी ते थोडकीच मिळकत ठेवून गेले.

वडिलांचे शिक्षण केवळ अनुभवजन्य होते. ज्याला आपण आज गुजराथी पाचव्या इयत्तेचे शिक्षण म्हणू, तेवढे शिक्षण त्यांचे झाले असेल. इतिहास-भूगोलाचे ज्ञान तर विचारायलाच नको. असे असूनही व्यवहार-ज्ञान इतक्या उच्च दर्जाचे होते, की सूक्ष्मात सूक्ष्म प्रश्नाचा उलगडा करण्यात किंवा हजार माणसांवर नियंत्रण ठेवण्यात त्यांना अडचण वाटत नसे. धार्मिक शिक्षण नसल्याप्रमाणेच. परंतु देवळात जाण्याने, कथा वगैरे ऐकून जे धर्मज्ञान असंख्य हिंदूंना सहज मिळते, ते त्यांना होते.

आई साध्वी स्त्री होती, अशी माझ्या मनावर छाप राहिली आहे. ती फार भाविक होती. पूजाअर्चा केल्याशिवाय ती कधी जेवत नसे. हवेलीत* नित्यनेमाने जायची. मला समजू लागले तेव्हापासून तिने कधी चार्तुमासातील व्रतवैकल्ये चुकविलेली मला स्मरत नाही. ती कठिणात कठीण व्रत घेई आणि निर्विघ्नपणे पार पाडी. घेतलेली व्रते आजारी पडली, तरी सोडायची नाही. मला असा एक प्रसंग स्मरतो, की तिने चांद्रायण-व्रत केले. त्यामध्ये आजारी पडली. परंतु व्रत भंगू दिले नाही. चार्तुमासात एकभुक्त राहणे, यात तर तिला विशेषसे काही वाटतच नसे. एवढ्याने संतोष न मानता एका चार्तुमासात तर तिने एक दिवसाआड जेवण्याचा नियम केला होता. लागोपाठ दोन-तीन उपवास म्हणजे तर तिला काहीच वाटत नसे. एका चार्तुमासात तिचे असे व्रत होते, की सूर्यनारायणाचे दर्शन करून नंतरच जेवायचे. त्या पावसाळ्यात आम्ही मुले ढगांकडे डोळे लावून पाहत असू, की केव्हा सूर्य दिसतो आणि आई जेवते. पावसाळ्यात सूर्याचे दर्शन

पुष्कळ वेळा दुर्मिळ असते, हे सर्वांना माहीतच आहे. असेही दिवस स्मरतात, की ज्या दिवशी आम्ही सूर्य पहाताच, "आई, आई, सूर्य दिसला," असे ओरडावे आणि आई घाईघाईने येते, तों सूर्याने दडी मारावी. "त्याचे काय मोठे? आज नशिबात जेवायचे नसेल !" असे म्हणून ती परत वळे आणि स्वतःच्या कामात दंग होऊन जाई.

माझी आई व्यवहारकुशल होती. दरबारच्या सर्व गोष्टी तिला समजत.

या आईबापांच्या घरी मी संवत् १९२५ च्या भाद्रपद वद्य द्वादशीच्या दिवशी, म्हणजे सन १८६९ च्या ऑक्टोबरच्या २ तारखेला पोरबंदर म्हणजेच सुदामापुरी येथे जन्मलो.

---

* गुजराथेतील वैष्णवांच्या देवालयास 'हवेली' असे म्हणतात.

# २. हायस्कुलमध्ये

माझे बालपण पोरबंदरातच गेले. कोठल्याशा शाळेत मला घातले होते, असे आठवते. कसेबसे काही पाढे शिकलो. त्यावेळी मुलांबरोबर मी पंतोजींना शिव्या देण्यास शिकलो होतो, एवढी आठवण आहे; दुसरे काहीएक आठवत नाही.

पोरबंदरहून वडील राजस्थानी कोर्टात सभासद होऊन राजकोटला गेले, तेव्हा माझे वय सात-एक वर्षांचे असावे. मला राजकोटच्या गावठी शाळेत घातले. या शाळेतील दिवस मला चांगले आठवतात. पोरबंदरप्रमाणेच येथीलही अभ्यासासंबंधी सांगण्यासारखे विशेष काही नाही. गावठी शाळेतून मुख्य शाळेत व तेथून हायस्कुलात पोचेतो मी बारा वर्षांचा होऊन गेलो. तोपर्यंत मी कधीही शिक्षकांशी लबाडी केल्याचे किंवा कोणाशी मैत्री जोडल्याचे स्मरत नाही. मी अतिशय भिडस्त मुलगा होतो. शाळेत माझे काम बरे की मी बरा. घंटा वाजण्याच्या सुमारास पोचायचे आणि शाळा बंद होताक्षणी घरी पळायचे. 'पळायचे' हा शब्द जाणीवपूर्वक लिहिला आहे. कारण कोणाबरोबर बोलत राहणे मला आवडत नसे. 'कोणी माझी थट्टा केली तर', अशी भीतीही वाटे.

हायस्कुलातील पहिल्याच वर्षी परीक्षेच्या प्रसंगी घडलेली गोष्ट सांगण्यासारखी आहे. शाळाखात्याचे इन्स्पेक्टर जाइल्स शाळा तपासण्यास आले होते. त्यांनी पहिल्या इयत्तेच्या मुलांना पाच शब्द लिहायला घातले. त्यांत एक शब्द 'केटल्' होता. त्याची वर्णरचना मी चुकीची लिहिली. मास्तरांनी मला आपल्या बुटाचे टोक मारून इशारा दिला. परंतु माझ्या ते कोठून लक्षात येणार ? मास्तर मला जवळच्या विद्यार्थ्याच्या पाटीकडे पाहून माझी वर्णरचना सुधारण्यास सांगत असतील, अशी कल्पनाही मला शिवली नाही.

माझी समजूत की आम्ही एकमेकांचे चोरून पाहू नये, एवढ्यासाठीच मास्तर नजर ठेवीत आहेत. सर्व विद्यार्थ्यांचे पाचही शब्द बरोबर आले आणि मीच एकटा काय तो 'ढ’ ठरलो. माझा 'मूर्खपणा' मास्तरांनी मागाहून मला दाखवून दिला. परंतु माझ्या मनावर त्या सांगण्याचा काही परिणाम झाला नाही. मला दुसऱ्या विद्यार्थ्याची कॉपी कधीच करता आली नाही.

असे असूनही मास्तरांविषयीची माझी विनयवृत्ती कधीच ढळली नाही. वडील मंडळींचे दोष न पाहण्याचा गुण माझ्यामध्ये स्वभावत:च होता. त्याच मास्तरांचे इतर दोषही मागाहून माझ्या ध्यानात आले. तरीही त्यांच्याबद्दल मला वाटणारा आदर कायम राहिला. वडीलधाऱ्यांच्या आज्ञेचे पालन करायचे, एवढे मला माहीत होते. ते सांगतील ते करावे; त्यांच्या कृत्यांच्या गुणदोषांच्या निवाड्यात आपण पडू नये.

याच सुमारास दुसरे दोन प्रसंग घडले, ते कधीही माझ्या स्मरणातून गेलेले नाहीत. मला सामान्यपणे शाळेच्या पुस्तकांपलिकडे काहीही वाचण्याचा नाद नव्हता. धडे केले पाहिजेत; ओरडा सहन व्हायचा नाही, मास्तरांना फसवायचे नाही, म्हणून धडे वाचीत असे. परंतु मनातून कंटाळा. त्यामुळे धडे पुष्कळदा कच्चे राहत. मग इतर वाचन कोठून सुचणार ? परंतु वडिलांनी विकत आणलेले एक पुस्तक माझ्या नजरेत भरले. ते 'श्रावण-पितृभक्ती' नाटक. ते वाचण्याची मला इच्छा झाली. ते मी अतिशय आवडीने वाचले. त्याच सुमारास काचेतून चित्रे दाखविणारेही दारोदार हिंडत. त्यांच्याकडून श्रावण आपल्या आई-बापांना कावडीत बसवून यात्रा करण्यास घेऊन जात आहे, असे चित्र मी पाहिले. या दोन्ही गोष्टींचा माझ्या मनावर खूप परिणाम झाला. “मला पण श्रावणासारखे व्हावयाचे, असे मनात येई.”

याच सुमारास कोणी नाटकमंडळी आली होती. तिचे नाटक पाहण्याची परवानगी मिळाली. हरिश्चंद्राचे आख्यान होते. ते नाटक पाहण्याचा मला कंटाळा कसा तो वाटेच ना. ते पुन्हा पुन्हा पाहण्याची इच्छा होई. वारंवार पाहायला कोण जाऊ देणार ? परंतु मनातल्या मनात मी ते नाटक शेकडो वेळा रंगविले असेल. हरिश्चंद्राची स्वप्ने पडत. “सर्वांनीच हरिश्चंद्रासारखे सत्यवादी का होऊ नये?” हाच विचार घोळे. नाटकात वर्णिल्या होत्या, तशाच विपत्ती हरिश्चंद्रावर येऊन पडल्या असल्या पाहिजेत, असेच मी तरी समजत होतो. हरिश्चंद्राचे दु:ख पाहून, त्याचे स्मरण करून, मी खूप रडलो आहे.

हायस्कुलात माझी गणना 'ढ' विद्यार्थ्यांत होत नसे. शिक्षकांची मर्जी तर मी नेहमीच संपादीत असे. प्रत्येक वर्षी पालकांना विद्यार्थ्यांचा अभ्यास किंवा वर्तन यांसंबंधी प्रमाणपत्रे

पाठविली जात. त्यामध्ये कधीही माझा अभ्यास किंवा वर्तन खराब असल्याबद्दल टीका नव्हती. दुसऱ्या इयत्तेनंतर बक्षिसेही मिळविली. ती मिळविण्यात माझ्या हुशारीपेक्षा दैवाचाच भाग विशेष होता. ही शिष्यवृत्ती सर्व विद्यार्थ्यांसाठी नव्हती; तर जे सोरठ प्रांतातले विद्यार्थी असतील, त्यांत पहिला येणाऱ्याला होती. चाळीस-पन्नास विद्यार्थ्यांच्या वर्गात त्या दिवसांत सोरठ प्रांतातले विद्यार्थी कितीसे असणार ?

मला स्वतःला असे स्मरते की मला माझ्या हुशारीबद्दल अभिमान मुळीच नव्हता. बक्षिस किंवा शिष्यवृत्ती मिळाली, तर मला आश्चर्य वाटत असे. परंतु माझ्या वर्तनाला मी फार जपत असे. वर्तनात उणीव निघाली, तर मला रडू येई. शिक्षकांना मला बोलावे लागेल, अशा तऱ्हेचे माझ्या हातून काहीही घडणे किंवा शिक्षकांना तसे वाटणे ही गोष्ट मला असह्य होत असे. एक वेळ मार खावा लागला असे मला स्मरते. माराचे दु:ख नव्हते. परंतु मी शिक्षेला पात्र झालो, याचे महादु:ख वाटले. मी खूप रडलो. हा प्रसंग पहिल्या किंवा दुसऱ्या इयत्तेतील आहे. दुसरा प्रसंग सातव्या इयत्तेतील आहे. त्यावेळी दोराबजी एदलजी गिमी हेडमास्तर होते. ते विद्यार्थीप्रिय होते. कारण, ते नियम पाळीत, पद्धतशीर काम करीत, करवीत व शिकवीतही चांगले. त्यांनी वरच्या इयत्तांच्या विद्यार्थ्यांस कसरत व क्रिकेट आवश्यक केली होती. मला त्यांचा कंटाळा. भाग पडण्यापूर्वी मी कधी कसरत, क्रिकेट किंवा फुटबॉलमध्ये गेलोच नव्हतो. माझा भिडस्त स्वभाव हेही न जाण्याचे एक कारण होते. आता मला जाणवते, की हा कंटाळा चुकीचा होता. कसरतीचा शिक्षणाशी संबंध नाही, अशी त्यावेळी माझी चुकीची समजूत होती.

तरीही कसरतीत न गेल्यामुळे माझे नुकसान झालेले नाही, हेही मला नमूद केले पाहिजे. त्याचे कारण असे, की पुस्तकात मोकळी हवा खायला जाण्याची शिफारस वाचली आणि त्यामुळे हायस्कुलच्या वरच्या इयत्तांपासूनच फिरायला जाण्याची सवय मला जडली होती. ती शेवटपर्यंत राहिली. त्यामुळे माझे शरीर काही अंशी कसलेले बनले.

कंटाळ्याचे दुसरे कारण वडिलांची सेवा करण्याची तीव्र इच्छा हे होते. शाळा सुटली, की मी लगेच घरी जाऊन सेवा-चाकरीला लागत असे. जेव्हा कसरत आवश्यक झाली, तेव्हा या

सेवेमध्ये विघ्न आले. वडिलांची सेवा करण्यासाठी कसरतीची माफी मिळाली पाहिजे, अशी विनंती केली. परंतु गिमीसाहेब कसली माफी देतात? एका शनिवारी सकाळची शाळा होती. संध्याकाळी चार वाजता कसरतीला जायचे होते. माझ्यापाशी घड्याळ नव्हते. आकाशात ढग असल्यामुळे वेळेची उमज पडेना. ढगांमुळे मी फसलो. कसरतीला जातो, तों सर्व निघूनही गेले होते. दुसऱ्या दिवशी गिमीसाहेबांनी हजेरी तपासली. तीत मी गैरहजर निघालो. मला कारण विचारले. मी जे होते, ते सांगितले. त्यांनी ते खरे मानले नाही आणि मला एक की दोन आणे (किती ते नक्की आठवत नाही) दंड झाला.

मी खोटा ठरलो ! मला अतिशय दु:ख झाले. माझा निर्दोषपणा मी कसा सिद्ध करावा ? काही उपाय सुचेना. मनातल्या मनात फुणफुणत राहिलो, रडलो. ठरवले की सत्य बोलणाऱ्याने व सत्य आचरणाऱ्याने गाफीलही राहता कामा नये. अशा तऱ्हेची गफलत माझ्या शिक्षणाच्या मुदतीत ही पहिली व शेवटचीच होय. मला पुसट आठवण आहे की, अखेरीला मी तो दंड माफ करवू

शकलो. कसरतीतून मोकळीक तर मिळविलीच. शाळेच्या वेळेनंतर स्वत:च्या सेवेसाठी आपल्याला माझी जरूर असते, असे वडिलांचे पत्र हेडमास्तरांना असल्यामुळे मोकळीक मिळाली.

व्यायामाऐवजी फिरायचे ठेवले, त्यामुळे शरीराला व्यायाम न देण्याच्या चुकीबद्दल मला कदाचित शिक्षा भोगावी लागली नाही; परंतु दुसऱ्या एका चुकीची शिक्षा मी आजपर्यंत भोगीत आहे: शिक्षणामध्ये हस्ताक्षर चांगले लिहिण्याची गरज नाही, असा चुकीचा समज माझ्यामध्ये कोठून आला, मला माहीत नाही; परंतु तो थेट विलायतेला जाईपर्यंत राहिला. माझ्या ध्यानात आले, की खराब अक्षर ही अर्धवट शिक्षणाची निशाणी समजली पाहिजे. मी मागाहून माझे अक्षर सुधारण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु ते मला जमले नाही. बालवयामध्ये ज्याची मी हेळसांड केली, ते मी आजपर्यंत करू शकलो नाही.

या काळच्या विद्याभ्यासासंबंधी आणखी दोन आठवणी नमूद करण्यासारख्या आहेत. विवाहामुळे एक वर्ष फुकट गेले, दुसऱ्या इयत्तेत ते भरून काढण्याचा मास्तरांनी माझ्याकडून बेत करविला. मेहनती विद्यार्थ्याला तसे करण्याची परवानगी त्यावेळी तरी मिळत असे. म्हणून मी तिसऱ्या इयत्तेत सहा महिने बसलो व उन्हाळ्याच्या सुटीपूर्वीच्या परीक्षेनंतर मला चौथीत घातले. येथपासून काही शिक्षण इंग्रजीतून होऊ लागते. मला काही समजेच ना. भूमितीसुद्धा चौथ्या इयत्तेत सुरू होते. मी तीत मागे पडलो होतोच. शिवाय ती मुळीच समजेना. भूमितीचे शिक्षक समजावून देण्यात हुशार होते. परंतु माझे काही बस्तानच बसेना. मी अनेक वेळा निराश होत असे. कित्येक वेळा असेही वाटे, की दोन इयत्ता सोडून देऊन परत तिसऱ्या इयत्तेचा मार्ग धरावा. परंतु तसे केल्यास माझी अब्रू जाईल व मी झटून अभ्यास करीन, या विश्वासावर ज्या शिक्षकांनी मला वर चढविण्याबद्दल शिफारस केली, त्या शिक्षकांचीही अब्रू जाणार, या भयाने खाली उतरण्याचा विचार मी रद्द केला. प्रयत्न करता करता जेव्हा युक्लिडच्या तेराव्या प्रमेयाशी आलो, तेव्हा एकाएकी मला वाटू लागले, की भूमिती तर सोप्यात सोपा विषय आहे. ज्यात बुद्धीचा फक्त साधा व सरळ उपयोग करायचा आहे, त्यात अडचण ती कसली ? त्यानंतर नेहमी भूमिती हा विषय माझ्यासाठी सोपा व रसाळ बनला.

संस्कृताने मला भूमितीपेक्षाही अधिक त्रास दिला. भूमितीमध्ये घोकायचे काहीच नसते, तर संस्कृतात पाहतो, तों सर्व काही घोकायचेच. हा विषयही चौथ्या इयत्तेपासून सुरू झाला. सहाव्या इयत्तेत मी हरलो. संस्कृत शिक्षक फार कडक होते. विद्यार्थ्यांना खूप शिकविण्याचा त्यांना लोभ असे. संस्कृत-वर्ग आणि फारसी वर्ग यांमध्ये एक प्रकारची स्पर्धा असे. फारसी शिकविणारे मौलवी गरीब होते. विद्यार्थी आपापसांत बोलत असत, की फारसी फार सोपे आहे आणि फारसी शिक्षक फार सज्जन मनुष्य आहेत. विद्यार्थी करतील तेवढ्यावरच ते चालवून घेतात. मी पण सोपे आहे, असे ऐकून लोभात पडलो आणि एक दिवस फारसीच्या वर्गात जाऊन बसलो. संस्कृत शिक्षकाला दुःख झाले. त्यांनी मला बोलावले. “तू कोणाचा मुलगा, हे तरी ध्यानी आण. तुझ्या धर्माची भाषा तू शिकणार नाहीस ? तुला ज्या अडचणी येतील, त्या मला दाखव. माझी तर सर्व

मुलांना उत्तम संस्कृत शिकविण्याची इच्छा आहे. पुढे त्याच्यामध्ये मधुर रसाचे घोट चाखायला मिळणार आहेत. तू असा कंटाळून जाऊ नकोस. तू पुन्हा माझ्या वर्गात येऊन बैस."

मी शरमलो. शिक्षकाच्या प्रेमाची अवगणना माझ्याने करविली नाही. आज माझा आत्मा कृष्णशंकर मास्तरांचे उपकार मानीत आहे. कारण जितके संस्कृत मी त्यावेळी शिकलो, तेवढेही जर शिकलो नसंतो, तर आज संस्कृत शास्त्रामध्ये मला जी गोडी वाटते, ती वाटली नसती. मला तर याचाच पश्चात्ताप होत आहे, की मी संस्कृत जास्त शिकलो नाही. कारण नंतर माझ्या लक्षात आले की, कोणाही हिंदू बालकाने संस्कृतचा चांगला अभ्यास केल्याशिवाय राहता कामा नये.

# ३. बालविवाह

तेरा वर्षांचा असताना माझा विवाह झाला, ही गोष्ट लिहिताना मला दु:ख होते. आज माझ्यासमोर बारा-तेरा वर्षांची मुले आहेत. त्यांच्याकडे पाहतो आणि माझ्या विवाहाचे स्मरण करतो, तेव्हा मला स्वत:बद्दल कीव वाटू लागते आणि माझ्यावर ओढवलेल्या प्रसंगातून बचावल्याबद्दल या मुलांना धन्यवाद देण्याची इच्छा होते. तेरा वर्षांच्या वयात झालेल्या माझ्या विवाहाच्या समर्थनपर असा एकही नैतिक युक्तिवाद मला सुचू शकत नाही.

त्यावेळी माझ्या मनात चांगले चांगले कपडे वापरायला मिळतील, वाजंत्री वाजतील, वरात निघेल, सुग्रास भोजने मिळतील, एका नव्या मुलीबरोबर खेळ करायला मिळतील, वगैरे हौसेपलीकडे दुसरे काही असल्याचे स्मरत नाही. आम्ही हळूहळू एकमेकांना ओळखू लागलो, बोलूचालू लागलो. आम्ही दोघेही एकाच वयाचे होतो, पण मी मात्र स्वामित्व गाजवायला सुरुवात केली.

मी माझ्या पत्नीला माझ्या परवानगी-वाचून कोठेही जाऊ देत नसे. या गोष्टीमुळे आमच्यामध्ये दु:खदायक बेबनाव होऊ लागले. परवानगीशिवाय कोठेही जायचे नाही, ही एक प्रकारची कैदच झाली. परंतु कस्तुरबाई ही अशा प्रकारची कैद सहन करणारी स्त्री नव्हती. मनाला येईल तेव्हा ती खुशाल मला विचारल्याशिवाय जाई. मी जसजसा दाब घाली, तसतशी ती अधिकच मोकळीक घेई आणि तसतसा मी अधिकच चिडत असे. अशा तऱ्हेने आम्हा बालकांमध्ये अबोला वरचेवर उद्‌भवू लागला. कस्तुरबाईने जी मोकळीक घेतली, ती मी निर्दोष समजतो. जिच्या मनाला पापाचा स्पर्शही नाही, अशी बालिका देवदर्शनाला जायचे किंवा कोणाला भेटायला जायचे, असल्या गोष्टींवर नियंत्रण का म्हणून सहन करील ? मी जर तिच्यावर दडपण घालणार, तर तिने माझ्यावर का घालू नये ? पण हे आता सुचते. त्यावेळी तर मला माझे स्वामित्व गाजवायचे होते !

परंतु आमच्या या गृहसंसारात माधुर्य मुळीच नव्हते, असे वाचकाने समजू नये. माझ्या वक्रतेच्या मुळाशी प्रेम होते. माझ्या मनातून माझ्या पत्नीला आदर्श स्त्री बनवायचे होते. तिने

निष्पाप व्हावे, निष्पाप रहावे, मी शिकतो, ते शिकावे आणि आम्हा उभयतांची एकतानता व्हावी, अशीच माझी भावना होती.

कस्तुरबाईच्या मनात ही भावना असल्याचे मला माहीत नाही. ती निरक्षर होती. स्वभावाने सरळ, स्वतंत्र, मेहनती आणि माझ्याशी तरी मितभाषण करणारी होती. तिची शिकण्याची इच्छा मी माझ्या बालपणात कधीही ऐकली नाही.

# ४. दु:खद मैत्री

मी म्हटलेच आहे की, हायस्कुलात माझे विश्वासातले खास मित्र असे थोडेच होते. अशी मित्रता बाळगणारे दोन मित्र मला वेगवेगळ्या वेळी होते असे म्हणता येईल. एकाचा संबंध मी आपणहून त्या मित्राचा त्याग केला नसताही फार काळ टिकला नाही. मी दुसऱ्याची संगत धरली, म्हणून पहिल्याने मला सोडले. दुसरी मैत्री हे माझ्या आयुष्यातील एक दु:खद प्रकरण आहे. ही मैत्री पुष्कळ वर्षे टिकली. ती मैत्री करण्यामागे माझी दृष्टी त्या मित्राला सुधारण्याची होती.

त्याची प्रथम माझ्या मधल्या बंधूंशी मैत्री होती. तो माझ्या बंधूंच्या वर्गात होता. त्याच्यात कित्येक दोष आहेत, हे माझ्या लक्षात आले होते. परंतु ज्याला आपला म्हटला, त्याला कधीही अंतर द्यायचे नाही, हा गुण मी त्याच्या ठिकाणी कल्पिला होता. माझ्या मातुश्री, माझे वडील बंधू व माझी पत्नी तिघांनाही ही संगत रुचत नव्हती. माझ्यासारखा गर्विष्ठ नवरा बायकोची सूचना थोडीच मनावर घेणार ? आईच्या शब्दाबाहेर नाही जाणार, वडील बंधूंचे ऐकेनच; परंतु त्यांना मी असे सांगून शांत केले: “तुम्ही जे त्याचे दोष सांगितले, ते मला माहीत आहेत. त्याचे गुण मात्र तुम्हाला माहीत नाहीत. मला तो वाईट मार्गाला नेणार नाही. कारण माझा त्याच्याबरोबरचा संबंध फक्त त्याला सुधारण्यासाठी आहे. तो सुधारला तर फार उत्तम मनुष्य बनेल, अशी माझी खात्री आहे. तुम्ही माझ्याबद्दल निर्धास्त रहावे अशी माझी तुम्हाला विनंती आहे.”

या बोलण्याने त्यांचे समाधान झाले, असे मला वाटत नाही; परंतु त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला माझ्या मार्गाने जाऊ दिले.

मी या मित्राच्या संबंधात आलो त्यावेळी राजकोटमध्ये ‘सुधारणा-पंथ' पसरत होता. पुष्कळ हिंदू शिक्षक गुप्तपणे मांसाहार व मद्यपान करीत असतात, अशी बातमी मला या मित्राकडून मिळाली. राजकोटच्या इतर सुप्रसिद्ध गृहस्थांचीही नावे त्याने घेतली. हायस्कुलातील काही विद्यार्थ्यांचीही नावे माझ्या कानी आली.

मला आश्चर्य वाटले व दु:खही झाले. मी याचे कारण विचारले, तेव्हा असा युक्तिवाद करण्यात आला: “आपण मांसाहार करीत नाही त्यामुळे आपला समाज नेभळट बनला आहे. इंग्रज आपल्यावर राज्य करतात, याचे कारण त्यांचे मांसाशन होय. मी किती शक्तिवान आहे आणि किती धावू शकतो ते तर तुम्हाला माहीतच आहे; त्याचे कारणही माझे मांसाशन. मांसाहाऱ्याला गळवे होत नाहीत. झालीच तर चटकन भरून निघतात. आमचे शिक्षक मांस खातात, इतके नामांकीत लोक खातात, ते काय खुळे म्हणून खातात ? तुम्हीही खाल्ले पाहिजे. खाऊन पहा म्हणजे समजेल तुमच्यात किती बळ येते ते !”

हा काही एकच दिवस झालेला युक्तीवाद नव्हे. अशा तऱ्हेचे युक्तीवाद, अनेक उदाहरणांनी सजविलेले असे अनेकवार झाले. माझे मधले बंधू तर अगोदरच बाटले होते. त्यांनी त्या युक्तीवादाला स्वत:ची अनुमती दिली. माझ्या बंधूंच्या व त्या मित्राच्या मानाने मी फारच नेभळट होतो. त्यांची शरीरे जास्त पीळदार होती. त्यांचे शरीरबळ माझ्यापेक्षा पुष्कळ जास्त होते. ते हिंमतवान होते. त्या मित्राचे पराक्रम पाहून मी मुग्ध होऊन जात असे. तो वाटेल तितके धावू शकत असे. त्याचा वेगही उत्तम होता. लांब आणि उंच उडीतही तो निष्णात होता. मार सहन करायची शक्तीही त्याचप्रमाणे. या शक्तीचे प्रदर्शन तो माझ्यापुढे वेळोवेळी करीत असे. आपल्यात नसलेली शक्ती इतरांमध्ये पाहून माणसाला आश्चर्य वाटणारच. माझेही तसेच झाले. आश्चर्यातून मोह उद्भवला. माझ्यात धावण्या-सवरण्याची शक्ती नसल्यासारखीच होती. “मी पण या मित्राप्रमाणे बलवान झालो तर किती चांगले !” असे मला वाटले.

शिवाय, मी फार भित्रा होतो. चोर, भूत, साप, इत्यादींच्या भीतीने पछाडलेला असे. या भीतीची पीडाही मला खूप होत असे. रात्री एकट्याने कोठेही जाण्याची हिंमत होत नसे. अंधारात पाऊलही टाकीत नसे. दिव्याशिवाय झोपणेही जवळजवळ अशक्य. इकडून भूत आले तर ? आणि तिकडून चोर ? तिसरी-कडून सर्प ? म्हणून दिवा हा पाहिजेच. जवळ झोपलेल्या व आता काही अंशी तारुण्यात आलेल्या पत्नीजवळदेखील या माझ्या भीतीचा उल्लेख मी कसा करावा? माझ्यापेक्षा ती जास्त हिंमतवान होती, हे माझ्या लक्षात आले होते व त्याची मला लाजही वाटे.

तिला सापाबिपाचे भय कसे ते माहीतच नव्हते. अंधारातून एकटीच जाई. ही माझी दुर्बलता त्या मित्राला माहीत होती. तो तर मला सांगे की आपण जिवंत साप हाताने पकडतो. चोराची भीती त्याला ठाऊकच नव्हती. भूतांवर तर त्याचा विश्वासच नव्हता. हा सर्व मांसाहाराचा प्रताप, असे त्याने माझ्या मनावर ठसविले. या सर्वांचा माझ्या मनावर व्हायचा तोच परिणाम झाला. मी नरमलो. "मांसाहार ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे मी बलवान व हिंमतवान बनेन. सर्व देश मांसाहार करील, तर इंग्रजांचा पाडाव करता येईल," असे मला वाटू लागले.

मांसाहाराचा आरंभ करण्याचा दिवस मुक्रर झाला. ही गोष्ट अत्यंत गुप्त रीतीने करावी लागणार होती, कारण गांधी-कुटुंब वैष्णव संप्रदायातले. माझ्या मातापित्यांची तर धर्मनिष्ठ म्हणून विशेष ख्याती. मातापित्यांचा मी परम भक्त होतो. मांसाहार करताना मातापित्यांना फसवावे लागेल, हे ज्ञान त्यावेळी मला नव्हते, असे नाही. परंतु मला सुधारणा घडवून आणायची होती. मांसाहाराचा शौक नव्हता. त्यात स्वाद आहे, असे समजून मला मांसाहार सुरू करायचा नव्हता. मला तर बलवान आणि साहसी बनायचे होते. इतरांना तसे होण्याचे निमंत्रण द्यायचे होते. त्यामुळे केवळ मातापित्यांपासून ही गोष्ट लपविल्याने सत्यापासून मी दूर पळतो असे होणार नाही, अशी मी माझ्या मनाची समजूत घातली.

नेमका दिवस आला. आम्ही नदीकडे एकांत शोधायला निघालो. दूर जाऊन कोणी पाहणार नाही असा कोपरा शोधून काढला आणि तेथे मी कधीही न पाहिलेली वस्तू-मांस पाहिले. बरोबर भट्टीवाल्याकडची डबलरोटी होती. दोहोंतून एकही वस्तू आवडेना ! मांस चामड्यासारखे लागे ! खाणे अर्ध्यावर सोडावे लागले. ती रात्र मला फार बिकट गेली. झोप येईना. जणू काय शरीरात बकरा जिवंत आहे आणि ओरडतो आहे, अशी स्वप्ने पडत. मी उसळून उठे, पस्तावे आणि पुन्हा विचार करी की मांसाहार केल्याशिवाय गत्यंतर नाही; हिंमत सोडता कामा नये !

मित्रही नाउमेद होणारा नव्हता. त्याने आता मांस निरनिराळ्या तऱ्हेने शिजवून आणि मीठ-मसाला घालून त्याचा दर्प झाकून टाकायला सुरुवात केली. नदीकाठी घेऊन जाण्याऐवजी

एका बबर्जीशी संधान साधून गुपचूपपणे एका सरकारी डाक बंगल्याकडे घेऊन जाण्याची योजना केली.

माझा रोटीचा तिरस्कार मंदावला, बकऱ्याची कीव बुजली आणि मांसाची म्हणता येणार नाही, पण मांसमिश्रित पदार्थांची चटक लागली. अशा तऱ्हेने एक वर्ष लोटले असावे व त्या मुदतीत पाच सहा वेळा मांस खावयाला मिळाले असेल. कारण डाक बंगला वाटेल तेव्हा मिळेना, मांसाची स्वादिष्ट समजली जाणारी सुरस पक्वान्ने नेहमीच तयार करणे जमत नसे. शिवाय असल्या जेवणांना पैसेही पडणार. माझ्याजवळ फुटकी कवडीही नव्हती, त्यामुळे मला काही देणे शक्य नव्हते. पैसे त्या मित्रालाच शोधून काढावे लागत. त्याने कोठून आणले असतील, त्याची मला आजमितीपर्यंत माहिती नाही. त्याचा इरादा तर मला मांस खाऊ घालण्याचा-मला बाटविण्याचा होता. त्यासाठी तो पैशाचा खर्च स्वत: करी. परंतु त्याच्याजवळ म्हणून अखंड खजिना नव्हता. अर्थात असली जेवणे क्वचितच होऊ शकत.

जेव्हा जेव्हा मी असली जेवणे जेवीत असे, तेव्हा तेव्हा घरी जेवण शक्यच होईना. आई जेव्हा जेवायला बोलवी, तेव्हा “आज भूक नाही, पचन झालेले नाही,” अशा सबबी काढाव्या लागत. असे सांगताना दर वेळी मला मोठा धक्का बसत असे. असले असत्य आणि तेही आईजवळ ! शिवाय मातापित्यांना जर समजले की मुलगे मांसाहारी झाले आहेत, तर त्यांच्यावर वीजच कोसळल्याप्रमाणे होईल. हे विचार माझ्या हृदयाला घरे पाडीत.

म्हणून मी निश्चय केला, “मांस खाणे आवश्यक आहे. त्याचा प्रचार करून आपण हिंदुस्थान सुधारू, परंतु मातापित्यांना फसविणे आणि खोटे बोलणे हे मांस न खाण्यापेक्षाही वाईट आहे. यासाठी आईबाप जिवंत असेपर्यंत मांस खाता कामा नये. त्यांच्या मृत्यूनंतर स्वतंत्र झालो म्हणजे उघडपणे खावे व ती वेळ येईपर्यंत मांसाहाराचा त्याग करावा.” हा निश्चय मी त्या मित्राला कळविला आणि तेव्हापासून मांसाहार सुटला तो सुटलाच.

# ५. चोरी आणि प्रायश्चित्त

मांसाहाराच्याच सुमारास, तसेच त्यापूर्वी घडलेल्या कित्येक दोषांचे वर्णन अजून करावयाचे राहिले आहे. हे दोष विवाहापूर्वीचे किंवा त्यानंतर लवकरच घडलेले आहेत.

माझ्या एका नातलगाबरोबर मला विडी पिण्याची चटक लागली. आमच्यापाशी पैसे नसत. विडी पिण्यापासून काही फायदा आहे किंवा तिच्या वासात काही मजा आहे, असे आम्हा दोघांपैकी एकालाही वाटत नव्हते; परंतु फक्त धूर काढण्यातच मजा असावी अशी समजूत होती. माझ्या चुलत्यांना विडी ओढण्याची सवय होती. त्यांना व इतरांना धूर काढताना पाहून आम्हालाही विडी फुकण्याची इच्छा झाली. गाठीला पैसा तर नाही. तेव्हा काकांनी फेकून दिलेली विड्यांची थोटके चोरण्यास आम्ही सुरुवात केली.

परंतु विड्यांचे तुकडे नेहमीच कोठून मिळणार ? शिवाय, त्यांतून विशेष धूरही निघेना. म्हणून नोकरांच्या गाठीला चारदोन दिडक्या असत, त्यांतील मधून मधून एखादी लांबविण्याला सुरुवात केली आणि तिच्या विड्या विकत आणू लागलो. परंतु त्या ठेवायच्या कुठे, हा प्रश्न पडला. वडिलांच्या देखत विडी प्यायची नाही, हे माहित होते. कसेबसे करून चारदोन दिडक्या चोरून काही आठवडे चालविले. मध्यंतरी अशी बातमी मिळाली की एक झाड असते, त्याच्या डहाळ्या विडीप्रमाणेच पेटतात आणि त्याही विड्यांप्रमाणेच ओढता येतात. आम्ही त्या आणून ओढू लागलो !

परंतु समाधान होईना; आमची पराधीनता आम्हाला बोचू लागली. वडिलांच्या परवानगी-शिवाय काहीच करता येऊ नये, याचे फार वाईट वाटले. आम्ही कंटाळलो आणि आत्महत्या करण्याचा निश्चय केला !

पण आत्महत्या कशी करायची? विष कोण देणार? धोतऱ्याच्या फळातील बिया खाल्ल्या तर मनुष्य मरतो, असे ऐकले. रानात जाऊन आम्ही त्या मिळवून आणल्या. संध्याकाळची वेळ शोधली. केदारजीच्या देवळात नंदादीपात तूप घातले, देवदर्शन घेतले आणि एकांताची जागा

शोधून काढली. परंतु विष खाण्याचे धाडस होईना. तत्काळ मृत्यू आला नाही तर? मरून तरी काय मिळणार? पराधीनता भोगून टाकलेली काय वाईट? तरीही चारदोन बिया खाल्ल्याच ! आणखी खाण्याचे मात्र धैर्य होईना. दोघांनाही मृत्यूची भीती वाटली आणि रामजीच्या देवळात जाऊन दर्शन घेऊन शांत होण्याचा व आत्महत्येची गोष्ट विसरून जाण्याचा आम्ही ठराव केला.

आत्महत्येचा बेत करणे सोपे, पण प्रत्यक्ष आत्महत्या करणे सोपे नाही, ही गोष्ट माझ्या लक्षात आली.

या आत्महत्येच्या विचारांमुळे एक परिणाम घडून आला. तो हा की आम्ही दोघेही उष्ट्या विड्या चोरून पिण्याची व नोकराच्या दिडक्या चोरून त्यांच्या विड्या पिण्याची सवय पार विसरून गेलो.

मोठेपणी विडी पिण्याची इच्छाच मला कधी झाली नाही. ही सवय जंगली, गलिच्छ व हानिकारक आहे, असेच मी नेहमी मानीत आलो आहे. विडीचा इतका जबरदस्त शौक दुनियेला का असावा, त्याचे कारण समजण्याची शक्ती मी कधीच मिळवू शकलो नाही. आगगाडीच्या डब्यात जेथे दिवसा खूप विड्या फुंकल्या जातात, तेथे बसणे मला असह्य होते व त्यांच्या धुराने मी गुदमरून जातो.

विड्यांची थोटके चोरणे, तसेच त्यासाठी चाकरांचे पैसे चोरणे, या गुन्ह्यांपेक्षाही दुसरा एक चोरीचा गुन्हा जो माझ्या हातून घडला, तो मी जास्त भयंकर समजतो. विडीचा गुन्हा घडला तेव्हाचे वय बारा-तेरा वर्षांचे असेल; कदाचित त्याहूनही कमी. दुसऱ्या चोरीच्या वेळी वय पंधरा वर्षांचे असावे. ही चोरी माझ्या मांसाहारी बंधूंच्या सोन्याच्या कड्याच्या तुकड्याची होय. त्यांना थोडेसे, म्हणजे पंचवीस एक रुपयांचे कर्ज झाले होते. ते फेडावे कसे त्याचा आम्ही उभयता बंधू विचार करीत होतो. माझ्या बंधूंच्या हातात भरीव कडे होते. त्यातून एक तोळा सोने कापून काढणे कठीण नव्हते.

कडे कापले, कर्ज फिटले. परंतु, मला ही गोष्ट असह्य झाली. इतःपर चोरी करायची नाही, असा मी निश्चय केला. वडिलांपाशी कबुलीही देऊन टाकली पाहिजे, असे वाटू लागले. पण जीभ

तर चालेच ना. वडील स्वत: मला मारतील अशी भीती वाटत नव्हती. त्यांनी उभ्या जन्मात आम्हा भावांना कधी मारल्याचे आठवत नाही. परंतु त्यांना स्वत:ला दु:ख होईल. डोकेही आपटून घेतले तर ? हा धोका सहन करूनही गुन्हा कबूल केलाच पाहिजे; त्याखेरीज दोषाचे क्षालन होणार नाही, असे मनाने ठरविले.

अखेरीला मी ठराव केला की चिठ्ठी लिहून गुन्हा कबूल करावा आणि माफी मागावी. मी चिठ्ठी लिहिली आणि स्वतः त्यांच्या हातात नेऊन दिली. चिठ्ठीमध्ये सर्व गुन्हा कबूल करून शिक्षा मागितली होती, त्यांनी स्वत:वर काही दु:ख ओढवून घेऊ नये अशी विनवणी केली होती व इत:पर अशा तऱ्हेचा गुन्हा न करण्याची प्रतिज्ञा केली होती.

मी कापऱ्या हाताने ती चिठ्ठी वडिलांच्या हातात दिली. मी त्यांच्या उच्चासनाच्या समोर बसून राहिलो.

त्यांनी चिठ्ठी वाचली. डोळ्यांतून मोत्यांचे बिंदू गळले. चिठ्ठी भिजली. त्यांनी क्षणमात्र डोळे मिटून धरले, ती चिठ्ठी फाडून टाकली आणि वाचण्यासाठी बसले होते, ते परत आडवे झाले. मी पण रडलो. वडिलांचे दु:ख समजू शकलो. मी चित्रकार असतो, तर आजही ते चित्र पूर्णपणे रेखाटू शकलो असतो. इतक्या स्पष्ट रीतीने ते माझ्या डोळ्यांसमोर उभे आहे.

त्या मौक्तिकबिंदूंच्या प्रेमबाणाने माझे हृदय मेदून गेले. मी शुद्ध झालो. ज्याला अनुभव असेल तोच हे प्रेम समजू शकणार.

अशा तऱ्हेची शांत क्षमा वडिलांच्या स्वभावाविरुद्ध होती. ते संतापतील, लाजवून बोलतील, कदाचित डोकेही आपटून घेतील असे मला वाटले होते. परंतु: त्यांनी इतकी अपार शांती राखली त्याचे कारण गुन्ह्याची निखालस कबुली हेच होय, असे मला वाटते. जो मनुष्य अधिकारी मनुष्यापाशी स्वत:चा गुन्हा खुल्या दिलाने कबूल करतो व पुन्हा न करण्याची प्रतिज्ञा करतो, तो सर्वोत्कृष्ट प्रायश्चित्त करतो. मला माहित आहे, की माझ्या कबुलीमुळेच वडील माझ्याविषयी निश्चिंत झाले आणि त्यांच्या मजवरील अगाध प्रेमात भरच पडली.

# ६. वडिलांचा आजार व मृत्यू

माझे सोळावे वर्ष चालू होते. वडील भगंदराच्या व्यथेने अंथरुणातच पडून असत. त्यांच्या सेवेला मातोश्री, घरचा एक जुना नोकर व मी असे तिघेजण बहुतेक वेळ राहत असू. माझे काम ‘नर्स'चे होते. त्यांचा व्रण धुणे, त्याला औषध लावणे, मलम लावायचे असेल तेव्हा ते लावणे आणि औषध देणे, हे माझे मुख्य काम होते. रोज रात्री त्यांचे पाय चेपावे व त्यांनी जा म्हटले किंवा त्यांना झोप लागली म्हणजे मी झोपण्यास जावे असा परिपाठ होता. मला ही सेवा अतिशय प्रिय होती. तीत कधीही चुकारपणा केल्याचे मला स्मरत नाही. हे माझे हायस्कूलचे दिवस होते. त्यामुळे खाण्यापिण्याखेरीजचा माझा सर्व वेळ शाळेत किंवा वडिलांच्या शुश्रुषेत जात असे. वडिलांची परवानगी असेल आणि त्यांच्या प्रकृतीकडून अडचण नसेल, तेव्हा संध्याकाळचा फिरायला जात असे.

मृत्यूची घोर रात्र येऊन ठेपली. रात्रीचे साडेदहा किंवा अकरा वाजले असावेत. मी पाय चेपीत बसलो होतो. काकांनी मला सांगितले, “तू जा, आता मी बसतो.” मी खूश झालो आणि सरळ शयनगृहामध्ये गेलो. पाच-सात मिनिटे झाली असतील-नसतील, इतक्यात नोकराने दार ठोठावले. माझ्या पोटात धस्स झाले. मी चपापलो. “ऊठ, बापू फार आजारी आहेत,” नोकर म्हणाला. फार आजारी आहेत हे मला माहीतच होते. त्यामुळे त्या वेळच्या ‘फार आजारी'चा विशेष अर्थ माझ्या लक्षात आला.

बिछान्यातून ताडकन उडी मारून मी उठलो.

“काय झाले, सांग तर खरं !“

“बापू आटोपले !“ जबाब मिळाला.

सारं काही संपलं होतं. शेवटच्या घटकेला वडिलांच्या जवळ राहता आले नाही, याचे मला अतिशय दुःख झाले.

# ७. धर्मजागृती

मी पूर्वी सांगितलेच आहे, की मला भुत-प्रेतादींचे भय वाटे. ‘रामनाम ? हे त्यावर औषध आहे, 'हे रंभेने मला समजावून सांगितले. माझी तरी रामनामापेक्षा रंभेवरच विशेष श्रद्धा होती. म्हणून मी बालवयामध्ये भूतप्रेतादिकांच्या भीतीपासून मुक्त होण्यासाठी रामनामाचा जप सुरू केला. तो फार दिवस चालला नाही; परंतु बालपणामध्ये पेरलेले बी जळून गेले नाही. आज रामनाम ही माझ्या बाबतीत अमोघ शक्ती आहे. त्याचे कारण रंभाबाईने पेरलेले बीज असे मला वाटते.

वडिलांच्या आजाराचा काही काळ पोरबंदरला गेला. येथे ते रामजीच्या देवालयात रोज रात्री रामायण ऐकत असत. रामायण सांगणारे बिलेश्वरचे लाधा महाराज रामचंद्रजींचे परमभक्त होते. त्यांचा कंठ मधुर होता. ते दोहे, चौपाई गात व त्यांचा अर्थ करून सांगत. ते स्वत: त्याच्या रसामध्ये लीन होऊन जात आणि श्रोतृजनांना लीन करून सोडीत. माझे वय त्यावेळी तेरा वर्षांचे असेल, पण मला त्यांच्या वाचनामध्ये खूप गोडी वाटे, असे स्मरण आहे. रामायणाबद्दल मला वाटणारा आत्यंतिक प्रेमाचा पाया हे रामायण-श्रवण होय. तुळसीदासाचे रामायण हा मी आज भक्तिमार्गावरील सर्वोत्तम ग्रंथ मानतो.

राजकोटमध्ये मला अनायासेच सर्व संप्रदायांविषयी समभाव राखण्याचे शिक्षण मिळाले. हिंदु धर्माच्या प्रत्येक संप्रदायाबद्दल समभाव शिकलो. कारण आईवडील हवेलीला जात, शिवालयात जात, राममंदिरात जात आणि आम्हा भावांना सोबत घेऊन जात किंवा स्वतंत्रपणे पाठवीत असत. शिवाय, वडिलांपाशी जैनधर्माचार्यांमधून कोणी ना कोणी नेहमी येत. वडील त्यांना भिक्षाही घालीत. ते वडिलांबरोबर धर्मासंबंधी व व्यवहारासंबंधी गोष्टी करीत.

याशिवाय वडिलांचे मुसलमान आणि पारशी मित्रही होते. ते आपापल्या धर्माबद्दल गोष्टी बोलत आणि वडील त्यांचे म्हणणे आदरपूर्वक व पुष्कळ वेळा रसपूर्वक ऐकत असत. अशा प्रकारच्या वार्तालापांच्या वेळी मी ‘नर्स’ असल्यामुळे बरेचदा हजर असे. या सर्व वातावरणाचा माझ्यावर असा परिणाम झाला की, सर्व धर्माबद्दल माझ्या मनामध्ये समभाव उत्पन्न झाला.

ख्रिस्ती-धर्म मात्र त्याला अपवाद होता. त्याच्याबद्दल काहीसा अनादर उत्पन्न झाला. त्यावेळी हायस्कूलच्या कोपऱ्यावर कोणी ख्रिस्ती व्याख्यान देत असे. ते हिंदू देवतांची व हिंदुधर्मियांची नालस्ती करीत. ते मला असह्य होई. याच सुमाराला एक सुप्रसिद्ध हिंदू ख्रिस्ती झाल्याचे ऐकले. गावात बोलत की, त्याचा ख्रिस्ती धर्मात प्रवेश करविताना त्याला गोमांस खाऊ घालण्यात आले आणि दारू प्यायला दिली. त्याचा पोषाखही बदलण्यात आला आणि तो गृहस्थ ख्रिस्ती झाल्यानंतर कोट, पाटलोण आणि इंग्रजी टोपी वापरू लागला. शिवाय जो गृहस्थ ख्रिस्ती झाला, त्याने आपल्या पूर्वजांच्या धर्माची, रीतिरिवाजांची आणि देशाची टवाळी सुरू केल्याचे कानी आले. या सर्व गोष्टींमुळे माझ्या मनात ख्रिस्ती धर्माबद्दल अनादर उत्पन्न झाला.

जरी अशा तऱ्हेने इतर धर्मांबद्दल माझ्या मनात समभाव उत्पन्न झाला, तरीही माझ्या मनात ईश्वराविषयी आस्था होती, असे म्हणता येणार नाही. पण एक गोष्ट मनात रुजली की, या जगताचा आधार नीती आहे व सत्यामध्ये सर्व नीतीचा समावेश होतो.

शिवाय, नीतीविषयक एक सहा चरणी श्लोक माझ्या हृदयात ठसून राहिला. अपकाराचा मोबदला अपकार नसून उपकारच होय, ही गोष्ट जीवनसूत्र होऊन बसली. तिने माझ्यावर साम्राज्य गाजविण्यास सुरुवात केली. अपकार करणाऱ्यांचे कल्याण इच्छिणे व करणे ही माझी आवडती गोष्ट होऊन बसली. मी असंख्य प्रयोग केले. एवढा चमत्कार घडवून आणणारा तो श्लोक असा:

*पाणी आपने पाय, भलुं भोजन तो दीजे;*

*आकी नमावे शीश, दंडवत कोडे कीजे.*

*आपण घासे दाम, काम महोरोनु करीए;*

*आप उगारे प्राण, ते तणा दुःखमा मरीए.*

*गुण केडे तो गुण दश गणो, मन वाचा, कर्मे करी;*

*अवगुण केडे जे गुण करे, ते जगमां जीत्यो सही*

# ८. विलायतेची तयारी

पास झाल्यानंतर कॉलेजात जाऊन शिक्षण पुढे चालवावे अशी वडील मंडळींची इच्छा होती. मुंबईतही कॉलेज आणि भावनगरलाही कॉलेज. भावनगरला खर्च कमी म्हणून भावनगरच्या शामळदास कॉलेजात जाण्याचे ठरले. तेथे मला काही समजेना. सर्वच कठीण वाटू लागले. अध्यापकांच्या व्याख्यानांमध्ये गोडीही वाटेना, आणि समजही पडेना. त्यांत अध्यापकांचा दोष नव्हता. दोष माझ्या कच्चेपणाचाच होता. त्यावेळचे शामळदास कॉलेजचे अध्यापक तर पहिल्या दर्जाचे समजले जात. पहिली सहामाही पुरी करून घरी आलो.

कुटुंबाचे जुने मित्र व सल्लागार एक विद्वान व्यवहारकुशल ब्राह्मण मावजी दवे म्हणून होते. त्यांनी वडिलांच्या मृत्यूनंतरही कुटुंबाशी असलेला संबंध कायम ठेवला होता. ते या सुट्टीच्या दिवसांत आमच्या घरी आले होते. मातोश्री व वडीलबंधू यांच्याबरोबर गोष्टी बोलत असता माझ्या शिक्षणासंबंधी त्यांनी चौकशी केली. मी शामळदास कॉलेजात आहे, हे ऐकून ते म्हणाले, “काळ बदलला आहे. वडिलांची गादी सांभाळण्याची तुम्हा भावांपैकी कोणाची इच्छा असेल, तर ती शिक्षणाखेरीज मिळणार नाही. हा मुलगा अजून शिकतो आहे, त्याअर्थी गादी सांभाळण्याचे काम त्यालाच उचलायला लावले पाहिजे. त्याची अजून चारपाच वर्षे बी.ए. होईपर्यंत जातील. आणखी इतका वेळ वाया घालवून त्याला पन्नास-साठ रुपयांची नोकरी मिळेल, दिवाणपद नाही मिळणार. बरे, त्याला त्यापुढे माझ्या मुलाप्रमाणे वकील करावा तर आणखीही थोडी वर्षे जाणार आणि तोपर्यंत तर दिवाणगिरीसाठी कितीतरी वकीलही तयार झालेले असतील! तुम्ही त्याला विलायतेला पाठविले पाहिजे. तो नवा बॅरिस्टर आला आहे, तो पहा ना, केवढ्या थाटात राहतो ! कारभाऱ्याची जागा त्याला पाहिजे तर आता मिळेल. माझा तर सल्ला असा आहे, की तुम्ही मोहनदासला यंदाच विलायतेला पाठवून द्यावे. आमच्या केवळरामाचे इंग्लंडात पुष्कळ मित्र आहेत, त्यांच्या नावाने तो शिफारसपत्रे देईल, म्हणजे त्याला तेथे कसली अडचण पडणार नाही.”

जोशीजींनी (आम्ही मावजी दवे यांना या नावाने संबोधीत असू) माझ्याकडे पाहून मला विचारले: “कसे काय, तुला विलायतेला जाणे आवडेल की इथेच शिकत बसणे ?” मला तर

आवडत होते, तेच वैद्याने सांगितले. कॉलेजातील अडचणींनी मी भिऊन गेलेलाच होतो. मी म्हटले, “मला विलायतेला पाठवाल तर फारच चांगले.” वडील बंधू फिकिरीत पडले; पैशाचे कसे करायचे ? शिवाय, माझ्यासारख्या नवयुवकाला इतक्या दूर पाठवावे तरी कसे ? मातोश्रीला तर काहीच सुचेना. तिला वियोगाची गोष्टच सहन झाली नाही. तिने बारीक तपास सुरू केला होता. कोणी म्हणे, तरुण लोक विलायतेला जाऊन बहकतात; कोणी म्हणे, ते मांसाहार करतात; तर कोणी सांगत, दारूशिवाय चालायचेच नाही. आईने हे सर्व मला सांगितले. मी म्हटले, “पण तुझा माझ्यावर विश्वास नाही ? मी तुला फसविणार नाही; शपथ घेऊन सांगतो की या तिन्ही गोष्टींपासून मी दूर राहीन. तसा धोका असता, तर जोशीजी मला कसे जाऊ देतील ?”

आई म्हणाली, “माझा तुझ्यावर विश्वास आहे. पण दूर देशात कसे होणार? माझी अक्कलच गुंग होते. मी बेचरजी स्वामींना विचारते.”

बेचरजी स्वामी मोढ वाण्यातून जैन साधू झाले होते. जोशीजींप्रमाणे तेदेखील आमचे सल्लागार होते. त्यांची मदत झाली. त्यांनी सांगितले, “मी या मुलापासून या तिन्ही बाबतीत व्रत घेववितो, मग त्याला जाऊ देण्यास हरकत नाही येणार.” त्यांनी प्रतिज्ञा घेववली व मी मांस, मदिरा आणि स्त्रीसंग यांपासून दूर राहण्याची प्रतिज्ञा घेतली. आईने परवानगी दिली.

हायस्कुलात समारंभ झाला. राजकोटचा एक तरुण विलायतला जातो, याचे लोकांना नवल वाटले. उत्तरादाखल मी थोडे लिहून नेले होते. पण तेही मोठ्या शिकस्तीनेच वाचू शकलो. माझे डोके गरगरत होते, शरीर कापत होते, एवढे मला आठवते.

मातेची आज्ञा व आशीर्वाद घेऊन व काही महिन्यांच्या अपत्याला पत्नीसह सोडून मी मोठ्या हौसेने मुंबईत पोचलो. पोचलो खरा, पण तेथे मित्रमंडळींनी बंधूंना सांगितले की, “जून-जुलै महिन्यांमध्ये हिंदी महासागरात तुफान असते आणि याची तर ही पहिलीच समुद्रसफर. तरी याला दिवाळीनंतर म्हणजे नोव्हेंबर महिन्यात पाठविले पाहिजे.”

मध्यंतरी ज्ञातीमध्ये खळबळाट झाला. ज्ञातीची सभा बोलाविण्यात आली. मला तेथे हजर राहण्याबद्दल फर्मान आले. मी गेलो. मला एकाएकी धैर्य कोठून आले देव जाणे ! हजर होण्यात

मला यत्किंचितही संकोच किंवा भय वाटले नाही. ज्ञातीच्या प्रमुख शेठजीशी दूरचे नातेही होते. वडिलांचा व त्यांचा चांगला स्नेहसंबंध होता. त्यांनी मला सांगितले:

"ज्ञातीचे मत आहे की तू विलायतेला जाण्याचा विचार केला आहेस, तो बरोबर नाही. आपल्या धर्मामध्ये समुद्र ओलांडून जाण्याची मनाई आहे. शिवाय, विलायतेत धर्म सांभाळता येणार नाही असे आम्ही ऐकतो. तेथे साहेब लोकांबरोबर खावे-प्यावे लागणार !"

मी जबाब दिला, "मला तर वाटते, की विलायतेला जाण्यात बिलकुल अधर्म नाही. मला तिकडे जाऊन विद्याभ्यासच करावयाचा आहे. शिवाय, ज्या गोष्टींबद्दल आपल्याला भीती वाटते, त्या गोष्टींपासून दूर राहण्याची मी माझ्या मातोश्रीपाशी शपथ घेतली आहे. त्यामुळे मी त्यांपासून दूर राहू शकेन."

"पण आम्ही तुला सांगतो, की तिकडे धर्मपालन शक्यच नाही. तुझ्या वडिलांचा व माझा कशा तऱ्हेचा संबंध होता, ते तुला माहीतच आहे. माझे सांगणे तू मान्य केले पाहिजे." शेठ बोलले.

"आपल्याशी असलेला संबंध मला माहीत आहे. आपण मला वडिलांसमान आहात. परंतु या बाबतीत माझा निरुपाय आहे. विलायतेला जाण्याचा माझा निश्चय मी फिरवू शकत नाही. माझ्या वडिलांचे मित्र व सल्लागार, जे विद्वान ब्राह्मण आहेत, त्यांचे मत आहे की माझ्या विलायतेला जाण्यामध्ये काही वावगे नाही. माझ्या मातोश्रींची व बंधूंची परवानगीही मला मिळाली आहे." मी जबाब दिला.

"परंतु ज्ञातीचा हुकूम तू मानणार नाहीस ?"

"माझा निरुपाय आहे. मला वाटते, की या बाबतीत ज्ञातीने मध्ये न पडणे बरे."

या उत्तराने शेठजी क्रोधीत झाले. मला चार-दोन सुनावल्या. मी गप्प राहिलो. शेठजींनी हुकूम सोडला:

"या मुलाला आजपासून ज्ञातीबहिष्कृत समजण्यात येईल. जो कोणी त्याला मदत करील किंवा पोचवायला जाईल, त्याला ज्ञाती जाब विचारील व त्याला सव्वा रुपया दंड होईल."

माझ्यावर या घटनेचा काहीएक परिणाम झाला नाही. मी शेठजींची रजा घेतली. माझ्या बंधूंवर या ठरावाचा काय परिणाम होतो, ही एक विचारात घेण्यासारखी गोष्ट होती. ते भिऊन गेले तर ? सुदैवाने ते भक्कम राहिले आणि मला उत्तरी लिहिले, की ज्ञातीचा ठराव झाला तरी आपण स्वत: मला विलायतेला जाण्याच्या बाबतीत अटकाव करणार नाही.

माझी जागा पण मित्रमंडळींनी त्र्यंबकराव मजमुदारांच्या (हे त्या जुनागडच्या वकिलाचे नाव) खोलीमध्ये राखून घेतली. त्यांच्यापाशी माझी शिफारसही केली. ते प्रौढ अनुभवी गृहस्थ होते. मी अठरा वर्षांचा, दुनियेचा अनुभव नसलेला अल्पवयी तरुण होतो. मजमुदारांनी माझ्याबद्दल काळजी करू नका असे मित्रांना सांगितले.

अशा तऱ्हेने सन १८८८ च्या सप्टेंबरच्या चौथ्या तारखेला मी मुंबई बंदर सोडले.

# ९. एकदाचं विलायत गाठलं !

इंग्रजीत बोलण्याची मला सवयच नव्हती. मजमुदारांखेरीजचे सर्व उतारू इंग्रज होते. त्यांच्याबरोबर बोलता येईना. ते माझ्याशी बोलण्याचा प्रयत्न करीत, तर मला समज पडेना; आणि समजले तरी जबाब कसा द्यावा तेच कळेना. प्रत्येक वाक्य बोलण्यापूर्वी मनात जुळवावे लागे. काट्या-चमच्याने जेवता येईना आणि कोणत्या वस्तूत मांस नाही, हे विचारण्याचे धैर्य होईना. त्यामुळे मी जेवणाच्या टेबलाकडे कधी गेलोच नाही. खोलीतच जेवीत असे. बरोबर मेवामिठाई वगैरे घेतली होती, त्यावरच बहुतांशी चालवून घेतले. मजमुदारांना कसलीच अडचण नव्हती. ते सर्वांबरोबर मिसळून गेले. डेकवरही मोकळेपणाने जात. मी मात्र सबंध दिवस खोलीत कोंडलेला राही. क्वचित डेकवर थोडी माणसे असतील अशा वेळी तेथे थोडा वेळ बसून परत येई. मजमुदार मला सर्वांबरोबर मिसळायला, मोकळेपणाने गप्पागोष्टी करायला समजावून सांगत. वकिलाची जीभ बोलकी पाहिजे असेही सांगत. स्वतःचे वकिलीचे अनुभव सांगत. इंग्रजी ही काही आपली भाषा नव्हे, तीत चुका व्हायच्याच, तरी पण दडपून बोलत गेले पाहिजे, वगैरे उपदेश करीत. परंतु मला माझा भिडस्तपणा सोडता येईना.

एका भल्या इंग्रजाला माझी दया आली आणि त्याने माझ्याबरोबर बोलण्याचालण्यास सुरुवात केली. तो स्वत: वयाने मोठा होता. मी खातो काय, मी कोण, जाणार कोठे, कोणाशी बोलत चालत का नाही वगैरे प्रश्न तो विचारी. मला जेवण्याच्या जागी चलण्याबद्दल सुचवी. मांस न खाण्याच्या माझ्या आग्रहा-संबंधी ऐकून त्याला हसू आले. माझी दया येऊन तो म्हणाला, “येथपर्यंत (पोर्ट सय्यद येण्यापूर्वी) ठीक आहे. बिस्केच्या उपसागरात पोचलास की तू आपले विचार बदलशील. इंग्लंडात तर इतकी थंडी पडते, की मांसाशिवाय चालायचेच नाही.”

मी म्हटले, “मी ऐकले आहे, की तिकडे लोक मांसाहाराशिवाय राहू शकतात.”

ते म्हणाले, “ही खोटी गोष्ट आहे, असे समज. माझ्या ओळखीचा असा एकही गृहस्थ मला माहीत नाही की जो मांसाहार करीत नाही. हे पहा, मी दारू पितो, ती प्यायला मी तुला नाही सांगत; पण मांसाहार तर केलाच पाहिजे, असे मला वाटते.”

मी म्हटले, “तुमच्या सल्ल्याबद्दल मी आभार मानतो. परंतु मांस न खाण्याबद्दल मी माझ्या आईशी बांधलेला आहे. त्यामुळे मला मांस घेता येत नाही. जर त्याखेरीज चालतच नसेल तर मी परत हिंदुस्थानात जाईन, पण मांस नाही खाणार.”

बिस्केचा उपसागर आला. तेथेही मांसाची आवश्यकता भासली नाही, किंवा दारूचीही भासली नाही. कसाबसा प्रवास पुरा करून आम्ही साऊदॅम्पटन बंदरात येऊन पोचलो. त्या दिवशी शनिवार होता एवढे मला स्मरण आहे. बोटीवर मी काळे कपडे वापरीत असे. मित्रांनी माझ्यासाठी पांढऱ्या फ्लॅनेलची एक कोट-पाटलोण शिवविली होती. ते मी विलायतेत उतरताना वापरण्याचे ठरविले होते. सफेद कपडे जास्त शोभिवंत दिसतील अशी समजूत ! मी हे फ्लॅनेलचे कपडे घालून उतरलो. सप्टेंबर अखेरचे दिवस होते. असले कपडे वापरणारा मी एकटाच दिसत होतो. माझ्या पेट्या आणि त्यांच्या किल्ल्या तर ग्रिंडले कंपनीचे गुमास्ते अगोदरच घेऊन गेले होते. बाकीचे सर्व करतील तसे आपण करायचे असा विचार करून मी माझ्या किल्ल्याही देऊन टाकल्या !

बोटीमध्ये आम्हाला कोणी व्हिक्टोरिया हॉटेलमध्ये उतरण्याचा सल्ला दिला. त्यामुळे मजमुदार आणि मी तेथे गेलो. सफेद कपड्यांच्या शरमेमुळे माझी चुळबूळ अगोदरच चालली होती. त्यातच आणखी हॉटेलात जाताच समजले, की दुसऱ्या दिवशी रविवार असल्यामुळे सोमवारपर्यंत ग्रिंडलेकडून सामान येणार नाही. त्यामुळे माझा गोंधळच उडाला.

सात-आठ वाजता डॉ. मेहता आले. त्यांनी प्रेमाने माझी थट्टा केली. मला माहिती नसल्यामुळे मी त्यांची रेशमाने मढविलेली केसाळ टोपी पाहायला हातात घेतली आणि तिच्यावर उलटा हात फिरवला. त्यामुळे टोपीची लव उभी झाली. डॉ. मेहतांनी ते पाहताच मला लगेच थांबविले. पण गुन्हा तर होऊन चुकला होता. पुन: कधी होणार नाही, एवढाच त्यांच्या थांबविण्याचा परिणाम झाला. येथून माझा युरोपियन रीतिरिवाजांचा पहिला धडा सुरू झाला असे म्हणता येईल. डॉ. मेहता हसत हसत अनेक गोष्टींबद्दल समजूत देत होते: कोणाच्याही वस्तूला हात लावू नये; हिंदुस्थानात कोणाचीही ओळख होताच जे प्रश्न सहजी विचारता येतात, तसले प्रश्न विचारावयाचे नाहीत; बोलताना आवाज उंच चढवायचा नाही; हिंदुस्थानात साहेबांशी

बोलताना ‘सर’ म्हणण्याचा प्रघात आहे, तो अनावश्यक आहे; 'सर’ हे फक्त नोकर आपल्या धन्याला किंवा वरिष्ठ अंमलदाराला उद्देशून बोलतो. शिवाय, त्यांनी हॉटेलात राहण्याच्या खर्चाचीही गोष्ट काढली आणि एखाद्या खाजगी कुटुंबात राहण्याबद्दल सुचविले.

आम्हा दोघांना तर हॉटेलात येऊन फशी पडल्यासारखे झाले. हॉटेल पण महागडे. माल्टाला एक सिंधी उतारू चढले होते. त्यांची व मजमुदारांची चांगली मैत्री जमली होती. हे सिंधी उतारू लंडनचे चांगले माहितगार होते. त्यांनी आमच्यासाठी दोन खोल्या ठरवून देण्याचे काम हाती घेतले. आम्ही मान्य केले आणि सोमवारी सामान हाती येताच बिल चुकवून त्या सिंधी गृहस्थाने ठरविलेल्या खोल्यांत प्रवेश केला. मला आठवते, की माझ्या वाट्याचे हॉटेलचे बिल जवळजवळ तीन पौंड होते. मी तर थक्कच होऊन गेलो. तीन पौंड भरूनही पोटाचे हालच ! हॉटेलातील पदार्थांपैकी कोणताच आवडेना. एक वस्तू घ्यावी, ती आवडली नाही म्हणून दुसरी घ्यावी, पण पैसे मात्र दोहोंचेही दिले पाहिजेत. माझा आधार अजून मुंबईहून आणलेल्या फराळावर होता, असे म्हणण्यास हरकत नाही.

मला तर या खोल्यांत मुळीच करमेना.

एकसारखी आपल्या देशाची आठवण येई. मातेचे प्रेम मूर्तिमंत समोर उभे राही. रात्र पडली म्हणजे रडे कोसळे. घरच्या अनेक प्रकारच्या स्मरणांच्या चढाईपुढे निद्रा येणार तरी कोठून ? हे. दु:ख कोणाजवळ बोलून दाखविण्याचीही सोय नव्हती. बोलून उपयोग तरी काय ? कोणत्या उपायाने मनाचे समाधान होईल ते माझे मलाही समजेना. लोक विचित्र, राहणी विचित्र, घरे पण विचित्र! राहण्याची रीतभात सदरहूप्रमाणेच. काय बोलल्याने किंवा काय केल्याने या रितीभातीच्या नियमांचा भंग होत असेल त्याचाही पत्ता नाही. त्यातच भरीला खाण्यापिण्याचे बंधन आणि खाता येण्यासारखे जिन्नस; ते शुष्क आणि नीरस लागत. त्यामुळे माझी स्थिती अडकित्त्यात सापडलेल्या सुपारीसारखी झाली. विलायत तर आवडत नाही आणि परत स्वदेशी जाण्याची सोय नाही. विलायतेत आलो, त्याअर्थी तीन वर्षे पुरी करण्याचा निर्धार होता.

# खंड दुसरा: लंडनमध्ये विद्यार्थी म्हणून

## १०. माझी पसंती

डॉ. मेहता सोमवारी सकाळी मला व्हिक्टोरिया हॉटेलात भेटण्यास गेले. तेथे त्यांना आमचा नवा पत्ता मिळाल्यावर नवीन ठिकाणी आले. डॉ. मेहतांनी आमची खोली वगैरे पाहिली आणि डोके हलविले. “ही जागा नाही चालणार. या देशात येऊन नुसते पुस्तकी शिक्षण घेण्यापेक्षा येथील अनुभव घेण्याचेच जास्त महत्व आहे. त्यासाठी कोणत्या तरी कुटुंबात राहणे जरूरीचे आहे. परंतु तत्पूर्वी थोडेसे शिक्षण घेण्यासाठी तुम्ही... कडे राहावे असा मी विचार केला आहे. तिकडे तुम्हाला घेऊन जातो.”

मी ती सूचना आभारपूर्वक मान्य केली. त्या मित्राकडे गेलो. त्यांनी माझ्या बडदास्तीत काही न्यून ठेवले नाही. माझी आपल्या सख्ख्या भावाप्रमाणे काळजी घेतली. इंग्रजी रीतिरिवाज शिकवले. इंग्रजीत थोडेफार बोलण्याची सवय त्यांनीच लावली असे म्हणता येईल. माझ्या खाण्यापिण्याचा प्रश्न फारच बिकट झाला. मीठ मसाल्याखेरीजच्या भाज्या आवडेनात. माझ्यासाठी काय शिजवावे हेच घरधनीणबाईला सुचेना. सकाळी ओटच्या पिठाची लापशी होत असे, त्यामुळे पोट थोडे तरी भरे; पण दुपारी व रात्री उपासमार होई. मित्र मांसाहार करण्याबद्दल रोज समजूत घाली. मी आपल्या प्रतिज्ञेती आडकाठी सांगून स्वस्थ बसे. त्यांच्याशी वाद घालण्याची माझी ताकद नव्हती. दुपारी फक्त रोटी आणि तांदुळजाची भाजी व मुरंबा यावर राहत असे. रात्रीही तेच खाणे. मला असे दिसले, की रोटीचे दोन-तीन तुकडेच घेण्याची पद्धत आहे; जास्त मागण्याची लाज वाटे. मला भरपूर खाण्याची सवय होती. जठराग्नि प्रदीप्त होता आणि त्याची मागणी खूप असे. दुपारी काय किंवा संध्याकाळी काय, दुधाचे नाव नाही. माझी अशी स्थिती पाहून मित्र एक दिवस चिडले आणि म्हणाले, “हे बघ, तू माझा सख्खा भाऊ असतास तर मी तुला खात्रीने परत पाठवून दिले असते. निरक्षर आईला येथील स्थिती जाणून न घेता दिलेल्या वचनाची किंमत ती काय? त्याला प्रतिज्ञा म्हणताच येत नाही. मी तुला सांगतो, की कायद्याच्या दृष्टीनेही ती प्रतिज्ञा होत नाही. असल्या प्रतिज्ञेला चिकटून राहणे म्हणजे निव्वळ भ्रम आहे आणि

असा भ्रम उराशी बाळगून राहिलास तर तुला या देशातून काहीच मिळवून स्वदेशी जाता येणार नाही. तू तर म्हणतोस की तू मांस खाल्ले आहेस, तुला ते आवडलेही. जेथे खाण्याची मुळीच जरूर नव्हती तेथे खाल्लेस आणि खाण्याची खास जरूर आहे तेथे वर्ज्य; काय आश्चर्य आहे !"

माझ्याकडून एक नाही की दोन नाही. !

असले युक्तिवाद रोज चालत. बहात्तर रोग बरे करणारा एक नन्नाचा पाढाच माझ्यापाशी होता. मित्र जसजशी माझी समजूत घालण्याचा प्रयत्न करीत, तसतशी माझी दृढता वाढत जाई. रोज ईश्वरापाशी रक्षणाची याचना करीत असे आणि ते रक्षण मला मिळेही. ईश्वर म्हणजे काय ते मला कळत नव्हते. परंतु रंभेने शिकविलेली श्रद्धा आपले काम करून राहिली होती.

अजून अभ्यास सुरू झाला नव्हता. हिंदुस्थानात मी कधी वर्तमानपत्रे वाचली नव्हती. पण अभ्यासाने ती वाचण्याची आवड मी उत्पन्न करू शकलो. पण त्यात सुरुवातीला फार तर एक तास जात असे. मी आता हिंडणे सुरू केले. मला निरामिष, म्हणजे शाकाहार देणारे भोजनगृह शोधायचे होते. अशा तऱ्हेने भटकता भटकता मी एक दिवस फेरिंग्डन स्ट्रीटमध्ये जाऊन पोहोचलो. तेथे 'व्हेजिटेरियन रेस्तराँ (शाकाहारी भोजनगृह) हे नाव वाचले आणि लहान मुलाला आवडीची वस्तू मिळाल्याने जसा आनंद व्हावा तसा मला झाला. मी हर्षाने वेडा होऊन आत शिरणार त्यापूर्वीच दरवाजा-जवळील काचेच्या खिडकीत विकायची पुस्तके दिसली; त्यामध्ये मी सॉल्टचे 'अन्नाहाराचे समर्थन' या नावाचे पुस्तक पाहिले. एक शिलिंग देऊन विकत घेतले आणि जेवायला बसलो. इंग्लंडात आल्यानंतर प्रथमच येथे पोट भरून खायला मिळाले. ईश्वराने माझी भूक शांत केली !

सॉल्टचे पुस्तक वाचले. माझ्या मनावर त्याचा उत्कृष्ट परिणाम झाला. हे पुस्तक वाचल्या दिवसापासून मी स्वेच्छेने म्हणजे बुद्धिपूर्वक शाकाहाराच्या मताचा झालो. मातेपाशी केलेली प्रतिज्ञा आता मला विशेष आनंददायी वाटू लागली. अजूनपर्यंत मी 'सर्व लोक मांसाहारी बनतील तर चांगले' असे मानीत होतो. आणि प्रथम केवळ सत्यपालनार्थ व मागून प्रतिज्ञापालनार्थच मांसत्याग करीत होतो. तसेच पुढे कधी काळी स्वत: उघडपणे मनमुराद मांस खाऊ लागून

इतरांनाही मांसाहाऱ्यांच्या कंपूत ओढण्याची उमेद बाळगीत होतो. परंतु आता त्याच्या उलट स्वत: शाकाहारी राहून इतरांना तसे बनविण्याची इच्छा उत्पन्न झाली.

# ११. 'सभ्य' वेशात

इकडे माझ्या त्या मित्रांची माझ्याबद्दलची काळजी दूर झाली नव्हती. त्यांना माझ्यावरील प्रेमामुळे वाटे की, मी मांस खाल्ले नाही तर अशक्त बनेन. एकदा मला त्यांनी नाटकाला येण्याचे आमंत्रण दिले. तिकडे जाण्यापूर्वी मला त्यांच्याबरोबर हॉबर्न-भोजनगृहात जेवायचे होते. मी भीड बाळगून कोणतेही प्रश्न विचारणार नाही, या उद्देशाने माझे मित्र मला या ठिकाणी घेऊन आले होते. आम्ही दोघाजणांनी एक टेबल धरले. सभोवार शेकडो लोक होते. मित्राने पहिले वाढप मागविले. ते 'सूप' होते. मी बुचकळ्यात पडलो. ते कशापासून बनलेले आहे, हे समजेना, पण मित्राला विचारण्याची हिम्मत होईना. म्हणून मी वेटरला जवळ बोलावले. मित्र समजला. त्याने चिडून मला काय झाले म्हणून विचारले. मी हळूच संकोचपूर्वक म्हटले, "यात मांस आहे की काय ते मला विचारायचे आहे." तो रागाने म्हणाला, "असला जंगलीपणा येथे खपणार नाही. तुला असली कटकट लावायची असेल, तर तू एखाद्या बारक्या भोजनगृहात खाऊन ये आणि बाहेर माझी वाट पाहत बैस." या सांगण्याने मला आनंद झाला. मी उठून गेलो आणि दुसरी खाणावळ शोधू लागलो. शेजारीच एक अन्नाहार देणारे भोजनगृह होते, परंतु ते बंद होऊन गेले होते. आता काय करावे ते मला सुचेना. मी उपाशी राहिलो. आम्ही नाटकाला गेलो. मित्राने झाल्या प्रकाराबद्दल चकार शब्दही काढला नाही. मला तर बोलण्याची गरजच नव्हती.

पण हे आम्हा उभयतांमधील शेवटचे प्रेमयुद्ध होय. आमचा संबंध तुटला नाही किंवा आमच्यात वितुष्टही आले नाही. त्यांच्या या सर्व प्रयत्नांच्या मुळाशी असलेले त्यांचे मजवरील प्रेम मला दिसत होते. त्यामुळे विचार व आचार भिन्न असतानाही माझा त्यांच्याविषयीचा आदर वृद्धिंगतच झाला.

परंतु मला वाटले, की त्यांना माझ्यासंबंधी वाटत असंलेली भीती नाहीशी केली पाहिजे. मी निश्चय केला, की आता जंगली राहायचे नाही. सभ्यपणाची लक्षणे संपादन करायची आणि अन्य तऱ्हेने समाजामध्ये मिसळण्यास लायक बनून अन्नाहाराच्या बाबतीतील माझा विक्षिप्तपणा

झाकून टाकायचा. मी ‘सभ्यपणा’ संपादण्यासाठी छचोरपणाचा मार्ग पत्करला. तो माझ्या आवाक्याबाहेरचा होता.

विलायती फॅशनचे असले, तरी पण मुंबईत कापून शिवलेले कपडे उच्च इंग्रज समाजामध्ये शोभणार नाहीत, म्हणून ‘आर्मी अँण्ड नेव्ही' स्टोअरमध्ये कपडे करविले. एकोणीस शिलिंग (ही किंमत त्या काळच्या मानाने फारच मोठी म्हटली पाहिजे) किमतीची ‘चिमणी' टोपी डोक्यावर चढविली. एवढ्याने समाधान न होता बाँड स्ट्रीटमध्ये म्हणजे जेथे विशेष शौकीन लोकांचे कपडे शिवले जात, तेथे जाऊन दहा पौंड पाण्यात टाकून संध्याकाळी घालायचा पोषाख बनविला. भोळ्या व उदार दिलाच्या वडील बंधूंमार्फत खास सोन्याचा शेडा, जो दोन्ही खिशांत अडकवून लटकवितात, तो मागविला आणि तो मिळालाही. तयार बांधलेला टाय वापरणे हा शिष्टाचार समजत नाहीत, म्हणून टाय बांधण्याची कला हस्तगत करून घेतली. घरी आरसा हजामतीच्या दिवशीच पाहायला मिळायचा; परंतु येथे तर मोठ्या आरशासमोर उभे राहून टाय बरोबर बांधण्यात आणि केस चापून भांग पाडण्यात रोज दहाएक मिनिटांचा तरी व्यय व्हायचाच. केस नरम नव्हते, त्यामुळे त्यांना चांगले वळवून सरळ राखण्यासाठी रोज ब्रशबरोबर लढाई होई. दरवेळी टोपी घालता काढताना भांग सांभाळण्यासाठी हात डोक्याकडे गेलाच म्हणून समजावे. शिवाय, अधूनमधून चारचौघांत बसलो असताना भांगावरून हात फिरवून केस जेथल्या तेथे राखण्याची निराळीच आणि सभ्यपणाची क्रिया चालायची !

परंतु एवढी टापटीपही पुरेशी नव्हती. नुसत्या सभ्य पोशाखाने थोडेच सभ्य होता येणार ? सभ्यपणाचे इतर काही प्रकारही मी समजून घेतले होते आणि त्यांचाही अभ्यास करायचा होता. सभ्य गृहस्थाला नाचता आले पाहिजे. त्याला फ्रेंचही नीट आले पाहिजे. कारण फ्रेंच ही इंग्लंडचा शेजारी देश फ्रान्स याची भाषा होती आणि सबंध युरोपचीही ती राष्ट्रभाषा होती. माझी युरोपभर हिंडण्याची इच्छा होती. शिवाय सभ्य गृहस्थाला छटादार भाषणही करता आले पाहिजे. मी नृत्य शिकून घेण्याचा निश्चय केला. एका वर्गात दाखल झालो. एका सत्राचे तीनएक पौंड भरले. तीन आठवड्यांत सुमारे सहा धडे घेतले असतील. बरोबर तालबद्ध पाऊल पडेना. पियानो वाजे, परंतु

त्याच्या सुरांचा अर्थ काय, याचा पत्ता लागेना. आता तर बावाजीच्या मांजरीसारखी स्थिती झाली. उंदरांचे निवारण करण्यासाठी मांजर, मांजरासाठी गाय अशा तऱ्हेने बावाजीचा परिवार वाढला. व्हायोलिन वाजवायला शिकलो, म्हणजे तालासुराची माहिती होईल. व्हायोलिन विकत घेण्यात तीन पौंड कृष्णार्पण केले आणखी काही शिकण्यासाठी! भाषण करण्यास शिकण्यासाठी तिसऱ्या शिक्षकाचे घर धुंडाळले. त्याच्याही हातावर एक गिनी ठेवली. बेलचे 'स्टँडर्ड इलोक्युशनिस्ट' घेतले. पिटचे भाषण सुरू करविले.

पण लवकरच मी स्वतःला प्रश्न विचारण्यास सुरुवात केली.

मला इंग्लंडात जन्म थोडाच काढायचा आहे ? छटादार भाषण करायला शिकून मी करणार काय ? नाच नाचून मी सभ्य कसा बनणार ? व्हायोलिन शिकायचे तर स्वदेशीही शिकता येईल. मी विद्यार्थी आहे. मला विद्याधन जोडले पाहिजे. मला माझ्या धंद्यासाठी आवश्यक ती तयारी केली पाहिजे. माझ्या सद्वर्तनावरून मला सभ्य म्हटले, तर ठीक नाही तर तो नाद सोडून दिला पाहिजे.

या विचारांच्या तंद्रीत असतानाच मी वरील आशयाचे पत्र वक्तृत्व शिक्षकाला पाठविले. त्यांच्यापाशी मी दोन की तीनच धडे घेतले होते. नृत्य शिकविणाऱ्या बाईलाही तसेच पत्र लिहिले. व्हायोलिनच्या शिक्षिकेकडे व्हायोलिन घेऊन गेलो. येईल त्या किमतीला ते विकून टाकण्याची तिला परवानगी दिली. तिच्याशी काहीसा मित्रत्वाचा संबंध जुळला होता, म्हणून तिच्याशी माझ्या मोहाची गोष्ट बोललो. नृत्य इत्यादींच्या उठाठेवीतून मोकळे होण्याचा माझा विचार तिला पसंत पडला.

'सभ्य' बनण्याचा हा माझा नाद तीनेक महिने चालला असेल. पोषाखाची टापटीप कित्येक वर्षेपर्यंत टिकली. पण मी विद्यार्थी बनलो.

# १२. फेरफार

नृत्य इत्यादींच्या माझ्या प्रयोगांवरून तो काळ माझ्या स्वच्छंदीपणाचा होता, असे कोणी समजू नये. त्यात समजुतीचाही काही भाग होता, हे वाचकांच्या ध्यानात आले असेल. या मोहाच्या काळातही मी अमुक अंशाने, सावधान होतो. पैन् पैचा हिशेब ठेवीत असे.

माझ्या राहणीवर माझी कडक नजर होती. त्यामुळे किती खर्च करणे योग्य, हे माझ्या लक्षात आले. आता मी खर्च अर्धा करून टाकण्याचा विचार केला. हिशेब तपासताना मला दिसले, की माझा गाडीभाड्याचा खर्च वाजवीपेक्षा बराच जास्त होत होता. शिवाय कुटुंबात राहिल्यामुळे, काही ठराविक रक्कम आठवड्याला खर्च केल्याखेरीज गत्यंतरच नव्हते. कुटुंबातल्या माणसांना एखाद्या दिवशी बाहेर जेवायला नेण्याचा शिष्टाचार पाळणे आवश्यक होते. शिवाय, एखाद्या वेळेस त्यांच्याबरोबर कोठे तरी मेजवानीला जावे लागल्यास तेथे गाडीभाड्याचा खर्च व्हावयाचाच. बरोबर एखादी मुलगी असल्यास तिचा खर्च तिच्यावर टाकणे योग्य नव्हते. शिवाय, बाहेर गेले की घरी जेवायला जाता येत नसे. तेथे पैसे दिलेले असायचेच आणि पुन: बाहेर खाण्याचे पैसे दुसरे दिलेच पाहिजेत. अशा रीतीने होणारा फाजील खर्च वाचविता येईल असे लक्षात आले. भीडेखातरच खर्च होत होता, तोही वाचविता येईल, ही गोष्ट लक्षात आली. आतापर्यंत इतर कुटुंबांत राहत होतो, त्याऐवजी स्वत:ची खोली घेऊन राहावे, असा विचार केला. कामाच्या सोयीप्रमाणे तसेच अनुभव मिळावा म्हणून निरनिराळ्या मोहल्यांत बिऱ्हाड बदलावे असाही विचार केला. घरे अशा ठिकाणी पसंत केली, की तेथून कामाच्या जागी अर्ध्या तासात चालत जाता यावे आणि गाडीभाडे वाचावे. यापूर्वी नेहमी इच्छित ठिकाणी जाण्यासाठी गाडीभाडे खर्चावे लागे आणि पुन्हा फिरायला जाण्यासाठी निराळा वेळ काढावा लागत असे. आता कामावर जातानाच फिरणे होऊन जाईल अशी व्यवस्था झाली. आणि या व्यवस्थेमुळे मी रोज ८-१० मैल सहज फिरत असे. मुख्यत: या एकाच सवयीमुळे इंग्लंडात मी क्वचितच आजारी पडलो असेन. शरीर चांगले कसले.

कुटुंबात राहण्याचे सोडून दोन खोल्या भाड्याने घेतल्या; एक निजण्यासाठी आणि दुसरी बसण्या-उठण्यासाठी. येथून माझ्या विलायतेच्या जीवनक्रमातील दुसरा अध्याय सुरू झाला असे म्हणण्यास हरकत नाही. अजून तिसरा फेरफार यानंतर व्हावयाचा होता.

अशा रीतीने अर्धा खर्च वाचला. पण वेळेचे काय ? मला माहीत होते की बॅरिस्टरीच्या परीक्षेसाठी फारशा अभ्यासाची गरज नव्हती. त्यामुळे धीर वाटत होता. इंग्रजीचे माझे अर्धे-कच्चे ज्ञान मला नेहमी टोचत होते. लेलीसाहेबांचे "तू बी.ए. हो, नंतर ये" हे शब्द मला सलत होते. बॅरिस्टरीच्या अभ्यासाशिवाय दुसरा अभ्यासही केला पाहिजे. यासाठी मी ऑक्सफर्ड-केम्ब्रिजची माहिती मिळवली. कित्येक मित्रांना भेटलो. त्यावरून दिसले, की तेथे गेले असता खर्च फार वाढणार आणि तेथील अभ्यासक्रमही लांबलचक. मला तीन वर्षांवर राहणे शक्य नव्हते. एका मित्राने सांगितले, "जर तुला एखादी कठीण परीक्षाच द्यायची असली, तर तू लंडनची मॅट्रिक्युलेशन पास हो. त्यासाठी भरपूर मेहनत करावी लागेल आणि सामान्य ज्ञान वाढेल. खर्च तर मुळीच वाढणार नाही." ही सूचना मला आवडली. परीक्षेचे विषय पाहिल्यावर मनाने उलट खाल्ली. लॅटीन आणि दुसरी एक भाषा आवश्यक. लॅटीनचा अभ्यास कसा व्हावा ? पण मित्राने सुचविले की, "वकिलाला लॅटीन भाषेचा फार उपयोग होतो. लॅटीन जाणणाऱ्याला कायद्याची पुस्तके समजणे सोपे जाते. शिवाय, रोमन लॉच्या परीक्षेत तर एक प्रश्न फक्त लॅटीन भाषतच असतो. आणि लॅटीन शिकल्यास इंग्रजी भाषेवरचा ताबाही वाढेल." या सर्व मुद्दयांचा माझ्यावर परिणाम झाला. कठीण असो वा नसो, पण लॅटीन तर शिकायचेच; घेतलेले फ्रेंचही पुरे करायचे. अर्थात दुसरी भाषा फ्रेंच हेही ठरलेच. एक खाजगी मॅट्रिक्युलेशन वर्ग चालत असे, त्यात नाव घातले. परीक्षा दर सहा महिन्यांनी होत असे. मला जेमतेम पाच महिन्यांचा अवधी होता. हे काम माझ्या आवाक्याबाहेरचे होते. परिणाम असा झाला, की मी शिष्ट बनणार होतो, तो उद्योगी विद्यार्थी बनलो. वेळापत्रक तयार केले. मिनिटा-मिनिटाचा उपयोग करू लागलो. पण मी इतर विषयांचा अभ्यास करून शिवाय लॅटीन किंवा फ्रेंच पुरे करू शकेन इतकी माझी बुद्धी किंवा स्मरणशक्ती तीव्र नव्हती. परीक्षेस बसलो; पण लॅटीनमध्ये नापास झालो. वाईट वाटले, पण धीर सोडला नाही. लॅटीनमध्ये गोडी वाटू लागली होती. फ्रेंच जास्त चांगले करण्याचा व विज्ञानशास्त्रात

नवीन विषय घेण्याचा विचार केला. रसायन-शास्त्रात, ज्यात आता मला वाटते की खूप गोडी वाटायला पाहिजे-प्रयोगांच्या अभावी मन रमेना. हिंदुस्थानात या विषयाचा अभ्यास करावा लागलाच होता, म्हणून लंडन मेट्रिकसाठीदेखील हाच विषय पसंत केला. यावेळी प्रकाश आणि उष्णता हा विषय मी घेतला. हा विषय सोपा मानला जात असे आणि मलाही तो सोपा वाटला.

पुन: परीक्षा देण्याच्या तयारीबरोबरच मी राहणीत जास्त साधेपणा आणण्याचा प्रयत्न सुरू केला. मला वाटले की अजून माझ्या कुटुंबाच्या गरिबीला साजेसे माझे जीवन साधे नाही. बंधूंच्या औदार्याचा व अडचणींचा विचार मनात येऊन मला संकोच वाटू लागला. जे लोक पंधरा पौंड किंवा आठ पौंड दर महिन्याला खर्च करीत होते, त्यांना शिष्यवृत्या मिळत होत्या. माझ्यापेक्षा अधिक साधेपणाने राहणारे विद्यार्थीही मला दिसत होते. अशा कितीतरी विद्यार्थ्यांचा माझ्याशी संबंध आलेला होता. एक विद्यार्थी लंडनच्या कंगाल भागात आठवड्याचे दोन शिलिंग देऊन एका खोलीत रहात होता व लोकार्टच्या स्वस्त कोकोच्या दुकानात दोन पेनीचा कोको आणि रोटी खाऊन निर्वाह करीत होता. त्याच्याशी स्पर्धा करण्याची तर माझी शक्ती नव्हती. पण दोहोंच्याऐवजी एका खोलीत खुशाल राहू शकेन आणि अर्धा स्वयंपाक मी हातानेदेखील करून घेऊ शकेन असे मला वाटले. असे केल्याने मी दर महिन्याला चार-पाच पौंडांत राहू शकलो. साध्या राहणीविषयीची पुस्तके-देखील माझ्या वाचनात आली होती. दोन खोल्या सोडून देऊन आठवड्याला आठ शिलिंगच्या भाड्याची एक खोली घेतली, एक शेगडी विकत घेतली आणि सकाळचा स्वयंपाक हाताने करायला सुरुवात केली. स्वयंपाकात जास्तीत जास्त वीस मिनिटे जात असत. ओटमीलची लापसी आणि कोकोसाठी पाणी एवढे उकळण्यास कितीसा वेळ जाणार ? दुपारी बाहेर जेवून घ्यावे व संध्याकाळी पुनः कोको करून रोटीबरोबर घ्यावा. अशा रीतीने दररोज एक ते सव्वा शिलिंगमध्ये खाणे कसे भागवावे, हे मी शिकलो. हा माझा जास्तीत जास्त अभ्यासाचा काळ होता. जीवनक्रम साधा झाल्यामुळे बराच वेळ वाचला. दुसऱ्या वेळी परीक्षेस बसलो आणि पास झालो.

वाचकांनी असे समजू नये, की साधेपणामुळे माझा जीवनक्रम नीरस झाला. उलट फेरफारांमुळे माझी मनस्थिती बाह्य स्थितीशी समरस झाली. कौटुंबिक स्थितीशी माझ्या स्वत:च्या

राहणीचा मेळ बसला. जीवनक्रम अधिक सत्यमय झाला व त्यामुळे आत्मानंदाला सीमा राहिली नाही.

जीवनाविषयी मी जो जो बारकाईने विचार करू लागलो, तो तो मला माझ्या अंतर्बाह्य आचारात फरक करण्याची गरज भासू लागली. मी आपल्या आहारामध्ये फेरफार करू लागलो. घरून मिठाई, मसाला वगैरे मागविले होते, ते रद्द केले आणि मनाने निराळेच वळण घेतले. त्यामुळे मसाले वगैरेंचा शौक मावळू लागला आणि जी भाजी रिचमंडमध्ये मसाल्याच्या अभावी बेचव लागत होती, तीच नुसती उकडून स्वादिष्ट वाटू लागली. असल्या अनेक अनुभवांवरून मला कळून आले, की स्वादाचे खरे स्थान जीभ नव्हे, तर मन आहे.

आर्थिक दृष्टी तर माझ्यापुढे होतीच. त्यावेळी चहा-कॉफीला अपायकारक मानणारा व कोकोचा पुरस्कार करणारा असाही एक पंथ होता. शरीरव्यापारासाठी जरूर तेवढ्याच वस्तू घेणे योग्य आहे, एवढे मला समजले होते. म्हणून चहा-कॉफीचा बहुतांशी त्याग केला व त्याऐवजी कोको घेऊ लागलो.

वरील प्रयोगांबरोबरच इतर किरकोळ प्रयोग चालूच होते; कधी पिठूळ पदार्थ वर्ज्य करण्याचा, कधी फक्त रोटी आणि फळे खाऊन राहण्याचा, तर कधी लापसी, दूध आणि अंडी एवढेच घेण्याचा. हा शेवटला प्रयोग विशेष लक्षात घेण्यासारखा आहे. तो पंधरा दिवसही चालला नाही. पिठाशिवायच्या आहाराचे समर्थन करणाऱ्याने अंड्यांची खूप स्तुती केली होती आणि अंडी म्हणजे मांस नव्हे असे सिद्ध केले होते. ती घेतल्याने जिवंत प्राण्यांना दु:ख होत नाही हे तर खरेच. या युक्तिवादाने भुरळून मी आईला वचन दिलेले असूनही अंडी खाल्ली. परंतु माझी भुरळ क्षणिक होती. प्रतिज्ञेचा नवा अर्थ लावण्याचा मला अधिकार नव्हता. प्रतिज्ञा देणाऱ्याचाच अर्थ प्रमाण मानला पाहिजे. मांस न खाण्याची प्रतिज्ञा देणाऱ्या मातेला अंड्यांची कल्पनाही नसणार हे मला माहीत होते. त्यामुळे मला प्रतिज्ञेच्या रहस्याची जाणीव होताच मी अंडी सोडली आणि तो प्रयोगही सोडून दिला.

माझ्या बाबतीत नवीन धर्मात प्रवेश केल्याप्रमाणे झाले होते. नवधर्मियांचा उत्साह माझ्यामध्ये आला होता. त्यामुळे मी ज्या पेठेत रहात असे, त्या पेठेत अन्नाहारी मंडळाची स्थापना करण्याचा मी निश्चय केला. ही पेठ म्हणजे बेजवॉटरची होय. त्या पेठेत सर एडविन आर्नल्ड राहत असत. त्यांना उपाध्यक्ष होण्याबद्दल विनंती केली. ते झाले. डॉ. ओल्डफील्ड अध्यक्ष झाले. मी मंत्री (चिटणीस) झालो. जेमतेम काही दिवसांपर्यंत ही संस्था चालली; परंतु काही महिन्यांनंतर तिचा शेवट झाला. कारण, मी माझ्या वहिवाटीप्रमाणे ठराविक मुदतीनंतर ती पेठ सोडली. परंतु या लहानशा व अल्पावधीतील अनुभवाने मला संस्था काढण्याचा व चालविण्याचा किंचित अनुभव मिळाला.

# १३. लाजाळूपणा हीच माझी ढाल

अन्नाहारी मंडळाच्या कार्यवाहक समितीवर माझी निवड तर झाली. तिच्या प्रत्येक सभेला मी हजरही राहत असे. परंतु बोलायला जीभ उचलत नसे. हा लाजाळू स्वभाव पुढे दक्षिण आफ्रिकेत सुटला असे म्हणता येईल. पूर्ण सुटला असे अजूनही म्हणता येणार नाही. बोलायचे म्हणजे विचार पडतोच.

बोलताना संकोच वाटतो. भाषण करण्याचे चुकविता आले तर अवश्य चुकवितो. मंडळीत बसलो असता काही विशेष बोलू शकेन किंवा बोलण्याची इच्छा होईल अशी आजही स्थिती नाही.

परंतु असल्या लाजाळू स्वभावामुळे माझी फजिती होण्यापलीकडे माझे काही नुकसान झालेले नाही; उलट फायदाच झाला आहे, असे आता वाटते. बोलताना वाटणाऱ्या संकोचाबद्दल पूर्वी मला खेद वाटे, त्याऐवजी आता आनंदच वाटतो. मोठा फायदा हा झाला, की मी शब्दांची काटकसर शिकलो. ज्याला थोडेच बोलायचे असते, तो विचार केल्याशिवाय बोलणार नाही, स्वत:चा प्रत्येक शब्द तोलून बोलेल. ही संकोचवृत्ती माझी ढाल होती. तिच्यामुळे मला परिपक्व होण्याची संधी मिळाली. सत्याच्या माझ्या उपासनेमध्ये मला तिची फार मदत झाली.

# १४. धार्मिक परिचय

विलायतेत राहून एक वर्ष झाले असेल, तेवढ्यात दोन थिऑसॉफिस्ट मित्रांची ओळख झाली. दोघे सख्खे भाऊ होते व अविवाहित होते. त्यांनी माझ्यापाशी गीतेसंबंधी गोष्ट काढली. ते एड्विन आर्नल्डचे गीतेचे भाषांतर वाचीत असत. परंतु मला त्यांनी ती आपल्याबरोबर संस्कृतात वाचण्यास बोलाविले. मला लाज वाटली, कारण मी गीता संस्कृतात किंवा प्राकृतातही वाचली नव्हती! मला त्यांना सांगावे लागले, की "मी गीता वाचलेलीच नाही; पण तुमच्याबरोबर वाचण्याची माझी तयारी आहे. माझे संस्कृतचे अध्ययनही नावाचेच आहे. मला ते इतपतच समजेल, की भाषांतरात भलताच अर्थ असला तर तो दुरुस्त करता येईल." अशा तऱ्हेने त्या बंधूंबरोबर मी गीता वाचण्यास प्रारंभ केला. दुसऱ्या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकांपैकी,

ध्यायतो विषयान्पुंस: सड्गस्तेषूपजायते।
सड्गात्संजायते काम:कामात्क्रोधोऽभिजायते।।
क्रोधात्भवति संमोह:संमोहात्स्मृतिविभ्रम:।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात् प्रणश्यति।।*

या श्लोकाचा माझ्या मनावर खोल ठसा उमटला. त्याचे ध्वनी माझ्या कानात घुमत राहिले. भगवद्गीता हा अमूल्य ग्रंथ आहे अशी माझी त्यावेळी समजूत झाली. ती समजूत हळूहळू दृढ होत गेली व आज तत्त्वज्ञानाच्या बाबतीत मी तिला सर्वोत्तम ग्रंथ समजतो. माझ्या निराशेच्या प्रसंगी त्या ग्रंथाने मला अमूल्य मदत दिली आहे.

याच मित्रांनी मला आर्नल्डचे बुद्धचरित्र वाचण्याची शिफारस केली. तोपर्यंत सर एड्विन आर्नल्डच्या गीता-भाषांतराचीच मला माहिती होती. बुद्धचरित्र मी भगवद्गीतेपेक्षाही अधिक आवडीने वाचले. पुस्तक हातात धरल्यानंतर ते पुरे केल्यावरच खाली ठेवू शकलो. मला स्मरते, की त्याच मित्रांच्या सांगण्यावरून मी मॅडम ब्लॅवॅट्स्कीचे 'की टु थिऑसॉफी' हे पुस्तक वाचले. त्यावरून हिंदुधर्माचे ग्रंथ वाचण्याची इच्छा झाली; आणि 'हिंदुधर्म म्हणजे भ्रमाचे जाळे', अशा तऱ्हेचा जो अभिप्राय पाद्र्यांच्या तोंडून ऐकत असे, तो मनातून पार नाहीसा झाला.

याच सुमाराला एका अन्नाहारी वसतिगृहा-मध्ये मला मँचेस्टरचे एक भले ख्रिस्ती गृहस्थ भेटले. त्यांनी माझ्याशी ख्रिस्ती धर्माची गोष्ट काढली. मी त्यांच्यापाशी माझ्या राजकोटच्या स्मरणाचे वर्णन केले. ते ऐकून त्यांना वाईट वाटले. ते म्हणाले, “मी स्वतः अन्नाहारी आहे. मद्यपानही करीत नाही. पुष्कळ ख्रिस्ती लोक मांसाहार करतात, मद्यपान करतात हे खरे; परंतु या दोन्हींपैकी कोणताही पदार्थ घेण्याबद्दल ख्रिस्ती धर्माची आज्ञा नाही. तुम्ही बायबल वाचावे, अशी मी आपणांस शिफारस करतो.” मी त्यांची सूचना मान्य केली. बायबल त्यांनीच विकत घेऊन दिले. मला अंधुक स्मरण आहे, की ते गृहस्थ स्वत: बायबल विकत असत. त्यांनी नकाशे, अनुक्रमणिका वगैरे असलेले बायबल मला विकत दिले. मी ते सुरू केले, परंतु ‘जुना करार' माझ्याने वाचवेच ना.

‘नव्या करारा'वर आलो तेव्हा निराळाच परिणाम झाला. येशूच्या गिरिप्रवचनाची छाप फार चांगली पडली. ते हृदयात उतरले. बुद्धीने त्याची गीतेशी तुलना केली. “तुझा सदरा मागेल त्याला कोटही दे. तुझ्या उजव्या गालावर थप्पड मारील त्याच्यासमोर डावा गालही धर !” हे वाचून मला अपार आनंद झाला. शामळभट्टाचा छप्पा* आठवला. माझ्या बालमनाने गीता, आर्नल्डकृत बुद्धचरित्र आणि येशूची वचने यांचे एकीकरण केले. धर्म त्यागामध्ये आहे, ही गोष्ट मनाला पटली.

एवढ्या माहितीपलीकडे मी प्रगती करू शकलो नाही. माझ्या परीक्षेच्या पुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तके वाचण्याला मला वेळच काढता येईना. परंतु आपण धर्मग्रंथ वाचले पाहिजेत आणि सर्व मुख्य धर्मांचे योग्य ज्ञान मिळविले पाहिजे, एवढी खूणगाठ मनाशी बांधली.

---

* विषयांचे चिंतन करणाऱ्यास प्रथम त्यांच्याबद्दल संग उत्पन्न होतो; संगापासून कामना उत्पन्न होते; कामनेच्या पाठोपाठ क्रोध येतो; क्रोधातून संमोह, संमोहातून स्मृतिभ्रम आणि स्मृतिभ्रमामुळे बुद्धिनाश होतो आणि अखेरीस त्या पुरुषाचा स्वतःचा नाश होतो.

# खंड तिसरा: बॅरिस्टर म्हणून भारतात

## १५. भारतात परत

वकिलीची परीक्षा पास केली. १८९१ मध्ये जूनच्या १० तारखेला मला बॅरिस्टरचा किताब मिळाला. ११ तारखेला इंग्लंडच्या हायकोर्टात अडीच शिलिंग भरून माझे नाव नोंदविले. १२ जूनला हिंदुस्थानला परत येण्यासाठी निघालो.

पण माझ्या निराशेला व भीतीला सीमा नव्हती. कायदे वाचले खरे; पण वकिली करता येईल असे मला काही एक येऊ लागलेले नाही असे वाटे. कायदे वाचले खरे, पण वकिली कशी चालवायची ते समजून घेतले नाही. शिवाय जे कायदे वाचले, त्यात हिंदुस्थानच्या कायद्यांचे नावही नव्हते. दावा कसा मांडावा, अर्ज कसा तयार करावा, वगैरे माहिती नव्हती, वकिली करून पोट भरण्याची शक्ती तरी येईल की नाही याबद्दल मला मोठी शंका वाटू लागली.

मुंबईला आम्ही गोदीत पोचलो, तो तेथे माझे वडील बंधू हजरच होते. आईला भेटण्याची मला उत्कंठा लागली होती. मातोश्रीच्या निधनाची मला वार्ताही नव्हती. मला ही बातमी विलायतेतही पोहचू शकली असती; परंतु तिच्यापासून मला लागणारा धक्का कमी करण्याच्या इराद्याने मी मुंबईस पोहोचेपर्यंत मला बातमी लागू न देण्याचा वडील बंधूंनी निश्चय केला होता. ही बातमी म्हणजे माझ्यासाठी फार मोठा धक्का होता. वडिलांच्या मृत्यूने झाला त्याहूनही फारच मोठा आघात मला ही बातमी ऐकून झाला. माझ्या मनातील पुष्कळ आकांक्षा खुंटल्या. तरीही मला आठवते, की ही मृत्यूची बातमी ऐकून मी ओक्साबोक्शी रडलो नाही. मी माझे अश्रूही बहुतांशी आवरू शकलो आणि जणू काय मातेचा मृत्यू घडलेलाच नाही अशा तऱ्हेने रोजचे व्यवहार सुरू ठेवले.

माझ्या ज्ञातीचा झगडा तयारच होता. दोन पक्ष पडले होते. एका पक्षाने मला लगेच ज्ञातीत घेतले; दुसरा पक्ष न घेण्याबद्दल भक्कम राहिला. ज्या पक्षाने मला वाळीत टाकले होते, त्यात प्रवेश मिळविण्याचा मी कधी प्रयत्नही केला नाही. त्याचप्रमाणे जातीच्या कोणाही शेठजीविषयी

माझ्या मनात लवमात्र क्रोधही आला नाही. माझ्याकडे तिरस्कारयुक्त दृष्टीने पाहणारे त्यांमध्ये काहीजण होते. त्यांच्याशीही मी नम्रपणे वागत असे. ज्ञातीच्या बहिष्काराच्या ठरावाला संपूर्णपणे मान देत असे. माझ्या सासू-सासऱ्यांकडे किंवा बहिणीकडे पाणीही पीत नसे. ती मला गुप्त रीतीने खायला प्यायला द्यायला तयार असत; पण जी गोष्ट उघडपणे करता येत नाही, ती लपून छपून करणे माझ्या मनालाच मान्य होईना.

माझ्या या वर्तनाचा परिणाम असा झाला की ज्ञातीकडून कधी कसलाही उपसर्ग झाल्याचे मला स्मरत नाही. एवढेच नव्हे, पण ज्ञातीच्या एका भागाकडून अजूनही मी कायदेशीरदृष्ट्या बहिष्कृतच आहे, तरी त्यांच्याकडूनही मला आदर व उदारता अनुभवावयास मिळाली. त्यांनी मला माझ्या कार्यामध्ये मदतही केली; आणि ज्ञातीच्या दृष्टीने काही करावे अशी माझ्यापासून त्यांनी अपेक्षाही ठेवली नाही. माझी समजूत आहे, की हा मधुर परिणाम अप्रतिकारामुळेच घडून आला. ज्ञातीत सामील होण्याचा मी प्रयत्न केला असता, आणखी तडा पाडण्याचा प्रयत्न केला असता, ज्ञातिबंधूंना त्रास दिला असता, तर ते खात्रीने माझ्याविरुद्ध उठले असते आणि मी विलायतेहून येताच तटस्थ व अलिप्त राहण्याऐवजी लटपटी करण्यात चूर होऊन असत्याचा पुरस्कर्ता बनलो असतो.

राजकोटला लगेच धंदा सुरू केला तर हसे मात्र व्हायचे. राजकोटात पास झालेल्या वकिलांविरुद्ध उभे राहण्यापुरते माझ्याजवळ ज्ञान नाही आणि फी मात्र दसपट पाहिजे ! मला वकील नेमायला असा कोणता वेडा अशील तयार होणार ?

मित्रमंडळींचा असा सल्ला पडला की मी थोडे दिवस मुंबईला जाऊन हायकोर्टाचा अनुभव घ्यावा व हिंदुस्थानच्या कायद्याचा अभ्यास करावा. त्यांचा सल्ला मानून मी मुंबईला जायला निघालो. पण मला चार-पाच महिन्यांहून अधिक काळापर्यंत मुंबईत राहता येण्यासारखे नव्हतेच; कारण खर्च वाढला आणि कमाई काहीच नाही. इतक्यात, ममीबाईचा दावा माझ्या नशिबी आला. स्मॉलकॉझ कोर्टात जायचे होते.

“दलालाला कमिशन द्यावे लागेल.”

मी साफ नाकारले.

“पण फौजदारी कोर्टात मुरलेले श्री ... महिन्याला तीन-चार हजार कमावणारे, तेही कमिशन देतात.”

“पण मला कुठे त्यांच्या तोडीचा व्हायचे आहे ? मला दरमहा ३०० रुपये मिळाले तरी बस्स होतील. वडिलांना कुठे जास्त मिळत होते ?”

“पण ते दिवस गेले. मुंबईचा खर्च मोठा. व्यवहाराकडेही पाहिले पाहिजे.”

मी माझ्या निर्धारापासून अणुमात्र ढळलो नाही. कमिशन नाहीच दिले, तरीही ममीबाईचे काम मिळालेच. काम सोपे होते. मला दावा तयार करण्याबद्दल रु. ३० मिळाले. दावा एक दिवसाहून अधिक काळ चालण्यासारखा नव्हता.

स्मॉलकॉझ कोर्टात पहिल्यांदाच पाऊल टाकले. मी प्रतिवादीतर्फे होतो, त्यामुळे मला उलटतपासणी करायची होती. मी उभा राहिलो खरा, पण पाय कापू लागले, डोके फिरू लागले. मला वाटे कोर्टच फिरते आहे. प्रश्न विचारण्याचे सुचेच ना. न्यायाधीश हसले असतील. वकिलांना तर गंमतच वाटली असणार. पण माझ्या दृष्टीला कुठे काय दिसत होते ? मी बसलो. दलालाला सांगितले, “हे काम माझ्याने नाही चालवणार; पटेलांना नेमा. मला दिलेली फी परत घ्या.” पटेलांना त्याच दिवसाचे एकावन्न रुपये देऊन नेमले. त्यांना तो दावा खेळासारखा होता.

मी पळ काढला. अशिलाचा जय झाला की पराजय ते मला स्मरत नाही. मला शरम वाटली. पुरी हिंमत वाटू लागेपर्यंत दावा न घेण्याचा मी निश्चय केला आणि दक्षिण आफ्रिकेत जाईपर्यंत कोर्टात गेलोच नाही. मी असे योजले, की मला शिक्षकाचे काम जमेल खरे. इंग्रजीचा अभ्यास मी चांगला केला होता. त्यामुळे एखाद्या शाळेत मॅट्रिक्युलेशन क्लासला इंग्रजी शिकविण्याचे काम मिळाले तर करावे. काय मिळेल तेवढेच ! मी वर्तमानपत्रात जाहिरात वाचली. “पाहिजे, इंग्रजी शिक्षक. रोज एक तास. पगार रु. ७५.” ही एका प्रख्यात हायस्कूलची जाहिरात होती. मी अर्ज केला. मला समक्ष भेटण्याची आज्ञा झाली. मी मोठ्या उत्कंठेने गेलो; पण

प्रिन्सिपॉलना जेव्हा मी बी. ए. नाही असे समजले तेव्हा त्यांनी दिलगिरी प्रदर्शित करून मला रजा दिली. “पण मी लंडनची मॅट्रिक्युलेशन पास केली आहे. माझी दुसरी भाषा लॅटिन होती.”

“ते खरे, पण आम्हाला ग्रॅज्युएटच पाहिजे.”

माझा निरुपाय झाला. माझे हायपाय गळले. वडील बंधूही काळजीत पडले. आम्ही उभयतांनी विचार केला, की मुंबईत अधिक वेळ घालवणे निरर्थक आहे.

मुंबईहून निराश होऊन राजकोटला गेलो. निराळी कचेरी उघडली. गाडे थोडेबहुत रेटले. अर्ज लिहिण्याचे काम मिळू लागले; आणि दरमहा सरासरी तीनशे रुपयांची प्राप्ती होऊ लागली. हे अर्ज लिहिण्याचे काम मिळू लागले त्याचे कारण माझी हुशारी हे नव्हते, तर वशिला हेच होते. वडील बंधूंच्या भागीदाराचा वकिलीत चांगला जम बसलेला होता. त्याच्याकडे बरेच महत्त्वाचे अर्ज लिहिण्यासाठी येत. जे त्यांना महत्वाचे वाटत, तेच मोठ्या बॅरिस्टरांकडे जात. ज्यांचे गरीब अशील असत त्यांचे अर्ज तयार करण्याचे काम मला मिळे.

# १६. पहिला अपघात

पोरबंदरच्या माजी राणासाहेबांना गादी मिळाली, त्यापूर्वी माझे बंधू त्यांचे मंत्री व सल्लागार होते. त्या मुदतीत राणासाहेबांना गैरसल्ला दिल्याचा आरोप त्यांच्यावर होता. ती फिर्याद त्यावेळच्या पोलिटिकल एजंटपुढे आली होती आणि त्यांचा माझ्या बंधूंविरुद्ध ग्रह होऊन राहिला होता. हे अंमलदार मला विलायतेत भेटले होते. तेथे त्यांनी माझ्याशी चांगली मैत्री केली होती असे म्हणावयास हरकत नाही. बंधूंचा विचार पडला की, या ओळखीचा फायदा घेऊन मी पोलिटिकल एजंटला दोन शब्द सांगावे आणि त्यांची झालेली भलतीच समजूत दूर करण्याचा प्रयत्न करावा. मला ही गोष्ट बिलकूल पसंत पडली नाही. विलायतच्या तात्पुरत्या ओळखीचा मी फायदा घेता कामा नये, असे मला वाटले. माझ्या बंधूंनी काही गैरकृत्य खरोखरच केले असल्यास माझी शिफारस काय कामाची? केले नसेल तर रीतसर अर्ज करावा किंवा स्वत:च्या निर्दोषपणावर विश्वास ठेवून निर्धास्त राहावे. हे म्हणणे बंधूंना पटेना. "तुला काठेवाडची ओळख नाही. जगाची पण तुला माहिती व्हायची आहे. इकडे सगळी वशिल्याची कामे. तुझ्यासारखा भाऊ असताना, तुझ्या ओळखीच्या अंमलदारापाशी थोडी शिफारस करण्याचा प्रसंग पडला असता जर तू चुकवाचुकव केलीस, तर ते योग्य म्हणता येणार नाही."

बंधूंचे म्हणणे नाकबूल करवेना. जिवावर येत असताही गेलो. मला अंमलदाराकडे जाण्याचा काही अधिकार नव्हता. जाण्यामध्ये स्वाभिमानाचा भंग होत आहे, हे समजत होते. मी भेटण्यासाठी वेळ मागितला, त्याप्रमाणे मिळाला. मी गेलो. जुनी ओळख काढली. पण माझ्या लगेच लक्षात आले, की विलायत व काठेवाड यांमध्ये अंतर आहे. अधिकाराच्या खुर्चीवर बसलेला अंमलदार आणि रजेवर गेलेला अंमलदार यांमध्येही फरक होता. अंमलदाराने ओळख तर दिली पण त्याबरोबरच त्याने अधिक आढ्यता स्वीकारली. "ओळखीचा फायदा घ्यायला तर तू आलेला नाहीस ना ?" हे मला त्याच्या आढ्यतेवरून, त्याच्या दृष्टीवरून दिसून आले. हे दिसत असतानाही मी माझे पुराण सुरू केले. साहेब अधीर झाले. "तुझे बंधू लटपटी करणारे आहेत. मी तुझ्याकडून काही एक ऐकून घेऊ इच्छीत नाही. मला वेळ नाही. तुझ्या भावाला जर काही सांगायचे असेल,

तर त्याने रीतसर अर्ज करावा." हे उत्तर पुरे होते, योग्य होते. पण गरजवंताला अक्कल कोठून सुचणार ? मी माझे पुराण चालूच ठेवले. साहेब उठले, "आता तुला गेलेच पाहिजे."

मी म्हटले, "पण माझे म्हणणे तर अखेरपर्यंत ऐकून घ्या." साहेब खूप चिडले. "पट्टावाला, इसको दरवाजा बताओ." "हुजूर," म्हणत पट्टेवाला धावत आला. मी अजूनही काही बडबडतच होतो. पट्टेवाल्याने मला हात लावला आणि खोलीबाहेर नेले.

साहेब गेले. पट्टेवाला गेला. मीही निघालो. गोंधळून गेलो, चिडलो. मी तर चिठ्ठी खरडली, "तुम्ही माझा अपमान केला आहे. पट्टेवाल्यामार्फत माझ्यावर आक्रमण केले. तुम्ही माफी मागितली नाही, तर तुमच्यावर रोतसर फिर्याद करीन." ही चिठ्ठी मी पाठविली.

थोड्याच वेळात साहेबाचा स्वार जबाब देऊन गेला.

"तुम्ही माझ्याशी असभ्य वर्तन केले. तुम्हाला जायला सांगितले असता गेला नाही, त्यावरून मी जरूर माझ्या पट्टेवाल्याला तुम्हाला दरवाजा दाखवायला सांगितले. पट्टेवाल्याने सांगितले तरीही तुम्ही कचेरी सोडून गेला नाहीत. म्हणून त्याने तुम्हाला कचेरीतून बाहेर काढण्यापुरते बळ वापरले. तुम्हाला वाटेल ते करायला तुम्ही मोकळे आहात." अशा अर्थाचा तो जबाब होता.

हा जबाब खिशात घालून मान खाली घालून मी घरी आलो. बंधूंना हकीकत सांगितली. त्यांना वाईट वाटले, पण ते माझे सांत्वन काय करणार ? वकील मित्रांना हकीकत सांगितली. मला स्वतःला दावा थोडाच तयार करता येत होता ? या वेळी फिरोजशहा मेहता स्वतःच्या कोणत्या तरी दाव्यासाठी राजकोटमध्ये आलेले होते, त्यांना माझ्यासारखा नवखा बॅरिस्टर कसा मेटू शकणार ? पण त्यांना आणविणाऱ्या वकीलामार्फत त्यांच्याकडे कागद पाठवून त्यांचे मत मागविले. "गांधीला सांगा, असले प्रसंग सर्वच वकील बॅरिस्टरांच्या अनुभवाला आले असतील. तू नवीन आहेस. तुला अजून विलायतेची खुमखुमी आहे. तुला ब्रिटिश अंमलदारांची ओळख नाही. तुला सुखाचे दिवस काढायचे असतील आणि दोन पैसे कमवायचे असतील, तर तुला आलेली चिठ्ठी फाडून टाक आणि झालेला अपमान गिळून टाक. फिर्याद केल्याने तुला एक

कवडीही मिळणार नाही आणि तू मात्र जमीनदोस्त होशील. आयुष्याचा अनुभव तुला अजून मिळायचा आहे.”

मला हा उपदेश कडू विषाप्रमाणे वाटला. पण तो कडू घोट घशाखाली उतरविण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. मी अपमान विसरू शकलो नाही. पण त्याचा सदुपयोग केला. “अशा स्थितीत पुनः कधी सापडणार नाही; अशा तऱ्हेने कोणाची रदबदली करायला जाणार नाही.” या नियमाचा मी नंतर कधी भंग केला नाही. या तडाख्याने माझ्या जीविताचे सुकाणू फिरविले.

त्या अंमलदाराकडे जाण्यात माझी चूक होती, पण त्याचा अधीरपणा, क्रोध, उद्धटपणा, यांपुढे माझा दोष फारच अत्यल्प बनून गेला. धक्का मारणे ही माझ्या दोषालायक शिक्षा नव्हती. माझे पुष्कळसे काम त्याच्याच कोर्टात असे. खुशामत माझ्याकडून होण्यासारखी नव्हतीच. या अंमलदाराला भलत्या मार्गांनी खूष करण्याची माझी इच्छाच नव्हती. त्याला फिर्यादीची लेखी धमकी देऊन पुन्हा फिर्याद न करणे किंवा त्याला काहीही न लिहिणे हेही मला पटले नाही.

मध्यंतरी काठेवाडच्या लटपटींचाही मला थोडाबहुत अनुभव मिळाला. काठेवाड म्हणजे अनेक लहान-लहान राज्यांचा प्रदेश. येथे मुत्सद्यांचे पीक भरपूरच असणार. संस्थाना-संस्थानांमध्ये बारीकसारीक झटपटी, हुद्दा मिळविण्यासाठी लटपटी इत्यादि चालत. हलक्या कानाचे संस्थानिक, संस्थानिकांची परवशता, साहेबांच्या पट्टेवाल्यांची खुशामत करण्याची गरज पडे. शिरस्तेदार म्हणजे सवाई साहेब, कारण तोच साहेबांचे डोळे, कान आणि त्यांचा दुभाष्या. शिरस्तेदार मनात आणील तो कायदा. शिरस्तेदाराची प्राप्ती साहेबाच्या प्राप्तीपेक्षाही अधिक असते असे लोक बोलत. यात अतिशयोक्ती असण्याचा संभव आहे. पण शिरस्तेदाराच्या अल्प पगाराच्या मानाने त्याचा खर्च निःसंशय अधिक असे.

हे वातावरण मला विषासमान वाटले. मी माझा स्वतंत्र बाणा कसा टिकवू शकेन याचा मला नेहमी विचार पडे.

मी उदासीन झालो. माझी उदासीनला बंधूंच्या लक्षात आली. कोठेतरी नोकरी धरून बसलो, तर मी या लटपटींतून मुक्त होऊन जाईन असेही वाटे; पण लटपटीं-खेरीज दिवाणाची

किंवा न्यायाधीशाची जागा तरी कोठून मिळणार ? वकिली करावी तर साहेबाबरोबर झालेला झगडा आड येणार. मला काय करू असे झाले.

इतक्यात बंधूंकडे पोरबंदरच्या एका मेमण पेढीकडून माझ्यासाठी काम चालून आले. "दक्षिण आफ्रिकेत आमचा व्यापार आहे. आमची मोठी पेढी आहे. आमचा एक मोठा दावा चालू आहे. दावा चाळीस हजार पौंडांचा आहे. पुष्कळ दिवसांपासून चालू आहे. आमच्याजवळ उत्तमांत उत्तम वकील, बॅरिस्टर आहेत. तुमच्या भावाला पाठवलेत, तर त्याची आम्हाला मदत होईल; आणि त्यालाही काही मदत मिळेल. तो आमची बाजू आमच्या वकिलाला चांगल्या तऱ्हेने समजावून देऊ शकेल. त्याला नवा मुलूख पाहायला मिळेल. नवीन ओळखी होतील ते निराळेच."

मी विचारले, "माझी नोकरी तुम्हाला किती मुदतीपर्यंत हवी आहे? मला तुम्ही काय पगार द्याल?"

"तुमची जरूर एक वर्षाहून अधिक काळ पडणार नाही. तुम्हाला येण्याजाण्याचे फर्स्ट क्लासचे भाडे आणि राहण्याजेवण्याच्या खर्चाखेरीज १०५ पौंड देऊ."

ही काही वकिली म्हणता यायची नाही. ही नोकरी झाली. पण मला कसेही करून हिंदुस्थान सोडून जायचे होते. नवा मुलूख पाहायला मिळेल आणि अनुभव मिळेल तो निराळा. १०५ पौंड बंधूंकडे पाठवीन म्हणजे घरखर्चामध्ये काही मदत होईल, असे म्हणून पगाराबद्दल घासाघीस न करता मी शेठ अब्दुल करीमचे म्हणणे कबूल केले आणि दक्षिण आफ्रिकेला जायला सिद्ध झालो.

# खंड ४: दक्षिण आफ्रिकेत

## १७. दक्षिण आफ्रिकेत आगमन

डरबन हे नाताळचे बंदर म्हणता येईल; त्याला नाताळ बंदर असेही म्हणतात. मला न्यायला अबदुल्ला शेठ आले होते. बोट धक्क्यापाशी आली आणि नाताळचे लोक आपापल्या मित्रांना आणायला बोटीवर आले. तेवढ्यातच माझ्या ध्यानात आले की इकडे हिंदी लोकांना फारसा मान नाही. अब्दुल्ला शेठला ओळखणारे त्यांच्याशी ज्या तऱ्हेने वागत होते, त्यात एक प्रकारची तुच्छता दिसून येत होती, ती मला बोचल्याशिवाय राहिली नाही. ही तुच्छता अब्दुल्ला शेठच्या अंगवळणी पडली होती. माझ्याकडे ज्यांची नजर जाई, ते माझ्याकडे कौतुकाने पाहत. माझ्या पोषाखामुळे मी इतर हिंदी लोकांहून निराळासा दिसत होतो. मी त्या वेळी फ्रॉक कोट, वगैरे पोशाख केला होता आणि डोक्याला बंगाली घाटाची पगडी घातली होती.

दुसऱ्या का तिसऱ्या दिवशी मला डरबनचे कोर्ट पाहायला घेऊन गेले. तेथे काही ओळखी करून दिल्या. कोर्टात स्वत:च्या वकिलापाशी मला बसविले. मॅजिस्ट्रेट माझ्याकडे एकसारखा पाही. त्याने मला माझी पगडी काढून टाकण्यास सांगितले. मी काढण्याचे नाकारले आणि कोर्ट सोडून गेलो.

येथेही माझ्या नशीबी झगडेच होते !

मी पगडीच्या चकमकीसंबंधी स्वत:चे व पगडीचे समर्थन करणारे पत्र वर्तमानपत्राकडे पाठविले. वर्तमानपत्रात माझ्या पगडीची खूप चर्चा झाली. “अनवेल्कम व्हिजिटर- आगंतुक पाहुणा” अशा मथळ्याखाली मला प्रसिद्धी मिळाली आणि तीन-चार दिवसांच्या आतच अनायासे दक्षिण आफ्रिकाभर माझी जाहिरात झाली. माझी पगडी तर जवळजवळ अखेरपर्यंत टिकून राहिली.

# १८. प्रिटोरियाला जाताना

पेढीच्या वकिलाकडून पत्र आले, की फिर्यादीची तयारी केली पाहिजे. अबदुल्ला शेठजींनी स्वत: तरी प्रिटोरियाला आले पाहिजे किंवा दुसऱ्या कोणाला पाठविले पाहिजे. हे पत्र अब्दुल्ला शेठनी मला दाखविले आणि विचारले, "तुम्ही प्रिटोरियाला जाता ?" मी म्हटले, "मला दावा समजावून दिलात तर मी सांगू शकेन. तिकडे काय काय करावे लागेल याची सध्या मला काहीच कल्पना नाही." त्यांनी आपल्या कारकुनांना दाव्याची माहिती देण्याच्या कामी नेमले.

सातव्या की आठव्या दिवशी मी डरबनहून रवाना झालो. माझ्यासाठी पहिल्या वर्गाचे तिकीट काढविले होते. तेथे झोपण्याचा बिछाना पाहिजे असेल, तर पाच शिलिंगाचे स्वतंत्र तिकीट काढावे लागे. अब्दुल्ला शेठनी ते काढण्याबद्दल आग्रह केला, पण मी हट्टाने, तोऱ्याने आणि पाच शिलिंग वाचविण्यासाठी बिछान्याचे तिकीट काढण्याचे नाकारले. अब्दुल्ला शेठनी मला बजावले, "पहा हो, हा मुलूख निराळा आहे. हिंदुस्थान नव्हे. खुदाची मेहरबानी आहे, तुम्ही पैशाचा कंजूषपणा करू नका. जरूर ती सोय करून घ्या."

मी आभार मानले आणि त्यांना काळजी करू नका म्हणून सांगितले.

नाताळची राजधानी मॅरित्सबर्ग येथे गाडी साधारण नऊ वाजता पोहोचली. येथे बिछाने पुरविण्यात येत होते. एका रेल्वे नोकराने येऊन विचारले, "तुम्हाला बिछाना पाहिजे ?" मी म्हटले, "माझ्यापाशी बिछाना आहे." तो निघून गेला. इतक्यात एक उतारू आला. त्याने माझ्याकडे पाहिले. मी गोरेतर आहे असे पाहून त्याचे बिनसले. तो बाहेर पडला. एकदोन अंमलदारांना घेऊन आला. कोणी काही बोलले नाही. शेवटी एक अंमलदार आला. तो म्हणाला, "असे इकडे या, तुम्हाला शेवटल्या डब्यात जायचे आहे."

मी म्हटले, "माझ्याजवळ पहिल्या वर्गाचे तिकीट आहे."

तो म्हणाला, "त्याची चिंता नाही. मी सांगतो की, तुम्ही शेवटल्या डब्यात जावे."

"मी ही सांगतो की, मला या डब्यात डरबनहून बसविण्यात आलेले आहे आणि त्यातूनच प्रवास करण्याचा माझा इरादा आहे."

अंमलदार म्हणाला, "ते काही चालायचे नाही. तुम्हाला उतरावेच लागेल आणि उतरला नाहीत, तर शिपाई खाली उतरवेल."

मी म्हटले, "तर मग शिपायाला खुशाल खाली उतरवू द्या. मी आपण होऊन नाही उतरणार."

शिपाई आला. त्याने हात पकडला आणि मला धक्का मारून खाली उतरविले. माझे सामान उतरून घेतले. मी दुसऱ्या डब्यात जाण्याचे नाकारले. ट्रेन निघून गेली. मी वेटिंग रूममध्ये शिरलो. माझ्या हातातले पाकीट तेवढे बरोबर ठेवले. बाकीच्या सामानाला मी हात लावला नाही. रेल्वेच्या नोकरांनी ते सामान कोठेतरी ठेवले.

हिवाळ्याचे दिवस होते. दक्षिण आफ्रिकेचा हिवाळा उंचावरील भागामध्ये कडाक्याचा असतो. मॅरित्सबर्ग उंच भागामध्ये आहे. त्यामुळे थंडी खूप लागली. माझा ओव्हरकोट सामानात होता. सामान मागण्याची हिम्मत होईना; फिरून अपमान झाला तर ? थंडीने कुडकुडलो. खोलीत दिवा नव्हता. मध्यरात्रीच्या सुमाराला एक उतारू आला. त्याची काही बोलण्याची इच्छा दिसली. पण त्याच्याबरोबर बोलण्यासारखी माझी मन:स्थिती नव्हती.

माझे कर्तव्य काय याचा मी विचार केला. एक तर मी माझ्या हक्कासाठी लढले पाहिजे, किंवा हिंदुस्थानची वाट धरली पाहिजे. नाहीतर होतील ते अपमान सहन करून प्रिटोरियाला जावे आणि दाव्याचे काम पुरे करून स्वदेशी जावे. दावा अर्धा टाकून जाणे म्हणजे नामर्दपणा होय. मला दु:ख सोसावे लागले, हे वरवरचे दु:ख आहे. आत खोलात असलेल्या एका महारोगाचे ते बाह्य लक्षण आहे. हा महारोग म्हणजे वर्णद्वेष. हा दृढमूल रोग नेस्तनाबूत करण्याची शक्ती असेल तर तिचा उपयोग केला पाहिजे. ती करताना स्वत:वर येतील ती दु:खे सहन केली पाहिजेत. वर्णद्वेष संपविण्यासाठी जरूर पडेल तेवढ्यापुरतेच स्वतःच्या दु:खाचे परिमार्जन करण्याचा प्रयत्न करावा.

असा निर्णय करून दुसऱ्या गाडीने कसेही करून पुढे जायचेच असा निश्चय केला.

सकाळच्या प्रहरी मी जनरल मॅनेजरला तक्रारीची लांबलचक तार केली. दादा अब्दुल्लांना पण कळविले. अब्दुल्ला शेठ लगेच जनरल मॅनेजरला भेटले. जनरल मॅनेजरने स्वतःच्या नोकरांच्या वर्तनाची तरफदारी केली, पण सांगितले की, मला बिनहरकत प्रिटोरियाला पोचविण्याबद्दल आपण स्टेशनमास्तरला शिफारस केली आहे. अब्दुल्ला शेठनी मॉरित्सबर्गच्या हिंदी व्यापाऱ्यांना तार करून मला भेटण्याबद्दल व माझी बडदास्त ठेवण्याबद्दल कळविले आणि इतर स्टेशनांवरही तशाच तारा केल्या. त्यावरून व्यापारी मला स्टेशनवर भेटण्यास आले. त्यांनी स्वत:वर पडणाऱ्या दु:खांचे माझ्यापाशी वर्णन केले आणि मला सांगितले की, तुमच्यावर आलेला प्रसंग हा काही नवा नाही. पहिल्या-दुसऱ्या वर्गातून प्रवास करणाऱ्या हिंदी उतारूंना रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून व इतर उतारूंकडून उपसर्ग पोचायचाच. अशा तऱ्हेच्या गोष्टी ऐकण्यातच दिवस गेला. रात्र पडली. गाडी आली. माझ्यासाठी जागा ठेवलेलीच होती. बिछान्याचे तिकीट घेण्याचे मी डरबनमध्ये नाकारले होते, ते मॉरित्सबर्गमध्ये घेतले.

चार्लस्टाऊनला गाडी सकाळी पोहोचली. चार्लस्टाऊनहून जोहान्सबर्गला जायला त्या दिवसांत आगगाडी नव्हती; तर घोड्याचा शिग्राम असे आणि मध्ये स्टँडरटनला एक रात्र राहावे लागे. माझ्यापाशी शिग्रामचे तिकीट होते. मी एक दिवस उशीरा पोहोचलो म्हणून काही ते तिकीट रद्द होत नव्हते. शिवाय अब्दुल्ला शेठनी चार्लस्टाऊनच्या शिग्राम-वाल्याला तारही केली होती.

पण त्याला काहीतरी सबब काढायचीच होती; त्यासाठी मी नवखा आहे, असे पाहून तो म्हणू लागला, “तुमचे तिकीट रद्द झाले.” मी योग्य तो जबाब दिला. तिकीट रद्द झाले म्हणून मला सांगायचे खरे कारण निराळेच होते. सर्व उतारू शिग्रामच्या आतच बसत. परंतु माझी तर कुलींत गणना आणि मी नवखा दिसत होतो. त्याअर्थी मला गोऱ्या उतारूंपाशी बसवावे लागले नाही, तर बरे, असा त्या शिग्रामवाल्याचा मतलब. शिग्रामच्या बाहेरच्या बाजूला म्हणजे हाकारणाऱ्याला लागून उजव्या आणि डाव्या बाजूला अशा दोन बैठका होत्या, त्यांपैकी एका बैठकीवर शिग्राम-कंपनीचा एक गोरा 'नायक' बसत असे. तो आत बसला आणि मला हाकारणाऱ्याशेजारी त्याने

बसविले. मी तेव्हाच समजलो, की हा केवळ अन्याय आहे, अपमान आहे. हा अपमान गिळून टाकणेच मला योग्य वाटले. मला जोरजुलूमाने आत बसता येण्यासारखेच नव्हते. मी तक्रार करीत बसलो असतो, तर शिग्राम निघून जायचा आणि माझी मात्र आणखी एक दिवस खोटी व्हायची. दुसऱ्या दिवशी काय होईल ते तरी कोणी सांगावे ? म्हणून मी शहाणपणा केला आणि बाहेर बसलो. मनातून खूप चडफडलो.

तीनेक वाजता शिग्राम पारडीकोपला पोहोचला. आता त्या गोऱ्या नायकाला मी बसलो होतो तेथे बसण्याची लहर आली. त्याला विडी प्यायची होती. थोडी हवादेखील खावयाची असेल म्हणून त्याने एक मळकेसे गोणपाट पडले होते, ते त्या हाकारणाऱ्याकडून घेतले आणि ते पाय ठेवण्याच्या फळीवर पसरून मला म्हटले, “सामी, तू इथे बस. मला हाकारणाऱ्यापाशी बसावयाचे आहे.” हा अपमान सहन करणे माझ्या शक्तीबाहेरचे होते. म्हणून मी भीत भीत त्याला सांगितले, “तुम्ही मला येथे बसविलेत तो एक अपमान मी सहन केला; माझी जागा तर आत बसण्याची, पण तुम्ही आत बसून मला येथे बसविलेत. आता तुम्हाला बाहेर बसण्याची इच्छा झाली आहे आणि विडी ओढायची आहे, म्हणून तुम्ही मला आपल्या पायापाशी बसवू पाहत आहात. मी आत जायला तयार आहे, पण तुमच्या पायाजवळ बसण्याची माझी तयारी नाही.”

इतके मी बोलतो, त्यापूर्वीच माझ्यावर तडाख्यांचा वर्षाव झाला आणि तो मनुष्य माझा दंड धरून मला खाली ओढू लागला. बैठकीपाशी पितळेचा दांडा होता, तो मी घट्ट पकडून धरला आणि मनगट तुटले तरी दांडा सोडायचा नाही, असा निर्धार केला. माझ्यावर गुदरलेला प्रसंग बाकीचे उतारू पाहतच होते. तो मला शिव्या देत होता, ओढीत होता आणि मारीतही होता. मी मात्र गप्प होतो. तो धटिंगण आणि मी बलहीन. उतारूंपैकी काहींना दया आली व ते म्हणाले, “अरे ए, त्या बिचाऱ्याला तेथे बसू दे ना; त्याला विनाकारण मारू नकोस. त्याचे म्हणणे रास्त आहे. तेथे नाहीतर त्याला आत आमच्याजवळ बसू दे.” तो उसळून म्हणाला, “ते कालत्रयी होणार नाही.” पण तो किंचित नरम पडला खरा. मला मारायचे त्याने बंद केले. माझा दंड सोडला. चार-

दोन शिव्या आणखी हासडल्या; पण एक हॉटेंटाट नोकर पलीकडल्या बाजूला होता, त्याला स्वत:च्या पायाजवळ बसवला आणि आपण बाहेर बसला.

उतारू आत बसले. शिटी वाजली. शिग्राम सुरू झाला. माझी छाती धडधडत होती. मी जिवंत मुक्कामाला पोहोचेन की नाही याबद्दल मला शंका होती. तो माझ्याकडे डोळे वटारून पाहतच होता. बोट दाखवून पुटपुटे, "याद राख; स्टँडरटन तर येऊ दे, मग तुला सांगतो काय ते !" मी गप्प बसलो आणि स्वत:च्या रक्षणासाठी प्रभूचा धावा करीत राहिलो.

रात्र पडली. स्टँडरटनला पोहोचलो. कित्येक हिंदी चेहरे दिसले. काहीसे बरे वाटले. खाली उतरताच हिंदी लोकांनी सांगितले, "आम्ही तुम्हाला ईसा शेठच्या दुकानावर घेऊन जाण्यासाठी उभे आहोत; आम्हाला अब्दुल्ला शेठची तार आली आहे." मला फार आनंद झाला. त्यांच्याबरोबरच शेठ ईसा हाजी सुमाराच्या दुकानात गेलो.

माझ्या मनातून शिग्राम कंपनीच्या एजंटाला ही सर्व खबर द्यायची होती. मी एजंटला चिठ्ठी लिहिली, नायकाने धमकी दिली होती तेही लिहिले आणि सकाळी पुढे प्रवास करायचा आहे, तेव्हा मला आत इतर उतारूंबरोबर जागा मिळण्याची खात्री पाहिजे, अशी मागणी केली. एजंटने मला निरोप पाठविला, "स्टँडरटनहून पुढे मोठा शिग्राम असतो आणि हाकारणारे बदलतात. ज्याच्याविरुद्ध तुमची तक्रार आहे, तो मनुष्य उद्या नसणार. तुम्हाला इतर उतारूंच्या शेजारीच जागा मिळेल." या निरोपामुळे मला काहीसे आश्वासन मिळाले. मला मारणाऱ्या त्या इसमाविरुद्ध काही करण्याचा माझा विचारच नव्हता, अर्थात त्या मारहाणीचे प्रकरण येथेच संपले.

सकाळी मला ईसा शेठचे लोक शिग्रामवर घेऊन गेले. मला योग्य जागा मिळाली. कोणत्याही तऱ्हेच्या त्रासाखेरीज त्या रात्री जोहान्सबर्गला पोहोचलो.

स्टँडरटन लहानसं खेडं होतं. जोहान्सबर्ग विशाल शहर ! तेथेही अब्दुल्ला शेठनी तार तर केलीच होती. मला महंमद कासम कमरुद्दीनच्या दुकानाचा ठावठिकाणाही दिला होता. त्यांचा मनुष्य शिग्राम उभा राहण्याच्या ठिकाणी आला होता; परंतु मी त्याला पाहिला नाही किंवा त्यानेही मला ओळखले नाही. मी हॉटेलात जाण्याचा विचार केला. दोन-चार हॉटेलांची नावेही विचारून

घेतली होती. गाडी केली. जागा मागितली. मॅनेजरने क्षणभर माझ्याकडे न्याहाळून पाहिले. “मला दिलगिरी वाटते. सर्व खोल्या भरून गेल्या आहेत,” असे म्हणून मला चालते केले. तेव्हा मी गाडीवानाला महंमद कासम कमसरुद्दीनच्या दुकानावर मला घेऊन जाण्यास सांगितले. तेथे तर अब्दुल गनी शेठ माझी वाटच पाहत बसले होते. त्यांनी माझे प्रेमपूर्वक स्वागत केले. हॉटेलमध्ये जागा न मिळाल्याची हकिकत मी त्यांना सांगितली. ते खदाखदा हसले. “हॉटेलात आपल्याला उतरू देणार आहेत का ?”

मी विचारले, “का नाही?”

“तुम्ही थोडे दिवस इकडे राहिलात म्हणजे का ते समजेल.”

त्यांनी सांगितले, “तुम्हाला उद्या प्रिटोरियाला जायचे आहे. तेथे तुम्हाला तिसऱ्या वर्गातच जागा मिळेल. ट्रान्सवालमधील परिस्थिती तर नाताळपेक्षाही वाईट आहे. तेथे आमच्या लोकांना पहिल्या किवा दुसऱ्या वर्गाचे तिकीट देत नाहीत.”

मी रेल्वेचे कायदे मागविले; पाहिले. त्यात एक पळवाट होती. ट्रान्सवालचे मूळ कायदे बारकाईने तयार केलेले नव्हते. रेल्वेच्या कायद्यांचे तर विचारूच नका.

मी शेठला सांगितले, “मी फर्स्ट क्लासमधूनच जाणार. तसे नाही जमले, तर प्रिटोरिया येथून सदतीस मैलच आहे; तेथपर्यंत मी घोडागाडी करून जाईन.”

अब्दुल गनी शेठनी तसे करण्यामध्ये लागणारा वेळ व द्रव्याचा खर्च माझ्या नजरेस आणून दिला. पण माझा विचार त्यांनी कबूल केला. मी स्टेशन-मास्तरला चिठ्ठी पाठविली. चिठ्ठीमध्ये मी बॅरिस्टर आहे, नेहमी पहिल्या वर्गाने प्रवास करतो वगैरे लिहिले. प्रिटोरियाला तातडीने पोहोचणे जरूर असल्याबद्दल कळविले आणि असेही लिहिले, की तुमच्या जबाबाची वाट पाहण्यापुरता मला वेळच उरणार नाही; म्हणून चिठ्ठीचा जबाब घेण्यास मी स्वत: स्टेशनवर येईन, त्यावेळी मला पहिल्या वर्गाचे तिकीट मिळेल अशी आशा आहे. असे लिहिण्यात माझा एक डाव होता. मी असा विचार केला, की स्टेशनमास्तर लेखी जबाब नकारात्मकच पाठविणार. त्यातून 'कूली बॅरिस्टर'ची

झाली तरी राहणी कशी काय असेल, याची त्याला काय कल्पना येणार ? म्हणून मी बिनचूक इंग्रजी पोषाखात त्याच्यापुढे जाऊन उभा राहिलो आणि त्याच्याबरोबर बोललो-चाललो म्हणजे त्याची समजूत पडेल आणि तो कदाचित मला तिकिट देईल. असा विचार करून मी फ्रॉककोट, नेकटाय वगैरे चढवून स्टेशनात गेलो. मास्तरापुढे एक गिनी ठेवली आणि पहिल्या वर्गाचे तिकिट मागितले.

त्याने विचारले,“तुम्हीच मला चिठ्ठी लिहिली आहे का ?”

“तोच मी. तुम्ही मला तिकिट दिल्यास मी तुमचा आभारी राहीन. मला आजच प्रिटोरियाला पोहोचले पाहिजे,” मी म्हटले.

स्टेशनमास्तर हसले. त्यांना दया आली. ते म्हणाले, “मी ट्रान्सवालर नाही, हॉलंडर आहे. तुमच्या भावना मी समजू शकतो. तुमच्याबद्दल मला सहानुभूती आहे. तुम्हाला तिकिट देण्याची माझी इच्छा आहे. पण एका अटीवर, रस्त्यात गार्डाने जर तुम्हाला खाली काढले आणि तिसऱ्या वर्गात बसविले, तर तुम्ही मला गोत्यात आणू नये, म्हणजे रेल्वेवर दावा करू नये. तुमचा प्रवास निर्विघ्नपणे पार पडावा, अशी माझी इच्छा आहे. आपण सद्गृहस्थ आहात, हे मला दिसतेच आहे.”

असे म्हणून मला त्याने तिकिट दिले. मी त्याचे आभार मानले आणि त्याला निश्चिंत राहण्यास सांगितले.

अब्दुल गनी शेठ पोचवायला आले होते. हा प्रसंग पाहून त्यांना आनंद झाला व आश्चर्य वाटले; पण त्यांनी मला सावधगिरीचा इशारा दिला. “प्रिटोरियाला सही-सलामत पोहोचलेत म्हणजे झाले. मला धास्ती वाटते, की गार्ड तुम्हाला सुखाने पहिल्या वर्गात बसू देणार नाही आणि गार्डाने बसू दिले, तर उतारू बसू देणार नाहीत.”

मी पहिल्या वर्गाच्या डब्यात बसलो तर खरा. गाडी चालू झाली. जर्मिस्टन स्टेशन आले. तेथे गार्ड तिकिटे तपासायला आला. मला पाहताच संतापला. बोटं नाचवीत म्हणाला, “तिसऱ्या वर्गात चल !” मी माझे पहिल्या वर्गाचे तिकिट दाखविले.

तो म्हणाला, “ते काही नाही; तिसऱ्या वर्गात जा.”

त्या डब्यात एकच इंग्रज उतारू होता. त्याने त्या गार्डाला तंबी दिली, “या गृहस्थांना निष्कारण का सतावतोस ? त्यांच्याजवळील पहिल्या वर्गाचे तिकिट दिसत नाही ? त्यांनी माझ्याबरोबर प्रवास करण्यात मला काहीच अडचण नाही,” असे म्हणून त्याने माझ्याकडे पाहिले आणि म्हणाला, “तुम्ही आरामात बसा.”

गार्ड पुटपुटला, “तुम्हाला कुलीबरोबर बसायचे असेल, तर माझे काय जाते ?”

रात्री आठेक वाजता गाडी प्रिटोरियाला पोहोचली.

## १९. प्रिटोरियातील पहिला दिवस

१८९३ चे प्रिटोरिया स्टेशन १९१४च्या स्टेशनहून अगदीच भिन्न होते. मंदमंद दिवे जळत होते. उतारू पण विशेषसे नव्हते. मी सर्व उतारूंना जाऊ दिले आणि विचार केला, की तिकीट-कलेक्टर जरा मोकळा झाला म्हणजे त्याला तिकीट देईन आणि तो मला लहानसे एखादे हॉटेल किंवा दुसरे एखादे घर दाखवील तिकडे जाईन; किंवा रात्रभर स्टेशनवर पडून राहीन. एवढे विचारायलाही मन धजावत नव्हते; कारण अपमानाचे भय वाटत होते.

स्टेशन रिकामे झाले. मी तिकीट-कलेक्टरला तिकीट दिले आणि प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. त्याने विनयपूर्वक जबाब दिले. पण मला दिसले, की त्याची विशेष मदत होण्यासारखी नाही. त्याच्या शेजारी एक अमेरिकन हबशी गृहस्थ उभा होता, त्याने माझ्याशी बोलायला सुरुवात केली.

"तुम्ही अगदी नवखे दिसता आणि तुम्हाला कोणी मित्र नसावा. माझ्याबरोबर याल, तर मी तुम्हाला एक लहानसे हॉटेल आहे, तेथे घेऊन जाईन. त्याचा मालक अमेरिकन असून माझ्या चांगल्या परिचयाचा आहे. मला वाटते, तो तुम्हाला जागा देईल."

मला किंचित शंका वाटत होती, पण मी त्या गृहस्थाचे आभार मानले आणि त्याच्याबरोबर जाण्याचे कबूल केले. तो मला जॉन्स्टनच्या फॅमिली हॉटेलात घेऊन गेला. मि: जॉन्स्टनला एका बाजूला नेऊन काहीतरी सांगितले. मि. जॉन्स्टनने मला रात्रभर राहू देण्याचे कबूल केले; तेही या शर्तीवर, की माझे जेवण मला माझ्या खोलीत पोहोचविले जाईल.

"मी तुम्हाला खात्री देतो, की मला काळ्या-गोऱ्याचा बिलकुल भेदभाव नाही. पण माझी गिऱ्हाईकी फक्त गोऱ्या लोकांचीच आहे आणि जर मी तुम्हाला जेवणाच्या खोलीत जेवू दिले, तर माझ्या आश्रयदात्यांना राग येईल, ते कदाचित हॉटेल सोडूनही जायचे," मि. जॉन्स्टन म्हणाले.

मी म्हटले, “तुम्ही मला रात्रभर राहू देता, हेच मी तुमचे उपकार समजतो. या मुलखातील परिस्थिती मला थोडीबहुत समजू लागली आहे. तुमची अडचण मला समजते. तुम्ही खुशाल मला माझ्या खोलीत वाढा. उद्या मी दुसरी काहीतरी व्यवस्था करू शकेन अशी मला उमेद वाटते.”

मला खोली दिली. मी आत गेलो. एकांतात जेवणाची वाट पाहात, विचार करीत बसलो. या हॉटेलात फारसे उतारू रहात नव्हते. थोड्या वेळाने वेटर जेवण घेऊन येण्याऐवजी मि. जॉन्स्टनच येताना दिसले. ते म्हणाले, “मी तुम्हाला खोलीत जेवण पाठवीन म्हटले, त्याची मला लाज वाटली. म्हणून मी माझ्या गिऱ्हाईकांना तुमच्याबद्दल सांगून त्यांचे मत घेतले. तुम्ही जेवणाच्या खोलीत जेवलात, तरी त्यांची काही हरकत नाही. तरी आता तुमची इच्छा असल्यास भोजनगृहात चला आणि तुमच्या मर्जीला येईल, तोपर्यंत येथे राहा.” मी पुन्हा आभार मानले आणि जेवणाच्या खोलीत गेलो. निश्चिंतपणे जेवलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी वकिलाकडे गेलो. त्यांचे नाव ए. डब्ल्यू. बेकर. त्यांना भेटलो. अब्दुल्ला शेठनी माझ्यापाशी त्यांचे थोडेसे वर्णन केले होते. त्यामुळे पहिल्या भेटीत मला काही आश्चर्य वाटले नाही. त्यांनी माझी प्रेमपूर्वक भेट घेतली आणि माझी थोडी हकीकत विचारून घेतली. मी ती सांगितली. ते म्हणाले, “बॅरिस्टर या नात्याने तुमचा येथे काहीच उपयोग होण्यासारखा नाही. आम्ही उत्तमांत उत्तम बॅरिस्टरांना या दाव्यासाठी नेमले आहे. दावा लांबलचक आणि गुंतागुंतीचा आहे, त्यामुळे तुमच्यापासून फक्त जरूर तेवढी माहिती मिळविण्याचेच काम मला घेता येईल. मला माझ्या अशिलाबरोबर पत्रव्यवहार करणेही आता सोपे पडेल आणि त्यांच्याकडून पाहिजे ती माहिती मी तुमच्यामार्फत मागवू शकेन, एवढी सोय आहे खरी. तुमच्यासाठी मी घर अजून शोधलेले नाही. तुम्हाला पाहिल्यानंतरच शोधावे असा विचार केला होता. येथे रंगभेद फार आहे, त्यामुळे घर शोधणे सोपे नाही. पण एक बाई माझ्या माहितीची आहे. गरीब आहे. पाववाल्याची बायको आहे. ती तुमची उतरण्याची सोय करील, असे वाटते. तिलाही थोडी मदत होईल. चला, आपण तिच्याकडेच जाऊ.”

असे म्हणून ते मला तिकडे घेऊन गेले. मि. बेकरनी बाईबरोबर एका बाजूला जाऊन थोड्या गोष्टी केल्या आणि तिने मला ठेवून घेण्याचे मान्य केले. आठवड्याचे ३५ शिलिंग ठरवून मला तेथे ठेवण्यात आले.

# २०. हिंदी लोकांची ओळखदेख

ट्रानसवाल आणि फ्री स्टेटमधील हिंदी लोकांच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा सखोल अभ्यास मी प्रिटोरियामध्ये करू शकलो. या अभ्यासाचा पुढे मला भरपूर उपयोग व्हावयाचा आहे, याची मला त्यावेळी कल्पनाही नव्हती.

सुधारणा झालेल्या कायद्यान्वये प्रत्येक हिंदी माणसाने प्रवेश फी म्हणून तीन पौंड द्यावे, असे ठरले होते. त्यांच्यासाठी वाडे नेमलेले होते, त्यातच फक्त त्यांना जमिनीची मालकी उपभोगता येई. तिलासुद्धा मालकी म्हणता यायचे नाही. त्यांच्या मताधिकाराचा तर प्रश्नच नाही. हे झाले खास आशियावासियांसाठी केलेले कायदे. शिवाय श्यामवर्णी लोकांना लागू केलेले कायदेही आशियावासियांना लागू होतेच.

त्या कायद्यान्वये हिंदी लोकांना पायवाटेवरून (फूटपाथवरून) चालण्याचा हक्क नव्हता, रात्री नऊ वाजल्यानंतर परवान्याखेरीज बाहेर पडता येत नव्हते. मि. कोट्सबरोबर मी पुष्कळ वेळा रात्रीचा फिरायला जात असे. घरी यायला दहाही वाजत. मग पोलिसाने पकडले तर ? ही धास्ती मला वाटे, त्याहूनही कोट्सना अधिक वाटे. कारण स्वत:च्या हबशी नोकरांना ते स्वतःच परवाना देत, पण मला कसा परवाना देणार? मालकाला फक्त स्वतःच्या नोकरांना परवाना देण्याचा अधिकार असे. मी घ्यायचा म्हटले आणि कोट्सच्या मनातून द्यायचा असला, तरी देता येण्याजोगा नव्हता, कारण ती लबाडी झाली असती.

म्हणून कोट्स किंवा त्यांचे कोणी मित्र मला तेथील सरकारी वकील डॉ. क्राउझे यांच्याकडे घेऊन गेले. आम्ही दोघेही एकाच 'इन' चे बॅरिस्टर निघालो. रात्री नऊ वाजल्यानंतर बाहेर पडण्यासाठी मला परवाना घेतला पाहिजे, ही गोष्ट त्यांना असह्य वाटली. त्यांनी माझ्याबद्दल सहानुभूती दर्शविली. मला परवाना देण्याऐवजी आपल्यातर्फे एक पत्र दिले. त्याचा आशय असा होता की वाटेल तेव्हा, वाटेल तेथे खुशाल जावे, त्यात पोलिसाने मला अडथळा करू नये. हा कागद सर्वकाळ आपल्याजवळ ठेवून मी फिरत असे. त्याचा कधी उपयोग करावा लागला नाही; पण हा योगायोगच म्हटला पाहिजे.

पायवाटेवरून चालण्याच्या बाबीचा मात्र माझ्याबाबतीत जास्त गंभीर परिणाम घडून आला. मी नेहमी प्रेसिडेंट स्ट्रीटमधून मोकळ्या मैदानात फिरायला जात असे. या पेठेमध्ये प्रेसिडेंट क्रूगरचे घर होते. या घराला डामडौल मुळीच नव्हता; त्याच्या सभोवार कंपाउंडही नव्हते. शेजारची इतर घरे आणि हे घर यांच्यामध्ये काहीच फरक दिसत नसे. हे कोणा अंमलदाराचे घर आहे, हे त्याच्या समोर एक शिपाई फिरत असे, तेवढ्यावरून लक्षात येई. मी नेहमी या शिपायाच्या अगदी जवळून जात असे, पण शिपाई मला काही करीत नसे.

शिपाई वरच्यावर बदले. एकदा एका शिपायाने सूचना दिल्याशिवाय, वाटेवरून उतरून जाण्यास न सांगता, मला धक्का दिला, लाथ मारली आणि खाली पाडले. मी प्रथम थक्कच झालो. त्याला जाब विचारणार त्यापूर्वीच कोट्स घोड्यावर बसून जात होते, त्यांनी मला हाक मारून म्हटले,

“गांधी मी सर्व पाहिले आहे. तुला खटला करायचा असेल, तर मी साक्ष देईन. तुझ्यावर अशा तऱ्हेने हल्ला व्हावा, याबद्दल मला वाईट वाटते.”

“त्यात वाईट वाटून घेण्याचे कारण नाही. शिपायाला बिचाऱ्याला काय कळणार ? त्याच्या समजुतीने काळे तेवढे काळेच. हबशी लोकांना तो पायवाटेवरून असाच उतरवत असेल, म्हणून त्याने मलाही धक्का दिला. मी नियमच केला आहे, की मला व्यक्तिशः सहन कराव्या लागणाऱ्या क्लेशांसाठी कोर्टात जायचे नाही, अर्थात् मला फिर्याद करायची नाही.”

“हे तू आपल्या स्वभावानुरूपच बोललास; पण तू पुन्हा विचार करून पाहा, असल्या माणसाला काही धडा मिळालाच पाहिजे.” असे म्हणून ते त्या शिपायाकडे वळले व त्यांनी त्याला ठपका दिला. मला त्यांच्या बोलण्याचा सर्व अर्थ समजला नाही. शिपाई डच होता, त्यांच्याबरोबरचे संभाषणही डचमध्येच झाले. पण शिपायाने माझी माफी मागितली. मी ती मागण्यापूर्वीच देऊन टाकली होती.

पण मी तेव्हापासून तो रस्ता सोडून दिला. दुसऱ्या शिपायाला ती हकीकत कोठून समजणार ? आपणहून पुन्हा का लाथ मारून घ्यावी ? म्हणून मी फिरायला जाण्यासाठी दुसरा रस्ता पसंत केला.

स्वाभिमान टिकवू इच्छिणाऱ्या हिंदी माणसासाठी दक्षिण आफ्रिका हा योग्य मुलूख नव्हे. ही स्थिती कशी बदलता येईल, याच्या विचारात माझे मन अधिकाधिक गुंतू लागले. पण अद्याप माझे मुख्य कर्तव्य दादा अब्दुलांचा दावा सांभाळणे, हेच होते.

# २१. दाव्याची तयारी

दादा अब्दुल्लांच्या दाव्याचा पुरा अभ्यास केल्यावर माझ्या लक्षात आले की, त्यांची बाजू भक्कम आहे, कायदा त्यांच्या मदतीला आलाच पाहिजे. पण दावा कोर्टात लढत बसलो, तर दोघेही सोयरे, एकाच शहरचे रहिवासी धुळीला मिळणार, हे उघड दिसत होते. कोर्टातच राहिला तर दावा मनाला येईल तितके दिवस लांबविता येईल. मला वाटले की, माझे कर्तव्य दोघांची मैत्री जुळवून देणे, उभयता सोयऱ्यांचा मिलाप करणे, हे होय. तडजोडीसाठी मी जीवापाड मेहनत केली. दादा अब्दुल्लांचा जय झाला. दोन्ही पक्ष खूष झाले; दोघांची प्रतिष्ठा वाढली. माझ्या संतोषाला सीमा राहिली नाही. मी खरी वकिली शिकलो. मनुष्याची चांगली बाजू शोधून काढायला शिकलो. मनुष्याच्या हृदयात प्रवेश करण्याची कला साधली. मी ठरविले की वकिलांचे कर्तव्य पक्षकारांमध्ये पडलेली फूट भरून काढण्याचे आहे. हा पाठ माझ्या मनात इतका दृढमूल झाला, की माझ्या वीस वर्षांतील वकिलीचा बराचसा वेळ स्वतःच्या ऑफिसात बसून शेकडो दाव्यांच्या तडजोडी करविण्यातच गेला. त्यापासून माझे काही नुकसान झाले नाही. द्रव्याचे नुकसान झाले असे म्हणता येणार नाही, आत्म्याचे नुकसान तर नाहीच झाले.

# २२. को जाने कलकी

दावा संपला त्या अर्थी मला प्रिटोरियात राहण्याचे प्रयोजनच राहिले नाही. मी डरबनला गेलो. तेथे जाऊन हिंदुस्थानात परत जाण्याची तयारी केली. अब्दुल्ला शेठ मला मानपानाखेरीज जाऊ देण्यासारखे नव्हते. त्यांनी सिडनहॅममध्ये माझ्यासाठी मंडळी जमवून मेजवानी केली.

तेथे संबंध दिवस घालवायचा होता. माझ्यापाशी काही वर्तमानपत्रे पडली होती. ती मी चाळीत होतो. त्याच्या एका कोपऱ्यात मी एक लहानसा परिच्छेद पाहिला. मथळा 'इंडियन फ्रँचाइझ' असा होता. त्याचा अर्थ 'हिंदी मताधिकार'. परिच्छेदाचा मतितार्थ असा होता, की हिंदी लोकांना नाताळच्या विधिमंडळामध्ये सभासदांची निवडणूक करण्याचा हक्क होता, तो काढून घ्यावा. यासंबंधीच्या कायद्याची विधिमंडळामध्ये चर्चा चालू होती. मला या कायद्याची माहिती नव्हती. बैठकीतील कोणालाही हिंदी लोकांचे हक्क काढून घेणाऱ्या या खर्ड्याबद्दल काही गंध नव्हता.

मी अब्दुल्ला शेठना विचारले. ते म्हणाले,

"असल्या बाबतीत आम्हाला काय कळे? व्यापारावर काही अरिष्ट आले, तर तेवढेच आम्हाला समजणार." परंतु मला परत स्वदेशी जायचे होते, म्हणून मी माझे विचार बोलून दाखविले नाहीत. मी अब्दुल्ला शेठना म्हणालो, "पण हा कायदा जर आहे असाच पास झाला, तर तुम्हाला जड जाईल. हे तर हिंदी लोकांचा नायनाट करण्याच्या मार्गावरील पहिले पाऊल आहे. यामध्ये मानहानी आहे."

हा संवाद इतर पाहुणे लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "मी तुम्हाला खरेच सांगू ? जर तुम्ही या बोटीने न जाता महिनाभर थांबला, तर तुम्ही सांगाल त्याप्रमाणे आम्ही लढू." इतरांनीही त्याला दुजोरा दिला.

आता मी नाताळ सोडून जाण्यासारखी स्थिती राहिली नाही. लोकांनी मला चोहीकडून घेरले आणि नाताळातच कायम राहण्याचा अतिशय आग्रह केला. त्यामुळे मी नाताळात राहिलो.

हिंदी मताधिकार प्रतिबंधक कायद्याविरुद्ध निव्वळ अर्ज करून भागण्यासारखे नव्हते. त्याबद्दलची चळवळ चालू राहिली, तरच वसाहत-मंत्र्यावर काही परिणाम होणार होता. त्यासाठी एखाद्या संस्थेची स्थापना करणे आवश्यक वाटले. म्हणून अब्दुल्ला शेठबरोबर त्यासंबंधी चर्चा केली. इतर सहकाऱ्यांना भेटलो आणि एक सार्वजनिक संस्था स्थापण्याचा आम्ही निश्चय केला. अशा तऱ्हेने २२ मे १८९४ रोजी "नाताळ इंडियन कॉंग्रेस"चा जन्म झाला.

# २३. तीन पौंडांचा कर

सुमारे १८६० साठी जेव्हा नाताळात उसाचे पीक उत्तम होऊ शकेल, असे वसाहतवाल्या गोऱ्या लोकांना दिसले, तेव्हा ते मजुरांचा तपास करू लागले. मजूर मिळाले नाहीत, तर ऊस पिकणार नाही, साखर पाडता येणार नाही. नाताळातील हबशी लोकांकडून ही मजुरी होण्यासारखी नव्हती. त्यासाठी नाताळातील गोऱ्या लोकांनी हिंदुस्थान सरकारबरोबर खलबत करून हिंदी मजुरांना नाताळात घेऊन जाण्याची परवानगी मिळविली. त्यांना पाच वर्षांपर्यंत मजुरी करायला बांधून घेतले.

पाच वर्षांअखेर नाताळात स्वतंत्रपणे वसण्याची त्यांना मोकळीक दिली होती. जमिनीची मालकी धारण करण्याचा पूर्ण हक्कही दिला होता. त्यांना अशा तऱ्हेची लालूच देण्यात आली होती.

ह्याचा लाभ हिंदी मजुरांनी त्यांच्या अपेक्षे-पलीकडे घेतला. भाजीपाला खूप पिकविला. हिंदुस्थानातील कित्येक चवदार भाज्या नेऊन लावल्या. पूर्वीपासून होत असलेल्या भाज्या स्वस्त केल्या. हिंदुस्थानातून नेऊन आंब्यांची लागवड केली. पण त्याबरोबरच त्यांनी व्यापारही करायला सुरुवात केली. घरे बांधण्यासाठी जमिनी खरेदी केल्या आणि कित्येकजण मजुरांचे मोठे घरंदाज जमीनदार बनले. मजुरांमधून तयार झालेल्या या असल्या घरंदाज लोकांच्या पाठोपाठ स्वतंत्र व्यापारीही आले.

गोरे व्यापारी चपापले. हिंदी मजूर आल्या-बद्दल प्रथम त्यांना संतोष वाटला. पण तेव्हा त्यांना त्यांच्या अंगच्या व्यापारी कौशल्याची कल्पना आली नव्हती. ते स्वतंत्र शेतकरी बनले, तरी त्यावेळी त्यांना हरकत वाटत नव्हती.

पण व्यापारात त्यांची स्पर्धा त्यांना सहन होईनाशी झाली.

हे हिंदी लोकांना होणाऱ्या विरोधाचे मूळ कारण. त्यात इतर गोष्टींची भर पडली. तो विरोध मताधिकार काढून घेणाऱ्या आणि गिरमिट्यांवर कर लादणाऱ्या कायद्यांच्या रुपाने प्रकट झाला.

या कराराविरुद्ध तीव्र झगडा सुरू झाला. काँग्रेसला जर लढ्याचा विसर पडला असता किंवा कर अनिवार्य आहे, असे समजून ती गप्प बसली असती, तर हा कर आजतागायत हिंदी गिरमिट्यां-पासून वसूल करण्यात आला असता आणि त्याचे लांच्छन तिकडील हिंदी लोकांबरोबर समस्त हिंदुस्थानलाही लागले असते.

आता मला दक्षिण आफ्रिकेत येऊन तीन वर्षे होऊन गेली होती. मी लोकांना ओळखू लागलो होतो, लोक मला ओळखू लागले होते. १८९६ साली सहा महिने घरी जाण्याची मी परवानगी मागितली. दक्षिण आफ्रिकेत बराच काळपर्यंत रहावे लागणार असे मला दिसत होते. माझी वकिली चांगली चालली होती. असे म्हणायला हरकत नाही. सार्वजनिक कार्यासाठी लोकांना माझी गरज वाटत होती. म्हणून मी दक्षिण आफ्रिकेमध्ये सहकुटुंब राहण्याचा विचार केला. शिवाय हिंदुस्थानात गेलो, तर तेथे काही सार्वजनिक कामही करता येईल असे मला वाटले. हिंदुस्थानातील लोकमत जागृत करून या प्रश्नाकडे लोकांचे अधिक लक्ष वेधून घेता येईल, अशी माझी समजूत होती.

# खंड ५: हिंद भेट

## २४. हिंदुस्थानात

मुंबईला न थांबता मी राजकोटला गेलो आणि एक पुस्तिका लिहिण्याची तयारी केली. त्यात दक्षिण आफ्रिकेत जी परिस्थिती होती, तिची माहिती द्यायची होती. पुस्तिका लिहून, छापून काढण्यात सुमारे एक महिना गेला. पुस्तिकेला हिरवे वेष्टण घातलेले होते. त्यावरून पुढे तिची 'हिरवी पुस्तिका' या नावाने प्रसिद्धी झाली. त्यात मी दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांच्या स्थितीचे चित्र हेतूपूर्वक सौम्य रेखाटले होते. हिरव्या पुस्तिकेच्या दहा हजार प्रती छापविल्या व त्या सबंध हिंदुस्थानातील वर्तमानपत्रांना आणि सर्व पक्षांच्या प्रसिद्ध लोकांना पाठविल्या. पायोनियरमध्ये त्याच्यावर सर्वात प्रथम लेख प्रसिद्ध झाला. त्याचा सारांश विलायतेला गेला आणि त्या सारांशाचा सारांश पुन: रॉयटर-मार्फत नाताळला गेला. ही तार अवघी तीन ओळींची होती. तीत नाताळात हिंदी लोकांना कशा तऱ्हेने वागविण्यात येते, याचे जे चित्र मी रेखाटले होते, त्याची अतिशयोक्तीपूर्ण लहान आवृत्ती होती. ती माझ्या शब्दांत नव्हती. तिचा परिणाम काय झाला, ते पुढे पाहू. हळूहळू सर्व प्रमुख वर्तमान-पत्रांमध्ये या प्रश्नाची सविस्तर चर्चा झाली.

ही पुस्तिका टपालात टाकण्यासाठी कागद वगैरे गुंडाळून तयार करण्याचे काम कठीण होते; ते पैसे देऊन करून घ्यावे, तर फार खर्च आला असता. मी एक सोपी युक्ती शोधून काढली. आळीतील सर्व मुलांना एकत्र केले आणि त्यांच्यापैकी जेवढ्यांना आपल्या सकाळच्या वेळापैकी दोन-तीन तास देता येण्यासारखे असतील, त्यांनी ते द्यावे, अशी त्यांच्यापाशी मागणी केली. मुलांनी खुषीने एवढे काम करण्याचे मान्य केले. माझ्याकडून मी त्यांना माझ्याकडे जमलेली वापरलेली पोस्टाची तिकीटे आणि आशीर्वाद देण्याचे कबूल केले. मुलांनी हसत खेळत माझे काम पुरे करून दिले. लहान मुलांनाही अशा तऱ्हेने स्वयंसेवक बनविण्याचा हा माझा पहिला प्रयोग होता. या मुलांपैकी दोघेजण आजही माझ्याबरोबर काम करीत आहेत.

मोठमोठ्या शहरांमध्ये सभा भरवून लोकमताला विशेष चालना देण्याचा माझा विचार होता. त्यासाठी प्रथम मी मुंबईला गेलो. मुंबई आणि पुण्यानंतर मी मद्रासला गेलो आणि मद्रासहून कलकत्याला गेलो. इतक्यात डरबनहून तार आली,"पार्लमेंट जानेवारीत भरणार; लगेच परत फिरा."

डिसेंबरच्या सुरुवातीला माझी धर्मपत्नी, दोन मुलगे माझ्या स्वर्गस्थ मेव्हण्यांचा मुलगा यांना घेऊन दक्षिण आफ्रिकेला दुसऱ्यांदा जाण्यासाठी निघालो. या 'कुरलैण्ड' बोटीबरोबर दुसरी एक बोट 'नादेरी' सुद्धा डरबनला जाण्यासाठी सुटली. तिचे एजंट दादा अब्दुल्ला होते. दोन्ही बोटींत मिळून आठशेच्या आसपास हिंदी प्रवासी असावेत. त्यांपैकी अर्धे-अधिक ट्रान्सवालला जाणारे होते.

# खंड ६: दक्षिण आफ्रिकेत परत

## २५. दक्षिण आफ्रिकेत आगमन आणि तुफान

डिसेंबरच्या १८ तारखेच्या सुमारास दोन्ही बोटींनीं नाताळ बंदरात नांगर टाकले. दक्षिण आफ्रिकेच्या बंदरांमध्ये उतारूंच्या आरोग्याची कसून तपासणी होते. वाटेत कोणाला सांसर्गिक रोग लागू झाला असेल, तर त्याला विटाळात-क्वारंटाइनमध्ये बसवितात. आम्ही मुंबईतून निघालो तेव्हा तेथे प्लेग चालूच होता. त्यामुळे आम्हाला विटाळात पडण्याची थोडीबहुत भीती होतीच. डॉक्टर आले. तपासणी करून पाच दिवसांचा विटाळ पाळण्यात आला. कारण प्लेगचे जंतू तेवीस दिवसांपर्यंत परिणाम करू शकतात, अशी त्यांची समजूत होती; आणि म्हणून त्यांनी मुंबई सोडल्यापासून तेवीस दिवसांपर्यंत आगबोटींना विटाळात बसविण्याचे ठरविले. पण या विटाळाच्या हुकुमातील हेतू आरोग्य एवढाच नव्हता.

आम्हाला माघारी घालविण्याची चळवळ डरबनमधील गोऱ्या नागरिकांनी चालविली होती. हेही या हुकुमाचे एक कारण होते. दादा अब्दुल्लांकडून शहरात चाललेल्या या चळवळीची माहिती आम्हास मिळत होती. गोरे लोक एकाहून एक जंगी सभा करीत होते. एका बाजूला मूठभर गरीब बापडे हिंदी लोक आणि त्यांचे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके इंग्रज मित्र; दुसऱ्या बाजूला द्रव्यबळ, बाहुबळ, विद्याबळ आणि संख्याबळ यांनी परिपूर्ण असे गोरे. त्या बलवान प्रतिपक्षाला सत्ताबळही मिळाले; कारण नाताळच्या सरकारने त्यांना उघडपणे मदत केली. मि. हॅरी एस्कंब प्रधानमंडळात होते आणि तेथील कर्तेधर्ते होते. त्यांनी या मंडळींच्या सभेमध्ये उघडपणे भाग घेतला.

उतारूंच्या मनोरंजनासाठी आगबोटीवर करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येत असत. थट्टामस्करीमध्ये मी भाग घेत होतो; परंतु माझे मन डरबनमध्ये चाललेल्या लढ्यामध्येच गुंतले होते. कारण, या हुल्लडीचा मुख्य रोख माझ्यावरच होता. माझ्यावर दोन आरोप होते:

१. मी हिंदुस्थानात नाताळवासी गोऱ्या लोकांची निराधार नालस्ती केली.

२. नाताळ प्रांत हिंदी लोकांनी भरून टाकण्याचा माझा इरादा होता आणि त्यासाठी मुद्दाम नाताळमध्ये वसविण्यासाठी मी 'कूरलैंड' व ‘नादेरी' बोटींतून लोकांना भरून आणले होते.

नाताळात येण्यासाठी मी कोणालाही गळ घातली नव्हती. उतारूंना मी ओळखत नव्हतो. 'कूरलैंड'वरील माझ्या दोन-तीन नातलगांपलीकडे शेकडो उतारूंची नावेगावेही मला माहिती नव्हती. मी हिंदुस्थानात नाताळच्या गोऱ्यांविषयी एक अक्षरही असे बोललो नाही, जे मी अगोदरच नाताळमध्ये बोललो नव्हतो आणि मी बोललो त्याच्या समर्थनार्थ माझ्यापाशी भरपूर पुरावे होते.

अशा तऱ्हेने आमचे दिवस चालले होते.

अखेर तेवीस दिवसांनी आगबोटीची सुटका झाली आणि उतारूंनां उतरण्याचा हुकूम देण्यात आला.

आगबोट धक्क्याला लागली. उतारू उतरले. पण माझ्या बाबतीत मि. एस्कंबनी कप्तानाला कळविले होते की, “गांधींना व त्यांच्या कुटुंबाला सायंकाळी उतरवा. त्यांच्याविरुद्ध गोरे लोक फार चिडले आहेत व त्यांचा जीव धोक्यात आहे. धक्क्यावरील सुपरिटेंडंट टॅटम त्यांना संध्याकाळी घेऊन जातील.” कप्तानाने मला हा निरोप दिला. मी कबूल झालो. पण हा निरोप मिळाल्याला अर्धा तासही झाला नसेल, इतक्यात मि. लॉटन आले आणि कप्तानाकडे जाऊन म्हणाले, “जर मि. गांधी माझ्याबरोबर यायला तयार असतील, तर मी त्यांना स्वत:च्या जबाबदारीवर घेऊन जाऊ इच्छितो. बोटीच्या एजंटाचा वकील या नात्याने मी तुम्हाला सांगतो, की मि. गांधींसंबंधी जो निरोप तुम्हाला मिळाला आहे, त्यातून तुम्ही मुक्त आहात.”

कप्तानाला याप्रमाणे सांगून मि. लॉटन माझ्याकडे आले आणि माझेपाशी पुढील अर्थाचे बोलले: “जर तुम्हाला जिवाची भीती वाटत नसेल, तर माझी इच्छा आहे, की श्रीमती गांधी व मुले यांनी गाडीतून रुस्तमजी शेठकडे जावे आणि तुम्ही व मी राजरस्त्याने चालत जावे. तुम्ही अंधार पडल्यानंतर गुपचूप शहरात शिरावे, हे मला बिलकुल आवडणार नाही. मला वाटते की, तुमच्या केसालाही धक्का लागणार नाही. आता सर्वत्र शांतता आहे. गोरे लोक आपापल्या ठिकाणी निघून गेले आहेत. पण काही असले, तरी तुम्ही लपून प्रवेश करूच नये असे माझे मत आहे.” मी कबूल

झालो. माझी धर्मपत्नी व मुले गाडीतून रुस्तमजी शेठकडे गेली आणि सुखरुप पोहोचली. मी कप्तानाचा निरोप घेऊन मि. लॉटन बरोबर उतरलो. रुस्तम शेठचे घर सुमारे दोन मैल अंतरावर असावे.

आम्ही आगबोटीतून उतरलो, तोच कित्येक पोरांनी मला ओळखले आणि “गांधी, गांधी” असा पुकारा केला. लगेच दोन-चार इसम जमले आणि ओरडा मोठ्याने सुरू झाला, जमाव मोठा होणार असे दिसताच मि. लॉटननी रिक्षा मागविली. मला तिच्यात बसणे कधीही आवडत नसे. हा माझा पहिलाच अनुभव होता. पण पोरे कसली बसू देतात ? त्यांनी रिक्षावाल्याला धमकी दिली, तेव्हा तो चालता झाला. आम्ही पुढे चालू लागलो. जमाव वाढत चालला. चांगली गर्दी झाली. पहिल्या प्रथम त्या जमावाने मला मि. लॉटनपासून वेगळा पाडला. मग माझ्यावर दगडांचा व कुजक्या अंड्यांचा वर्षाव सुरू झाला. एकाने माझी पगडी उडवून दिली. लाथा सुरू झाल्या. मला घेरी आली. मी जवळच्या घराची जाळी धरून दम खाल्ला. तिथे उभे राहता येण्याजोगे नव्हते. तडाखे बसू लागले. तेथील पोलीस सुपरिटेंडंटची पत्नी मला ओळखीत होती, ती या रस्त्याने चालली होती. मला पाहताच ती माझ्या बाजूला येऊन उभी राहिली. ऊन नव्हते तरीही तिने आपली छत्री उघडून धरली. त्यामुळे जमाव काहीसा नरम झाला. आता मार द्यायचा तर श्रीमती अलेक्झांडरना चुकवून द्यावा लागणार.

यापूर्वीच कोणी हिंदी तरूण मला मार बसताना पाहून पोलीस ठाण्यावर धावून गेला होता. सुपरिटेंडंट अलेक्झांडरनी एक तुकडी माझ्या सभोवार राहून माझा बचाव करण्यासाठी पाठविली. ती वेळेवर येऊन पोचली. माझा रस्ता पोलीस ठाण्यावरून जात होता. सुपरिटेंडंटनी मला ठाण्यामध्येच आश्रय घेण्याबद्दल सुचविले. मी ते नाकारले आणि म्हटले, “आपली चूक लक्षात आली, की लोक शांत होतील. माझा त्यांच्या न्यायबुद्धीवर विश्वास आहे.” त्या तुकडीबरोबर चालून मी पारशी रुस्तमजींच्या घरी सुखरुप पोहोचलो. मला पाठीवर मार बसला होता. पण रक्त असे एकाच ठिकाणी आले होते. बोटीवरील डॉक्टर दादी बरजोर तेथेच होते. त्यांनी माझ्यावर चांगल्या प्रकारे उपचार केले.

अशा तऱ्हेने आत सर्व शांत होते; पण बाहेर गोऱ्या लोकांनी घराला वेढा दिला होता. सूर्यास्त होऊन गेला होता. अंधार पडला. हजारो लोक बाहेर आरडाओरड करीत होते आणि "गांधीला आमच्या स्वाधीन करा" अशा आरोळ्या उठत होत्या. एकंदर परिस्थिती लक्षात घेऊन सुंपरिटेंडंट अलेक्झांडर तेथे येऊन पोहोचले आणि जमावाला धमक्यांनी नव्हे; पण विनोद करून आवरून धरू लागले. तरी पण त्यांना आतून काळजी वाटतच होती. त्यांनी मला पुढील आशयाचा निरोप पाठविला: "जर तुम्हाला तुमच्या मित्राचे घर व मालमत्ता आणि तुमचे कुटुंब यांचा बचाव करायचा असेल, तर मी सांगेन त्या रीतीने तुम्ही गुप्तपणे या घरातून पळून गेले पाहिजे."

सुपरिटेंडेंटच्या सूचनेप्रमाणे मी हिंदी शिपायाचा पोषाख चढविला. डोक्यावर कदाचित मार बसेल, तर त्यापासून बचाव करण्यासाठी पितळेचे तबक ठेवले आणि त्याच्यावरून मद्रासी पद्धतीचा फेटा लपेटला. बरोबर दोन डिटेक्टिव्ह होते. त्यांपैकी एकाने हिंदी व्यापाऱ्याचा पोषाख केला; स्वत:चे तोंड हिंदी माणसाच्या तोंडाप्रमाणे रंगवले. दुसऱ्या इसमाने कसला पोषाख केला, ते आता मला स्मरत नाही. आम्ही बाजूच्या गल्लीतून जवळच्या एका दुकानात शिरलो आणि गोदामात रचलेल्या गोणींच्या राशीवरून अंधारातल्या अंधारात चढून जाऊन दुकानाच्या दरवाजाने बाहेरच्या घोळक्यात पसार झालो. रस्त्याच्या नाक्यावर गाडी उभी होती, तीत मला बसवून पूर्वीच्याच, ज्याचा आश्रय घेण्याबद्दल सुपरिटेंडंट अलेक्झांडरनी सुचविले होते, त्या ठाण्यावर ते घेऊन गेले. मी सुपरिटेंडंट अलेक्झांडरचे, त्याचप्रमाणे गुप्त पोलिसांच्या अंमलदाराचे आभार मानले.

अशा तऱ्हेने एकीकडून मला पळवून नेत असता दुसरीकडे बाहेर सुपरिटेंडंट अलेक्झांडर त्या घोळक्याला गाणे सांगत होते. त्या गाण्याचे भाषांतर असे:

"चला फाशी द्यायला,"

"चिंचेच्या झाडावर गांधीला."

जेव्हा मी सुखरूप ठाण्यावर पोहोचल्याची बातमी सुपरिटेंडंट अलेक्झांडरला मिळाली, तेव्हा ते त्या जमावाला म्हणाले, "तुमची शिकार तर या दुकानातून जीवानिशी पळून गेली आहे." गर्दीपैकी कित्येक संतापले, कित्येक हसू लागले; पुष्कळांना ते खरेच वाटेना.

"जर तुमचा विश्वास बसत नसेल, तर मग तुमच्यातून ज्यांना नेमाल, त्यांना मी आत घेऊन जातो. त्यांनी तपासून पहावे. जर तुम्हाला गांधी सापडला, तर त्याला तुमच्या स्वाधीन करीन, नाही सापडला, तर तुम्ही घरी जावे. तुम्ही पारशी रुस्तमजीच्या घराला आग लावणार नाही किंवा गांधीच्या बायकापोरांना दुखापत करणार नाही याबद्दल मला खात्री आहे," सुपरिटेंडंट अलेक्झांडर म्हणाले.

टोळीने प्रतिनिधी नेमले. प्रतिनिधींनी टोळीला निराशाजनक अहवाल दिला. सर्वजण सुपरिटेंडंट अलेक्झांडरची समयसूचकता व चातुर्य वाखाणीत, तर कित्येकजण दातओठ खात आपापल्या घरी गेले.

मरहूम मि. चेंबरलेन, जे त्या काळी संस्थानांचे प्रतिनिधी होते; त्यांनी माझ्यावर हल्ला करणाऱ्यांवर खटला चालविण्याबद्दल व मला न्याय मिळेलसे करण्याबद्दल तार पाठविली. मि. एस्कंबनी मला आपल्याकडे बोलावून नेले. मला झालेल्या दुखापतीबद्दल दिलगिरी व्यक्त केली आणि म्हटले, "तुमच्या केसाला धक्का लागलेला मला पसंत पडणार नाही. हे तुम्ही खरे मानालच. मि. लॉटनचा सल्ला स्वीकारून तुम्ही लगेच उतरून जाण्याचे धाडस केले, तसे करण्याचा तुम्हाला हक्क होताच, पण माझ्या निरोपाला मान दिला असतात, तर हा दुःखद प्रसंग घडला नसता. आता जर तुम्ही हल्ला करणाऱ्यांना ओळखू शकलात, तर त्यांना पकडून त्यांच्यावर कार्यवाही करण्यास मी तयार आहे.  मि. चेंबरलेनचीही तशी मागणी आहे."

मी जबाब दिला, "मला कोणावरही कार्यवाही करायची नाही. हल्ला करणाऱ्यांपैकी एक-दोघांना कदाचित मी ओळखू शकेन; पण त्यांना शिक्षा करवून मला काय मिळणार ? शिवाय हल्ला करणाऱ्यांचा मी दोषही काढीत नाही. त्यांना असे भासविण्यात आले की, मी हिंदुस्थानात अतिशयोक्ती करून नाताळच्या गोऱ्या लोकांची नालस्ती केली. ही गोष्ट त्यांना खरी वाटली आणि ते संतापले. तर त्यात नवल काय ? खरा दोष वरच्या लोकांचा आणि माझं मत विचाराल, तर तुमचा म्हटला पाहिजे. तुम्ही लोकांना योग्य मार्गाने नेऊ शकत होता, पण तुम्हीसुद्धा रॉयटरची तार खरी मानली आणि मी अतिशयोक्ती केली अशी समजूत करून घेतली. मला कोणावरच

कार्यवाही करायची नाही. खरी गोष्ट समोर आली आणि लोकांना समजली म्हणजे त्यांचा त्यांनाच पश्चात्ताप होईल."

"तर मग तुम्ही मला ही गोष्ट लिहून द्याल ? मला त्याप्रमाणे मि. चेंबरलेनना तार करावी लागेल. तुम्ही घाईघाईने काही लिहून द्यावे असे मी म्हणत नाही. तुम्ही मि. लॉटनना व इतर मित्रांना विचारून जे योग्य वाटेल ते करावे, अशी माझी इच्छा आहे. एवढे मात्र मी कबूल करतो की, जर तुम्ही हल्ला करणाऱ्यांवर कार्यवाही केली नाही, तर सर्व स्थिरस्थावर करणे मला फार सोपे जाईल आणि तुमची प्रतिष्ठा तर खात्रीने वाढेलच."

मी जबाब दिला, "या बाबतीतील माझे विचार ठरून गेलेले आहेत. मला कोणावरच कार्यवाही करायची नाही, हा निश्चय आहे; त्याअर्थी मी येथेच तुम्हाला लिहून द्यायला तयार आहे."

असे म्हणून मी योग्य मजकुराचे पत्र लिहून दिले.

मी उतरलो त्याच दिवशी 'नाताळ ॲडव्हर्टाइझर' चा प्रतिनिधी माझी मुलाखत घेऊन गेला होता. त्याने मला खूप प्रश्न विचारले आणि त्यांची उत्तरे देताना मी प्रत्येक आरोपाचे संपूर्णपणे निराकरण करू शकलो होतो. सर फिरोजशहांच्या सूचनेने हिंदुस्थानात त्या वेळी मी एकही भाषण लिहिल्या-खेरीज दिले नव्हते. या माझ्या सर्व भाषणांचा आणि लेखांचा संग्रह माझ्यापाशी होताच. मी त्याला तो दिला आणि सिद्ध करून दिले की, हिंदुस्थानात मी अशी एकही गोष्ट सांगितली नाही की, जी अधिक जोरदार शब्दांत दक्षिण आफ्रिकेमध्ये सांगितली नसेल. मी असेही दाखवून दिले की, 'कूरलैंड' व "नादेरी'वरील उतारूंना आणण्यात माझा मुळीच हात नव्हता. त्यांच्यापैकी पुष्कळजण जुनेच होते आणि पुष्कळसे नाताळात राहणार नव्हते, तर ट्रान्सवालला जाणार होते. त्यावेळी नाताळात मंदी होती. ट्रान्सवालमध्ये पुष्कळ जास्त कमाई होत असे. त्यामुळे पुष्कळ हिंदी तिकडे जाणे पसंत करीत. या खुलाशाचा, त्याचप्रमाणे हल्ला करणाऱ्यांवर फिर्याद करण्याचे मी नाकारले, त्याचा इतका परिणाम झाला की, गोऱ्या लोकांना शरम वाटली. वर्तमानपत्रांनी मला निर्दोष ठरविले आणि हल्ला करणाऱ्यांना दोष दिला. अशा तऱ्हेने मला अखेरीला लाभच झाला.

माझा लाभ तो कार्याचा लाभ होता. दक्षिण आफ्रिकेत हिंदी समाजाची प्रतिष्ठा वाढली आणि माझा मार्ग अधिक सरळ झाला. तीन-चार दिवसांत माझी दिनचर्या सुरू झाली.

# २६. साधी राहणी

धोब्याचा खर्च मला फाजील वाटला. शिवाय धोबी कपडे वेळेवर आणून देत नसे, त्यामुळे दोन-तीन डझन शर्ट आणि तितक्याच कॉलरी, एवढ्यानेही माझे भागेना. कॉलरी रोज बदलायच्या; शर्ट रोज नाही तर एक दिवसाआड बदलायचे. याप्रमाणे दोन्हीकडून खर्च होई. हे मला अनावश्यक वाटले. म्हणून धुण्याचे सामान आणून ठेवले. धुण्याच्या कलेचे पुस्तक वाचून धुवायला शिकलो; पत्नीलाही शिकविले. कामाचा बोजा काहीसा वाढला, पण काम नवीन त्यामुळे मजा वाटे.

माझी स्वत:ची धुतलेली पहिली कॉलर विसरणे शक्य नाही. तिला खळ जास्त लागली आणि इस्त्री पुरेशी गरम नव्हती. त्यातच आणखी कॉलर कडक तर बनली, पण तिच्यावरून खळ गळून पडत होती. अशा थाटात मी कोर्टात गेलो आणि बॅरिस्टरांच्या थट्टेचा विषय होऊन बसलो. पण माझ्यामध्ये अशा तऱ्हेची थट्टा सहन करण्याची शक्ती त्यावेळीही भरपूर होती.

“कॉलर हाताने धुण्याचा हा पहिलाच प्रयोग आहे, त्यामुळे तिच्यावरून खळ गळून पडत आहे. मला त्यापासून काहीच अडचण होत नाही आणि शिवाय तुम्हा सर्वांची इतकी करमणूक होत आहे, वर हा सुद्धा फायदाच,” मी खुलासा केला.

“पण धोबी तर मिळतनासे झाले नाहीत ?” एका मित्राने विचारले.

“येथील धुलाईखर्च मला तरी असह्य वाटतो. कॉलरच्या किमतीइतकीच धुलाई होते आणि एवढे करूनही धोब्याच्या हातात मुसक्या. त्यापेक्षा स्वत: धुणे मला बरे वाटते.”

धोब्याच्या गुलामगिरीतून सुटलो त्याप्रमाणेच हजामाच्या गुलामगिरीतून सुटण्याचा प्रसंग आला. विलायतेला जाणारे सर्वच लोक स्वत:ची दाढी करायला शिकतात, पण केस कापायलासुद्धा कोणी शिकत असतीलशी माझी कल्पना नव्हती. प्रिटोरियामध्ये एकदा मी इंग्रज हजामाच्या दुकानात गेलो. त्याने माझी हजामत करण्याचे साफ नाकारले आणि नाकारताना जो तिरस्कार व्यक्त केला, तो निराळाच. मला वाईट वाटले. लगेच बाजारात जाऊन केस कापण्याचा

संच विकत आणला आणि आरशासमोर उभे राहून केस कापले. समोरचे केस कसेबसे कापले तर गेले; पण मागचे कापताना फार पंचाईत पडली; सरळ तर कापता आलेच नाहीत. कोर्टात हशा पिकला.

"तुझ्या डोक्यावर उंदरांनी प्रयोग केलेला दिसतो !"

मी म्हटले, "नाही. माझ्या काळ्या डोक्याला गोरा हजाम स्पर्श कसा करणार ? म्हणून बरे-वाईट, पण स्वत: कापलेले केस मला अधिक प्रिय वाटतात."

या उत्तराचे मित्रांना आश्चर्य वाटले नाही.

खरे पाहता त्या हजामाचा काही दोष नव्हता. तो श्यामवर्ण लोकांचे केस कापू लागला, तर त्याचा धंदा बसणार. आम्ही तरी उच्चवर्णीय हिंदूंच्या हजामांना आमच्या अस्पृश्यांचे केस कोठे कापू देतो ? याचे प्रायश्चित्त मला दक्षिण आफ्रिकेत एकदा नव्हे, तर अनेक वेळा मिळाले आहे. आणि आमच्या स्वत:च्याच कर्माचे हे फळ आहे, अशी माझी समजूत असल्याने मला या गोष्टीबद्दल कधी राग आलेला नाही.

# २७. एक पुण्यस्मरण आणि प्रायश्चित्त

डरबनमध्ये मी वकिली करीत होतो, त्यावेळी माझे कारकून पुष्कळदा माझ्याबरोबर राहात असत. त्यांत हिंदूही असत आणि ख्रिस्तीही असत. प्रांतवार बोलायचे झाले तर, गुजराथी आणि मद्रासी असत. त्यांच्याबद्दल माझ्या मनात कधी भेदभाव उत्पन्न झाल्याचे मला स्मरत नाही. त्यांना मी कुटुंबातलेच मानीत असे आणि पत्नीकडून त्या बाबतीत काही विघ्न आल्यास तिच्याबरोबर झगडतही असे. एक कारकून ख्रिस्ती होता. त्याचे आईबाप पंचम जातीचे होते.

आमच्या घराची बांधणी पाश्चात्य पद्धतीची होती. त्यात खोल्यांमध्ये मोरी असत नाही- असणे योग्यही नाही, असे मला वाटते. त्यामुळे प्रत्येक खोलीत मोरीऐवजी लघवीसाठी एक भांडे असते. ते उचलण्याचे काम नोकराचे नव्हते, आमचेच, यजमान यजमानिणीचे होते. जे कारकून स्वतःला घरच्याप्रमाणे समजू लागत, ते स्वतः आपापले भांडे उचलीतही. हे पंचम कुळात जन्मलेले कारकून नवे होते. त्यांचे भांडे आम्हालाच उचलणे प्राप्त होते. इतर भांडी कस्तुरबाई उचलीत असे, परंतु हा तिच्या मते कडेलोट झाला. आमच्यामध्ये धुसफूस झाली. मी भांडे उचलावे, तर तेही तिला कबूल नाही आणि स्वतः चालणेही तिला जड वाटले. डोळ्यांतून अश्रुबिंदूंची मोत्ये ढाळणाऱ्या, हातांत भांडे धरलेल्या, स्वतःच्या तांबड्या लाल डोळ्यांनी मला ठपका देत असलेल्या, जिन्यावरून उतरणाऱ्या कस्तुरबाईचे चित्र मी या घटकेलाही रेखाटू शकतो. पण मी जसा प्रेमळ तसाच निष्ठुर पती होतो. मी स्वतःला तिचा शिक्षकही समजत असे आणि त्यावरून आपल्या आंधळ्या प्रेमाला वश होऊन तिला नकोसेही करीत असे.

अशा तऱ्हेने तिने फक्त भांडे उचलल्याने माझे समाधान झाले नाही; ती हसतमुखाने नेईल, तेव्हा माझे समाधान होणार. म्हणून मी दोन शब्द खड्या सुरातच सुनावले. “असली धुसफूस माझ्या घरात नाही चालणार,” मी बडबडलो.

शब्द तीराप्रमाणे झोंबले. पत्नीचा क्रोधाग्नी पेटला. “तर मग तुमचे घर आपल्यापाशीच ठेवा ! ही मी चालले.” ईश्वराचे स्मरण मला राहिले नव्हते, दयेचा बिंदूही राहिला नव्हता. मी तिचा हात धरला. जिन्याच्या समोरच बाहेर जाण्याचा दरवाजा होता. मी त्या असहाय्य अबलेचा हात

धरून तिला दरवाजापर्यंत ओढीत नेली. दरवाजा अर्धा उघडला. डोळ्यांतून गंगा-यमुना वाहत आहेत, अशी कस्तुरबाई बोलली, "तुम्हाला एक लाज नाही, मला आहे. काही तरी लाज बाळगा. मी बाहेर पडून जाणार कुठे ? इथे आईबाप थोडेच आहेत, की त्यांच्याकडे जाऊ ? मी बायको पडले, तेव्हा तुम्ही द्याल त्या लाथा मला खाल्ल्या पाहिजेत. आता लाज बाळगा आणि दार बंद करा. कोणी पाहिले तर दोघांपैकी एकाचीही शोभा राहणार नाही." मी तोंड लालच्या लाल ठेवले, पण शरमलो मात्र खरा. दरवाजा बंद केला. पत्नी जर मला सोडून जाऊ शकत नव्हती, तर मी तरी तिला टाकून कुठे जाणार होतो ? आमच्यामध्ये भांडणे पुष्कळ झाली आहेत; पण नेहमी परिणाम कल्याणप्रदच झाला आहे. पत्नीने स्वतःच्या अद्‌भुत सहनशक्तीच्या जोरावर जय मिळवला आहे.

# २८. बोअर युद्ध

सन १८९७ ते ९९ पर्यंतचे इतर अनेक अनुभव सोडून देऊन आता बोअर युद्धावर येतो.

या बाबतींतील विचारांच्या ओढाताणीचे सूक्ष्म निरीक्षण मी ‘दक्षिण आफ्रिकेतील सत्याग्रहाचा इतिहास' या पुस्तकात केले आहे, म्हणून ते येथे करीत नाही. जिज्ञासू वाचकांनी तो इतिहास वाचावा, अशी माझी सूचना आहे. येथे एवढे सांगितले म्हणजे पुरे की, ब्रिटिश राज्याबद्दलच्या माझ्या राजनिष्ठेने मला बलात्काराने या युद्धात भाग घ्यायला लावले. मला असे वाटले, की जर मी ब्रिटिश प्रजानन या नात्याने हक्क मागत आहे, तर त्याच नात्याने ब्रिटिश राज्याच्या रक्षणामध्ये भाग घेणे हे माझे कर्तव्य आहे.

आमच्या तुकडीमध्ये सुमारे १,१०० लोक होते. त्यांत सुमारे ४० नाईक होते. या दिवसांमध्ये सर्वांना पुष्कळदा रोज वीसपंचवीस मैलांची मजल मारावी लागे आणि एकदा तर घायाळ सैनिकांना डोल्यांतून उचलून तेवढे मैल न्यावे लागले. अशा तऱ्हेने ज्या घायाळ योद्धयांना उचलून आम्हाला न्यावे लागले, त्यांमध्ये जनरल वूडगेट वगैरेही होते. सहा आठवड्यानंतर आमच्या तुकडीला निरोप देण्यात आला.

आमच्या अल्प कामगिरीची त्या वेळी तरी फार वाहवा झाली. त्यामुळे हिंदी लोकांची प्रतिष्ठा फार वाढली.

# २९. महागड्या भेटवस्तू

लढाईच्या कामातून मोकळा झाल्यानंतर मला वाटू लागले, की यापुढे माझे काम दक्षिण आफ्रिकेत नसून स्वदेशी आहे. स्वदेशाहून मित्रमंडळींचाही स्वदेशी येण्याबद्दल आग्रह चालू होता. मलाही वाटत होते, की स्वदेशी गेल्याने माझा उपयोग अधिक होऊ शकेल. मी सहकारी मंडळींजवळ मला मोकळा करण्याबद्दल मागणी केली. मोठ्या मुश्किलीने ती मागणी एका अटीवर पूर्ण झाली. अट अशी होती, की एका वर्षाच्या आत जर हिंदी समाजाला माझी जरूर वाटली, तर मी परत दक्षिण आफ्रिकेला यावे. मला ही अट कठीण वाटली, पण मी प्रेमपाशांनी जखडलेला होतो. हिंदी लोकांनी मला प्रेमामृताने न्हाऊ घातले. ठिकठिकाणी मानपत्रे देण्यासाठी सभा झाल्या आणि हरएक ठिकाणाहून मौल्यवान भेटी आल्या. भेटींमेध्ये सोन्या-चांदीच्या वस्तू तर होत्याच, पण हिरे-माणिकांच्या वस्तूदेखील होत्या.

यांपैकी मुख्य नजराणे ज्या दिवशी संध्याकाळी मिळाले, ती रात्र मी बावरलेल्या स्थितीत जागून काढली. खोलीत येरझारा घालीत राहिलो. पण कोडे सुटेना. शेकडो रुपयांचे नजराणे सोडून देणे कठीण वाटे, पण ते ठेवून घेणे त्याहून कठीण वाटत होते.

मी एक असले नजराणे पचवू शकेन. पण माझ्या मुलांचे काय ? पत्नीचे काय ? त्यांना मी सेवेचे शिक्षण देत असे; सेवेबद्दल मोबदला घेणे योग्य नाही असे सांगत असे.

घरामध्ये मी मौल्यवान दागिने वगैरे ठेवीत नसे. रहाणी अधिकाधिक साधी होत होती. अशा स्थितीत सोन्याची घड्याळे वापरणार कोण? सोन्याचे छडे आणि हिरेजडित अंगठ्या कोणी वापराव्या? त्या काळीसुद्धा मी इतरांना दागिन्यांची हौस सोडून देण्यास सांगत असे. मग मला या दागिन्यांचा आणि जवाहिरांचा उपयोग काय?

मी या वस्तू ठेवून घेता कामा नये, अशा निर्णयावर मी आलो. पारशी रुस्तुमजी इत्यादिकांना त्या दागिन्यांचे ट्रस्टी नेमून त्यांच्या नावे लिहून देण्याचा करार लिहून काढला आणि सकाळी स्त्री-पुत्रादिकांचा विचार घेऊन स्वतःचा भार हलका करण्याचा निश्चय केला.

पत्नीची समजूत घालणे कठीण जाणार, हे मी समजून होतो. मुलांची समजूत घालण्यात बिलकुल अडचण येणार नाही, याबद्दल मला खात्रीच होती. त्यांनाच माझे वकील करण्याचा बेत केला.

मुलांची लगेच समजूत पटली. "आम्हाला या दागिन्यांची जरूर नाही. आपण ते सर्व परत करावे आणि त्यातून आम्हाला असल्या वस्तू हव्या वाटल्या, तर आमचे आम्ही नाही का घेऊ शकत ?" असे ते म्हणाले.

मला आनंद वाटला. "तर मग आईची समजूत तुम्ही घालाल ना?" मी विचारले.

समाजसेवकाला खाजगी नजराणे घेताच येत नाहीत, असा माझा अभिप्राय बनला आहे.

"जरूर जरूर. ते आमचे काम. तिला तरी हे दागिने थोडेच अंगावर घालायचे आहेत ? ती ठेवणार आमच्यासाठी म्हणूनच. आम्हाला तर त्यांची जरूर नाही, मग ती कशाला हट्ट करेल ?" पण मला वाटले होते, त्याहून ते काम कठीण ठरले.

"तुम्हाला नसेल जरूर, तुमच्या मुलांनाही नसेल. मुलांचे काय ? जशी चढवावी तशी चढतात. मला नाही घालू दिलेत तरी हरकत नाही; पण माझ्या सुनांचे काय ? त्यांच्या तरी उपयोगी पडतील. आणि उद्याचे दिवस कसे येतील, हे तरी कोणी पाहिले आहे ? इतक्या प्रेमाने दिलेल्या वस्तू परत करणे बरे नाही," अशा तऱ्हेने वाग्धारा सुरू झाली आणि त्यातच अश्रुधारा येऊन मिसळली. मुले भक्कम राहिली; मला डगमगण्याचे कारणच नव्हते.

पुष्कळशा गोष्टींबद्दल मी जेमतेम कबुली मिळविली. १८९६ साली मिळालेल्या आणि १९०१ साली मिळालेल्या भेटी परत दिल्या. त्यांचा ट्रस्ट केला आणि त्यांचा सार्वजनिक कार्यासाठी माझ्या किंवा ट्रस्टींच्या इच्छेनुरूप उपयोग व्हावा, अशी अट ठरवून त्या बँकेत ठेवल्या.

त्या कृत्याबद्दल मला कधीही पश्चात्ताप वाटलेला नाही. कालांतराने कस्तुरबाईलाही त्यांतील रास्तपणा समजून आला. आम्ही पुष्कळ मोहांपासून बचावलो गेलो. माझे असे मत आहे कि सार्वजनिक ठिकाणी सेवकांनी मौल्यवान भेटवस्तू स्वीकारू नयेत.

# खंड ७: स्वदेशी

## ३०. महासभेमध्ये प्रथमच

हिंदुस्थानात पोहोचल्यानंतर काही काळ मी फिरण्यात दवडला. हे साल १९०१ होय. या वर्षीची महासभा (काँग्रेस) कलकत्याला होती. दिनशा एदलजी वाच्छा अध्यक्ष होते. मला महासभेला जायचेच होते. महासभेचा हा माझा पहिलाच अनुभव होता.

मी एका स्वयंसेवकाला विचारले, “मी कोठे जावे?” तो मला रिपन कॉलेजात घेऊन गेला. तेथे पुष्कळशा प्रतिनिधींची सोय केलेली होती. स्वयंसेवक एकमेकांच्या आड येत. जे काम ज्याच्यावर सोपवावे तो लगेच दुसऱ्याला बोलवे; दुसरा तिसऱ्याला. प्रतिनिधी बिचारा धड इकडेही नाही; तिकडेही नाही.

घाण तर अमर्याद ! जिकडे तिकडे पाणीच पाणी होऊन गेले होते. पायखाने थोडेच होते. त्यांच्या दुर्गंधीची आठवण झाली म्हणजे अजून अंगावर शहारे येतात. मी ती घाण स्वयं-सेवकाला दाखविली. त्याने साफ सांगितले की, “हे तर भंग्याचे काम !” मी केरसुणी मागितली. स्वयंसेवक माझ्याकडे डोळे फाडून पाहतच राहिला. मी केरसुणी पैदा केली. पायखाना साफ केला. पण हे झाले तरी माझ्या स्वत:च्या सोयीपुरते. गर्दी इतकी होती आणि शौचकूप एवढे कमी होते की, प्रत्येक वेळी उपयोग केल्यानंतर ते लगेच साफ होणे गरजेचे होते. तसे करणे माझ्या शक्तीबाहेरचे होते.

महासभा भरण्याला एक-दोन दिवसांचा अवधी होता. मी ठरविले होते की, महासभेच्या कचेरीत जर मला काम करायला मिळाले, तर करायचे आणि अनुभव मिळवायचा. श्री भूपेन्द्रनाथ बसू व श्री घोषाळ हे चिटणीस होते. भूपेन्द्रबाबूंपाशी गेलो आणि कामाची मागणी केली. ते माझ्याकडे पाहून म्हणाले, “माझ्यापाशी काही काम नाही. परंतु मि. घोषाळ कदाचित तुम्हाला काम देतील. त्यांच्याकडे जा.”

मी घोषाळबाबूंपाशी गेलो; त्यांनी मला न्याहाळून पाहिले. किंचित हसले आणि विचारले, “माझ्यापाशी कारकुनाचे काम आहे; ते कराल ?”

मी उत्तर दिले, “अवश्य करीन. माझ्या आवाक्याबाहेरचे नसेल असे कोणतेही काम करण्यासाठीच मी आपल्याकडे आलो आहे.”

“हे तरूणा, हीच योग्य भावना आहे.” शेजारी स्वयंसेवक उभे होते, त्यांच्याकडे पाहून ते म्हणाले, “या तरूणाने काय सांगितले ते ऐकले का ?”

मग माझ्याकडे वळून म्हणाले, “तर मग हा पहा पत्रांचा ढीग आणि ही माझ्यासमोरची खुर्ची. तिच्यावर बसा. माझ्यापाशी शेकडो लोक येत जात असतात हे तुम्ही पाहताच. त्यांच्याशी बोलू की, हे रिकामटेकडे लोक पत्र खरडीत बसतात, त्यांना जबाब लिहीत बसू ? माझ्यापाशी अशा तऱ्हेचे कारकून नाहीत, ज्यांच्याकडून असले काम करून घेता येईल. या सर्व पत्रांमध्ये काहीच तथ्य नसणार. पण तुम्ही सर्व वाचून काढा. ज्यांना फक्त पत्र पोहोचल्याबद्दल लिहायचे असेल, त्यांना तसे लिहित चला आणि ज्यांच्या जबाबाविषयी मला विचारावे लागेल, त्यांच्याबद्दल मला विचारा.”

माझ्यावर एवढा विश्वास टाकल्याबद्दल मला आनंदाच्या गुदगुल्या होऊ लागल्या.

मला काम सोपविले तेव्हा श्री. घोषाळ मला ओळखीत नव्हते. नाव गाव समजून घेण्याचे काम त्यांनी मागाहून केले. माझा पूर्वेतिहास समजल्यानंतर मला कारकुनाचे काम दिल्याबद्दल त्यांना किंचित लाज वाटली. मी त्यांना निश्चिंत केले, “माझी गोष्ट कुठे आणि तुमची कुठे ? तुम्ही महासभेचे जुने सेवक. मला तुम्ही वडिलांसमान आहात. मी पडलो अननुभवी तरुण. हे काम देऊन तुम्ही माझ्यावर उपकारच केले आहेत. कारण मला महासभेमध्ये काम करायचे आहे, तिचा कारभार जाणून घ्यायची अलभ्य संधी तुम्ही मला दिलीत.” आमचा चांगला स्नेहसंबंध जुळला.

घोषाळबाबूंची बटणेही 'बॅरा'च लावीत असे, ते पाहून 'बॅरा'चे काम मीच उचलले. मला ते आवडे. वडील मंडळींबद्दल मला फार आदर वाटे. माझी ही वृत्ती जेव्हा त्यांच्या लक्षात आली, तेव्हा मग मला ते स्वत:ची सर्व प्रकारची सेवाचाकरी करू देऊ लागले. ते खूष झाले. मला जो लाभ झाला, त्याची तर किंमतच करता यायची नाही.

थोड्याच दिवसांत महासभेच्या कार्यपद्धतीची मला माहिती झाली. अनेक पुढाऱ्यांची भेट झाली. गोखले, सुरेंद्रनाथ वगैरे नेते येत जात. त्यांचे रीतीरिवाज मी पाहू शकलो. काळाचा जो अपव्यय चालला होता, त्याचेही मला पूर्ण ज्ञान झाले. इंग्रजी भाषेचे प्राबल्यही लक्षात आले. त्याबद्दल मला त्यावेळीही खेद वाटला. एकाकडून होण्याजोग्या कामावर अनेकजण नेमले जात, हे माझ्या लक्षात आले आणि कित्येक आवश्यक कामें करायला कोणीच मिळत नसे, हेही दिसून आले.

सर फिरोजशहांनी माझा दक्षिण आफ्रिकेबाबतचा ठराव घेण्याचे तर कबूल केलेच होते; पण तो ठराव विषयनियामक मंडळापुढे कोण मांडील, केव्हा मांडील असा विचार करीत मी बैठकीमध्ये बसलो होतो. एकेका ठरावावर लांबलचक भाषणे, सगळी इंग्रजीत ! प्रत्येक ठरावाचे पुरस्कर्ते थोर लोक ! या नगाऱ्यांपुढे माझ्या टिमकीचा आवाज कोण ऐकणार ? रात्र अधिक होत चालली तसतसे माझे काळीज धडधडू लागले. सर्वजण निघून जाण्याच्या तयारीत होते. रात्रीचे अकरा वाजले होते. माझी बोलण्याची हिम्मत होईना. मी गोखल्यांना भेटलो. त्यांनी माझा ठराव पाहिलेला होता. त्यांच्या खुर्चीपाशी जाऊन मी हळूच म्हटले: “माझे काहीतरी करा.”

“कसे काय, आता आटपले ना ?” सर फिरोजशहा म्हणाले.

“दक्षिण आफ्रिकेचा ठराव राहिला आहे ना ? मि. गांधी केव्हाचे वाट पाहत आहेत,” गोखले चटकन म्हणाले.

“तुम्हाला तो बरा वाटला ?”

“योग्य आहे !”

“तर मग गांधी, वाचा !”

मी कापत कापत वाचून दाखविला.

गोखल्यांनी अनुमोदन दिले.

“एकमताने पास,” सर्वजण एकदम बोलले.

“गांधी, तुम्ही पाच मिनिटे घ्यावी,” वाच्छा म्हणाले.

हे दृश्य पाहून मला बरे वाटले नाही. एकानेही ठराव समजून घेण्याची तसदी घेतली नाही, सर्वांना घाई झालेली होती. गोखल्यांनी पाहिला होता, तेवढ्यावरून इतरांना पाहण्याची किंवा ऐकून घेण्याची गरज वाटली नाही.

तरी पण महासभेत ठराव पास झाला एवढीच गोष्ट मला आनंद वाटण्यास पुरेशी होती. महासभेचा शिक्का ज्यावर पडला, त्यावर सर्व भारतवर्षाचा शिक्का पडला, या विचाराने कोणाचे समाधान होणार नाही ?

# ३१. मुंबईत स्थिर झालो

गोखल्यांची फार इच्छा होती, की मी मुंबईमध्ये कायम राहावे, तेथे बॅरिस्टरीचा धंदा करावा आणि आपल्याबरोबरच सार्वजनिक कामामध्ये भाग घ्यावा.

माझा धंदा द्रव्याच्या दृष्टीने वाटले होते, त्याहून चांगला चालतोसे दिसले. दक्षिण आफ्रिकेतील अशील मला काही ना काही काम देतच असत; त्यातून माझा खर्च सहज भागेल, असे मला वाटले.

मी स्वस्थ होण्याचा निश्चय करतो आणि स्वस्थतेचा अनुभव घेऊ लागतो, तों एकाएकी दक्षिण आफ्रिकेहून तार आली: “चेंबरलेन इकडे येत आहेत. तुम्हाला लगेच आले पाहिजे.” माझे वचन मला स्मरतच होते. मी तार केली, “मला प्रवासखर्च पाठवा; मी यायला तयार आहे.” त्यांनी लगेच पैसे पाठविले आणि ऑफिस बंद करून मी चालू लागलो दक्षिण आफ्रिकेला जायला निघालो.

# खंड ८: दक्षिण आफ्रिकेत

## ३२. परत दक्षिण आफ्रिकेला

मी डरबनला आवश्यक त्यापेक्षा एकही दिवस अगोदर पोहोचलो असे म्हणता आले नसते. माझ्यासाठी काम तयारच होते. मि. चेंबरलेनपाशी डेप्युटेशन नेण्याची तारीख नक्की होऊन गेली होती. मला त्यांच्यापुढे वाचावयाचा अर्ज तयार करावयाचा होता आणि डेप्युटेशनबरोबर जायचे होते.

पण मि. चेंबरलेननी हिंदी प्रतिनिधींना  वाटाण्याच्या अक्षताच लावल्या.

“तुम्हाला माहीतच आहे, की स्वायत्त वसाहतीवर साम्राज्यसरकारची सत्ता नावाचीच असते. तुमची गाऱ्हाणी तर न्याय्य दिसतात. माझ्याकडून होईल ते मी करीनच, पण तुम्ही होईल तेवढे करून स्थानिक गोऱ्या लोकांनाच राजी राखून राहिले पाहिजे.”

हे उत्तर ऐकून प्रतिनिधी थंडगार पडले. मी पण हात चोळीत बसलो. निजून उठल्यापासूनच नवा दिवस सुरू झाला असे म्हणून 'पुनश्च हरिः ॐ’ पासून सुरुवात करायची ठरविली. जोडीदारांची समजूत घातली.

मी म्हटले, “खरे पाहता ज्या कामासाठी मला बोलाविले होते, ते आता पुरे झाले, असे म्हणता येईल. मला वाटते की, तुम्ही मला रजा दिलीत तरीसुद्धा होता होईल तो मी ट्रान्सवाल सोडून जाऊ नये. यापुढे माझे काम नाताळमधून न चालता येथूनच चालले पाहिजे. एका वर्षाच्या आत परत जाण्याचा विचार सोडून देऊन आता मला येथेच वकिलीची सनद मिळविली पाहिजे. या नव्या खात्याला पुरून उरायची हिंमत माझ्यात आहे. या खात्याचा बंदोबस्त केला नाही, तर आपला समाज लुटला जाईल आणि कदाचित येथून आपल्याला पायही काढावा लागेल.”

अशा तऱ्हेचे मी बोलत असे. प्रिटोरिया व जोहान्सबर्गमध्ये राहणाऱ्या प्रमुख हिंदी लोकांच्या सल्ल्याने अखेरीस जोहान्सबर्गमध्ये ऑफिस ठेवण्याचे नक्की झाले.

# ३३. गीतेचा अभ्यास

गीतेवर माझे प्रेम आणि श्रद्धा तर होतीच; आता तिच्यामध्ये खोल उतरण्याची आवश्यकता भासू लागली. माझ्यापाशी एकदोन भाषांतरे होती. त्यांच्या सहाय्याने मूळ संस्कृत समजून घेण्याचा प्रयत्न केला आणि नेहमी एकदोन श्लोक पाठ करण्याचे ठरविले. सकाळच्या दातण-स्नानाच्या वेळेचा मी पाठांतरासाठी उपयोग करीत असे. दातणात पंधरा आणि स्नानात वीस मिनिटे अशी मिळून पस्तीस मिनिटे मी पाठांतरासाठी देत असे. समोरच्या भिंतीवर गीतेचे श्लोक लिहून काढून चिकटवीत असे आणि जरूर पडेल तसतसे पाहून घोकीत असे. हे घोकलेले श्लोक परत स्नान आटोपेपर्यंत पक्के होत. तेवढ्या वेळात मागच्या श्लोकांची एकदा उजळणीही करता येई. अशा तऱ्हेने तेरा अध्याय पाठ केल्याचे मला स्मरते.

माझ्या बाबतीत तरी तो ग्रंथ आचरणाचा एक श्रेष्ठ मार्गदर्शक बनला. तो माझा धार्मिक कोष झाला. अपरिग्रह, समभाव इत्यादी शब्दांनी मला पकडून धरले. समभाव कसा अभ्यासावा? कसा टिकवावा? तो टिकविण्यासाठी स्वतःपाशी असलेल्या सर्व गोष्टींचा त्याग करायचा?

लगेच जबाब मिळाला, की घर जाळल्या-खेरीज तीर्थ होणारच नाही. रेवाशंकरभाईंना लिहून कळविले, की विम्याची पॉलिसी बंद करा, काही मिळण्यासारखे असेल तर घ्या, नसेल तर भरलेले पैसे बुडाले म्हणा. बायकामुलांचे रक्षण त्यांचा, आमचा जन्मदाता करील. अशा अर्थाचे पत्र लिहिले. पितृतुल्य वडील बंधूंना लिहिले: "आजपर्यंत तर माझा खर्च भागून उरे, ते तुम्हाला अर्पण करीत गेलो. यापुढे माझी आशा सोडा. आता जी शिल्लक राहील, ती येथेच समाजासाठी वापरली जाईल."

# ३४. एका पुस्तकाचा विलक्षण परिणाम

मी नाताळला जायला निघालो. माझे मित्र मि. पोलाक मला पोचवायला स्टेशनवर आले होते. “हे पुस्तक प्रवासात वाचण्यासारखे आहे, ते वाचून काढा. तुम्हाला ते आवडेल,” असे म्हणून त्यांनी रस्किनचे 'अन टु धिस लास्ट’ हे पुस्तक माझ्या हातात दिले.

हे पुस्तक वाचण्यास सुरवात केल्यानंतर माझ्याने ते सोडवेच ना. त्याने मला भारूनच टाकले. जोहान्सबर्ग ते नाताळ चोवीस तासांचा रस्ता आहे. ट्रेन संध्याकाळी डरबनला पोहोचली. पोचल्यानंतर सबंध रात्रभर झोप येईना. पुस्तकात दर्शविलेले विचार अमलात आणण्याचा निश्चय झाला.

माझी अशी समजूत आहे, की जी गोष्ट माझ्यामध्ये खोल भिनलेली होती, तिचेच स्पष्ट प्रतिबिंब मला रस्किनच्या या ग्रंथरत्ना-मध्ये पाहावयास मिळाले. त्यामुळे त्याने माझ्यावर संपूर्ण ताबा मिळविला आणि त्याच्यातील विचारांची अंमलबजावणी माझ्याकडून करविली. आपल्यामध्ये ज्या सद्भावना सुप्त असतात, त्या जागृत करण्याची शक्ती ज्याच्यामध्ये असते तो कवी होय. सर्व कवींचा सर्वांवरच सारखा परिणाम होत नाही. कारण सर्वांमध्ये सर्वच चांगल्या भावना एकसारख्या प्रमाणात नसतात.

‘सर्वोदया'चे सिद्धांत मी समजलो ते असे:

१. सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे.

२. वकील काय किंवा न्हावी काय, दोघांच्याही कामाची किंमत सारखीच असली पाहिजे. कारण पोटापाण्याचा हक्क दोघांनाही सारखाच आहे.

३. साधे, अंगमेहनतीचे, शेतकऱ्याचे जीवन हेच खरे जीवन होय.

पहिली गोष्ट मला माहिती होती; दुसरी मला अंधूक दिसत होती; तिसरीचा मी विचारच केला नव्हता. पहिलीमध्ये दुसऱ्या दोन्ही गोष्टी समाविष्ट आहेत, हे मला सर्वोदयाने दिव्यासारखे स्पष्ट दाखविले. प्रभात झाली आणि या विचारांच्या अंमलबजावणीच्या प्रयत्नाला मी लागलो.

# ३५. फिनिक्सची स्थापना

सकाळी प्रथम मी वेस्टपाशी गोष्ट काढली. ‘सर्वोदय' पुस्तकाने माझ्यावर केलेला परिणाम मी त्यांना बोलून दाखविला व सुचविले की ‘इंडियन ओपिनियन’ एखाद्या शेतीच्या जमिनीत न्यावे. तेथे सर्वांनी एकसारखा पोटापुरता पगार घ्यावा, सर्वांनी आपापली शेती करावी आणि उरलेल्या वेळात ‘इंडियन ओपिनियन'चे काम करावे. वेस्टनी या सूचनेला रूकार दिला. प्रत्येकाला पोटगीखर्च तीन पौंड येईल, असा हिशेब केला होता. त्यात गोरे काळे असा भेद केला नव्हता.

अशा तऱ्हेने १९०४ साली फिनिक्सची स्थापना झाली आणि अनेक विपत्तींतून जावे लागले असले, तरी फिनिक्स संस्था व ‘इंडियन ओपिनियन’ दोन्ही अद्याप टिकून राहिले आहेत.

आता लवकर हिंदुस्थानात परतण्याची अथवा तेथे जाऊन स्थायिक होण्याची आशा मी सोडून दिली होती. पत्नीला एका वर्षात परतण्याचे आश्वासन देऊन मी दक्षिण आफ्रिकेत आलो होतो. एक वर्ष सरले, परंतु मला परतता येईल असे दिसेना, त्यामुळे पत्नी आणि मुलांनाच येथे आणण्याचा मी निश्चय केला.

# ३६. झुलू बंड

मी नित्यक्रमात रुळतो न रुळतो तोच एक अकल्पित घटना घडून आली. नाताळमध्ये ‘झुलू बंड' झाल्याची बातमी ऐकली. माझे झुलू लोकांशी वैर नव्हते. त्यांनी एकाही हिंदी माणसाचे काही वाकडे केलेले नव्हते. पण इंग्रजी साम्राज्य हे जगाचे हित करणारे साम्राज्य आहे, असे मला त्यावेळी वाटत असे. नाताळपाशी स्वयंसेवकांचे लष्कर होते.

मी स्वत:ला नाताळवासी समजत असे आणि नाताळशी माझा संबंध तर होताच. म्हणून मी गव्हर्नरला पत्र लिहिले की, जरूर असेल, तर जखमी लोकांची शुश्रुषा करण्या-साठी हिंदी लोकांची एक तुकडी घेऊन जाण्यास मी तयार आहे.

गव्हर्नरचा लगेच होकारार्थी जबाब आला.

डरबनला जाऊन मी स्वयंसेवकांसाठी मागणी केली. मानहानी होऊ नये आणि कामालाही सोयीचे पडावे अशासठी व तशी पद्धतही होती, म्हणून औषध खात्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने मला 'सार्जंट मेजर"चा तात्पुरता हुद्दा दिला आणि माझ्या पसंतीच्या आणखी तिघांना 'सार्जंट'चा व आणखी एकाला 'कॉर्पोरेल'चा, असे हुद्दे दिले. पोषाखही सरकारकडून मिळाले. या तुकडीने सहा आठवडेपर्यंत सतत काम केले असे म्हणता येईल. झुलू जखमी लोकांची शुश्रुषा करण्याचेच काम आमच्या वाट्याला आले. अंमलदार डॉक्टरने आम्ही आलो, याबद्दल आनंद प्रदर्शित केला. तो म्हणाला, “गोरे लोक कोणी या जखमी लोकांची शुश्रुषा करायला तयार होत नाहीत. मी एकटा किती लोकांकडे लक्ष देणार ? त्यांच्या जखमा सडून जात आहेत. आता तुम्ही आलात, ही या निर्दोष लोकांवर ईश्वराचीच कृपा झाली, असे मी तरी समजतो.”

# ३७. पत्नीची दृढता

एका डॉक्टर मित्राने कस्तुरबाईला शस्त्रक्रिया करून घेण्याची शिफारस केली होती. थोडे आढेवेढे घेतल्यानंतर पत्नी शस्त्रक्रिया करून घेण्यास कबूल झाली. शरीर तर अतिशय क्षीण होऊन गेले होते. डॉक्टरने क्लोरोफॉर्म न देताच शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेच्या वेळी वेदना तर खूप होत होत्या. पण ज्या सोशिकपणाने कस्तुरबाईने ते सर्व सहन केले, ते पाहून मी तर आश्चर्यचकीत झालो. शस्त्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडली. डॉक्टर व त्यांची पत्नी यांनी कस्तुरबाईची उत्तम बडदास्त ठेवली होती. ही गोष्ट डरबनमध्ये घडली होती. दोन-तीन दिवसांनंतर डॉक्टरांनी मला निश्चिंतपणे जोहान्सबर्गला जाण्याची परवानगी दिली.

थोड्याच दिवसांनी बातमी आली की, कस्तुरबाईचे प्रकृती बिलकुल सुधारत नाही व तिला अंथरुणातून उठताही येत नाही. एकदा तर ती बेशुद्धही झाली होती. डॉक्टरांना माहीत होते, की मला विचारल्याशिवाय कस्तुरबाईला दारू किंवा मांस औषधासाठी किंवा अन्न म्हणून देता कामा नये. तिला मांसाचे सार देण्याबद्दल माझी परवानगी मिळविण्यासाठी डॉक्टरांनी मला जोहान्सबर्गला टेलिफोन केला. मी उत्तर दिले, “मी तशी परवानगी देऊ शकत नाही. पण कस्तुरबाई स्वतंत्र आहे. विचारण्यासारखी स्थिती असेल, तर विचारा व तिची इच्छा असेल, तर बेलाशक द्या.” “पण,” डॉक्टर म्हणाले, “रोग्याला असल्या गोष्टी विचारणे मला पसंत नाही. तुम्ही समक्ष इकडे येणे आवश्यक आहे. मी ठरवीन ते खाऊ घालण्याची मला परवानगी नसेल, तर तुमच्या पत्नीच्या जिवाबद्दल मी जबाबदार नाही.”

मी त्याच दिवशी डरबनची गाडी पकडली. डरबनला पोचलो. डॉक्टरांनी समाचार ऐकविला, “मी तर सार देऊन नंतरच तुम्हाला टेलिफोन केला होता !”

“डॉक्टर, मी तर ही फसवेगिरी समजतो,” मी म्हटले.

“औषधोपचार करताना फसवेगिरी वगैरे काही मला समजत नाही. आम्ही डॉक्टर लोक अशा प्रसंगी रोग्यांना किंवा त्यांच्या आप्तेष्टांना फसविण्यामध्येच पुण्य समजतो. वाटेल त्या मार्गाने, पण रोग्यांना वाचविणे हा आमचा धर्म आहे,” डॉक्टरांनी दृढपणे जबाब दिला.

मला फार दु:ख झाले. मी गप्प राहिलो. डॉक्टर माझे स्नेहीच होते. स्वभावाचे भले होते. त्यांचे व त्यांच्या पत्नीचे माझ्यावर उपकार होते. पण असले वर्तन सहन करण्याची माझी तयारी नव्हती.

"डॉक्टर, अजून काय ते स्पष्ट सांगा. काय करायचे म्हणता ? माझ्या पत्नीला मी तिच्या संमतीखेरीज मांस खाऊ घालू देणार नाही. मांस न खाल्ल्यामुळे तिचा मृत्यू होणार असेल, तर तो सहन करण्याची माझी तयारी आहे."

डॉक्टर म्हणाले, "तुमचा वेदांत माझ्या घरी तरी चालणार नाही. मी साफ सांगतो की, आपल्या पत्नीला माझ्या घरी ठेवणार असाल, तोपर्यंत मी तिला जरूरीप्रमाणे मांस किंवा जे जे काही खाऊ घालणे योग्य असेल, ते ते खाऊ घालीन. तसे नको असेल, तर तुम्ही आपल्या पत्नीला घेऊन जा. मी आपणहून तिला आपल्या घरात मरू देणार नाही."

मला अंधुक स्मरते की, माझ्या मुलांपैकीही एकजण त्यावेळी माझ्याबरोबर होता. मी त्याचेही मत घेतले. त्याने सांगितले, "तुम्ही म्हणता ते मला कबूल आहे. आईला मांस खाऊ घालता कामा नये." नंतर मी कस्तुरबाईपाशी गेलो. ती फार अशक्त झाली होती. तिला काहीही विचारणे माझ्या जिवावर आले. कर्तव्य म्हणून मी तिला वरील हकीकत थोडक्यात सांगितली. तिने दृढतापूर्वक उत्तर दिले, "मला मांसाचा सुरवा घ्यायचा नाही. मनुष्यदेह वारंवार मिळत नसतो. तुमच्या मांडीवर डोके टेकून मेल्ये तरी बेहेत्तर; पण माझ्याने हा देह बाटविला जाणार नाही."

मला समजावून सांगता आले, तेवढे मी सांगितले आणि म्हटले, "तू माझ्याच विचाराप्रमाणे वागायला बांधलेली नाहीस." आमच्या माहितीतील कित्येक हिंदू मांस व मद्य घेत असत, तेही सांगितले. परंतु तिचा निर्धार ढळेना. शेवटी ती म्हणाली, "मला येथून घेऊन चला."

आम्ही तेथून निघण्याचा निश्चय केला. पाऊस झिमझिम पडत होता. स्टेशन दूर होते. डरबन ते फिनिक्स आगगाडी व फिनिक्स स्टेशनच्या पुढे सुमारे अडीच मैल पायी जावयाचे होते. धोका तर भरपूर होता. पण ईश्वर साहाय्य करणारा आहे, अशी मी मनाची समजूत केली. मी एक मनुष्य अगोदर फिनिक्सला पाठविला. फिनिक्समध्ये आमच्यापाशी हॅमक होते. हॅमक म्हणजे

जाळीदार कापडाची झोळी किंवा पाळणा. त्याची टोके बांबूला बांधली म्हणजे रोग्याला त्याच्यामध्ये सुखाने झुलत राहता येते. वेस्टना निरोप पाठविला होता, की हॅमक, एक बाटली गरम दुधाची, एक बाटली गरम पाण्याची आणि सहा माणसे एवढे घेऊन त्यांनी स्टेशनवर यावे.

दुसरी आगगाडी निघण्याची वेळ झाली, तेव्हा मी रिक्षा मागविली आणि त्या भयंकर स्थितीतच पत्नीला तिच्यामध्ये बसवून मी स्टेशनचा रस्ता धरला.

पत्नीला धीर देण्याची गरजच नव्हती, उलट तीच मला धीर देऊन म्हणाली, “मला काही व्हायचे नाही. तुम्ही काही काळजी करू नका.”

हाडांच्या त्या सापळ्याचे वजन विशेष नव्हतेच. अन्न जात नसे. गाडीच्या डब्यापर्यंत पोहोचण्यासाठी स्टेशनच्या विशाल प्लॅटफॉर्म-वरून दूरपर्यंत चालत जायचे होते. तेथे रिक्षा जाण्यासारखी नव्हती. मी तिला उचलून घेऊन डब्यापर्यंत घेऊन गेलो. फिनिक्स स्टेशनवर ती झोळी आलीच होती. त्यातून आम्ही दुखणाइताला विशेष त्रासाशिवाय उचलून नेले. तेथे केवळ पाण्याच्या उपचारांनी शरीर हळूहळू सुधारत गेले.

# ३८. घरात सत्याग्रह

मागच्या शस्त्रक्रियेनंतर कस्तुरबाईचा रक्तस्त्राव काही काळ बंद झाला खरा, पण तो परत उलटला व काही केल्या बंद होईना. पत्नीला माझ्या उपचारांबद्दल विशेष आस्था वाटत होती असे नाही, पण त्यांच्याबद्दल तिरस्कारही वाटत नव्हता. दुसरी औषधे पाहिजेत असा तिचा आग्रह नव्हता. म्हणून जेव्हा माझे इतर उपचार व्यर्थ गेले, तेव्हा मी तिची मीठ व कडधान्य सोडण्याबद्दल विनवणी केली. पुष्कळ समजूत घालून पाहिली; माझ्या सांगण्याच्या पुष्ट्यर्थ काही मजकूर वाचून दाखविला. पण ती ऐकेना. शेवटी तिने सांगितले,"कडधान्य आणि मीठ सोडायला तुम्हाला कोणी सांगितले तर तुम्हीसुद्धा सोडणार नाही." मला वाईट वाटले आणि हर्षही झाला. माझे सगळे प्रेम दर्शविण्याची मला संधी मिळाली. त्या हर्षाच्या भरात मी लगेच म्हटले, "तुझी समजूत चुकीची आहे. मला दुखणे आले आणि वैद्याने हीच काय, पण दुसरी कोणतीही वस्तू सोडायला सांगितली, तर अवश्य सोडून देईन. पण ते राहू द्या. मी कडधान्य व मीठ एक वर्षापुरते सोडले. तू सोड किंवा सोडू नकोस, त्याचा माझ्या निर्णयाशी संबंध नाही."

पत्नीला अतिशय पश्चात्ताप झाला. ती वरमून बोलली, "मला क्षमा करा. तुमचा स्वभाव माहीत असूनही बोलण्याच्या भरात मी बोलून गेले. आता मी तर मीठ, कडधान्य खाणार नाहीच, पण तुम्ही आपला शब्द परत घ्या. ही मला फार मोठी शिक्षाच केलीत असे म्हटले पाहिजे."

मी म्हटले, "तू मीठ, कडधान्य सोडशील तर फारच चांगले. मला खात्री आहे की त्यापासून तुला फायदाच होईल; पण केलेली प्रतिज्ञा मला बदलता येणार नाही. माझा झाला तरी फायदाच होणार आहे. कोणत्याही निमित्ताने माणसाने संयम पाळला तर त्यापासून त्याला लाभच आहे. तेव्हा तू मला आग्रह करू नकोस. शिवाय माझी परीक्षा होईल आणि त्या दोन वस्तू सोडण्याचा तू जो निश्चय केला आहेस, त्या तुझ्या निश्चयाला चिकटून राहण्याच्या कामी तुलाही मदत मिळेल."

एवढे सांगितल्यानंतर माझी आणखी समजूत घालण्याचा प्रश्न राहिला नाही. "तुम्ही म्हणजे पक्के हट्टी. कोणी सांगितलेले काही ऐकायचेच नाही," असे म्हणून थोडे अश्रू ढाळत ती

शांत राहिली. याला मी सत्याग्रह या नावाने संबोधू इच्छितो. माझ्या जीवनातील मधुर स्मरणांपैकी हे एक आहे, अशी माझी समजूत आहे. यानंतर कस्तुरबाईची तब्येत खूप सुधारली.

# ३९. सत्याग्रहाचा जन्म

झुलू बंडाची इंग्रजी नोकरी पूर्ण करून मी मित्रांना भेटायला फिनिक्समध्ये आलो. सर्वांना भेटून जोहान्सबर्गला पोहोचलो. तेथे २२ ऑगस्ट १९०६ रोजी ट्रान्सवाल सरकारच्या गॅझेटमध्ये कायदे-मंडळात समाविष्ट होणाऱ्या बिलाचा मसुदा वाचला. जसजशी बिलाची कलमे मी वाचीत गेलो, तसतसा माझ्या अंगाला कंप सुटला. जर हे बिल पास झाले आणि हिंदी लोकांनी मान्य केले, तर दक्षिण आफ्रिकेतून हिंदी जमातींची मुळेच उखडली जातील असे मला वाटले. या बिलानुसार, ट्रान्सवालात राहण्याचा हक्क बाळगणाऱ्या प्रत्येक हिंदी स्त्री-पुरूषाने आणि आठ वर्षे किंवा त्यावरील वयाच्या मुला-मुलीने एशियाटिक कचेरीत आपली नावे नोंदवून परवाने मिळविले पाहिजेत. हे परवाने घेताना जुने परवाने सरकारी अधिकाऱ्याकडे देऊन टाकले पाहिजेत. नोंद करण्याकरिता करावयाच्या अर्जात आपले नाव, गाव, जात, वय वगैरे दिले पाहिजे. नोंद करणाऱ्या अधिकाऱ्याने अर्जदाराच्या शरीरा-वरील मुख्य खुणा टिपून घ्याव्यात. अर्जदाराच्या सगळ्या बोटांचे आणि अंगठ्यांचे ठसे घ्यावेत. ठरवून दिलेल्या मुदतीच्या आत जे हिंदी स्त्री-पुरूष याप्रमाणे अर्ज करणार नाहीत, त्यांचा ट्रान्मवालात राहण्याचा हक्क रद्द होईल. अर्ज न करणे हा कायदेशीर गुन्हा गणला जाईल. त्या गुन्ह्याकरिता तुरुंगाची शिक्षा मिळू शकेल, दंड होऊ शकेल किंवा कोर्टाच्या मर्जी-प्रमाणे हद्दपारीसुद्धा होऊ शकेल. जे परवाने अर्जदाराला देण्यात येतील ते कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यापुढे जेव्हा आणि जेथे मागण्यात येतील तेव्हा आणि तेथेच हजर केले पाहिजेत. सार्वजनिक रस्त्याने जाणाऱ्या कोणाही माणसाकडे या परवान्याची मागणी केली जाईल. परवाने तपासण्यासाठी सरकारी अधिकारी घरातसुद्धा प्रवेश करू शकतील. अशा प्रकारचा कायदा दुनियेच्या कोणत्याही भागात स्वतंत्र माणसांच्या बाबतीत असलेला माझ्या तरी माहितीत नाही.

दुसऱ्या दिवशी पुढारी हिंदी मंडळींना गोळा करून मी त्यांना हा कायदा अक्षर न् अक्षर समजावून दिला. त्या बिलाचा परिणाम जसा माझ्यावर झाला, तसाच त्यांच्यावरही झाला. या बिलाचे गांभीर्य सर्वांच्या लक्षात आले आणि सर्वांनी ठराव केला की, एक जाहीर सभा भरवावी.

११ सप्टेंबर १९०६ रोजी सभा भरली. सभेत जे ठराव मांडले गेले, त्यात एक चौथाच ठराव महत्त्वाचा होता. त्याचा सारांश असा होता की, या बिलाच्या विरुद्ध सर्व उपाय आजमावूनसुद्धा जर ते पास झाले, तर हिंदी लोकांनी त्याला शरण जायचे नाही आणि शरण न गेल्यामुळे जी जी दु:खे येतील, ती सर्व सहन करायची.

या चळवळीला काय नाव देता येईल हे आम्हा कोणाला कळत नव्हते. मगनलाल गांधींनी ‘सदाग्रह' हे नाव सुचविले. कारण हा आग्रह ‘सद् म्हणजे शुभ' आहे. मला ते नाव पसंत पडले, तरी त्या नावात ज्याचा अंतर्भाव व्हावा असे मला वाटत होते, ते येत नव्हते. म्हणून मी 'दू'चा 'त्' करून त्याला 'य' जोडला व 'सत्याग्रह' नाव बनविले. सत्यामध्ये शांतीचा समावेश होतो, असे मानून कोणत्याही वस्तूचा आग्रह धरल्याने त्यातून बळ उत्पन्न होते म्हणून आग्रहात बळाचा अंतर्भाव केला व हिंदी चळवळीला 'सत्याग्रह' म्हणजेच सत्य आणि शांती यांमधून निपजणाऱ्या बळाचे नाव देऊन ते प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आणि तेव्हापासून लढ्याचा उल्लेख करताना ‘पॅसिव्ह रेझिस्टन्स' हा शब्दप्रयोग बंद केला.

# ४०. कैद

एशियाटिक ऑफिसच्या अंमलदारांनी विचार केला की, जोपर्यंत विशिष्ट पुढाऱ्यांना आपण पकडत नाही, तोपर्यंत लढ्याचा जोर कमी होणारच नाही. त्यामुळे त्यांनी आमच्यापैकी काही जणांना अटक केली.

आमच्या अटकेनंतर सत्याग्रही जेल भरू लागले. त्यांनी आपणहून पकडून घेतले होते.

याप्रमाणे तुरुंगात एक पंधरवडा गेला असेल तेवढ्यात नवे येणारे बातम्या आणू लागले की, सरकारशी समेट करण्याची काही मसलत चालली आहे. या खर्ड्याचे तात्पर्य असे होते, की हिंदी प्रजेपैकी बहुतांश लोक स्वखुषीने परवाने घेतील, तर सरकार खुनी कायदा रद्द करील.

जनरल स्मट्सना भेटण्यासाठी मला प्रिटोरियाला नेण्यात आले. चर्चेनंतर मी सुचविलेल्या बदलांसह समेटाचा मसुदा त्यांनी स्वीकारला. कैद्यांना सोडून देण्यात आले. मी देशवासियांना समेटाच्या अटी समजावून सांगितल्या.

# ४१. आघात

दहा बोटांचे ठसे देण्याला मी संमती दर्शविल्या-बद्दल कितीतरी पठाण माझ्यावर रागावले होते. पहिल्या दिवशी पुढाऱ्यांनीच सर्वांच्या अगोदर परवाने काढून घ्यावेत असेही ठरले होते. माझे ऑफिस हेच सत्याग्रहाचे ऑफिस होते. तेथे मी पोहोचलो तो ऑफिसच्या भिंतीच्या बाहेरच्या बाजूला मीर आलमला आणि त्याच्या इतर सोबत्यांना पाहिले. मीर आलम माझा जुना अशील होता. आपल्या सर्व कामांत तो माझा सल्ला घेत असे. तो सहा फुटांपेक्षा जास्त उंच होता, भरदार अंगाचा आणि मजबूत हाडापेराचा होता. आज पहिल्याप्रथम मी मीर आलमला ऑफिसच्या आत बसण्याऐवजी बाहेर उभा राहिलेला पाहिला. आमची नजरानजर झाली तरी आज प्रथमच त्याने मला सलाम केला नाही. पण मी सलाम करताच त्याने उलट सलाम केला. पण आज त्याचा चेहरा नेहमीप्रमाणे आनंदी नव्हता. त्याच्या डोळ्यांत क्रोध असल्याचे मला दिसले. माझ्या मनात मी त्याची नोंद घेतली. काहीतरी होणार असाही अंदाज केला. मी ऑफिसात शिरलो. अध्यक्ष इसापमियाँ आणि इतर मित्रमंडळी आली आणि आम्ही एशियाटिक ऑफिसकडे रवाना झालो. सोबत मीर आलम आणि त्याचे सोबतीही होते.

एशियाटिक ऑफिस तीन मिनिटांच्या अंतरावर राहिले असेल, तेवढ्यात मीर आलम माझ्याजवळ आला. त्याने मला विचारले, “कहाँ जाते हो ?”

मी उत्तर दिले, “मैं दस उंगलियाँ देकर रजिस्टर निकलवाना चाहता हूँ; अगर तुम भी चलोगे तो तुम्हारी उंगलियाँ देने की जरूरत नहीं है. तुम्हारा रजिस्टर निकलवाके मैं उंगलियाँ देकर मेरा निकलवाऊंगा.”

इतके मी बोलतो आहे, तोच माझ्या डोक्यावर एक काठीचा तडाखा बसला. 'हे राम' म्हणत मी बेशुद्ध होऊन पालथा पडलो. नंतर काय झाले त्याचे मला काही भान नव्हते. पण मीर आलमने आणि त्याच्या साथीदारांनी आणखी तडाखे लगावले आणि लाथाही मारल्या. त्यातले काही तडाखे इसापमियांनी व थंबी नायडूंनी आपल्या अंगावर घेतले. त्यामुळे इसापमियांनासुद्धा थोडा मार लागला तसा थंबी नायडूंनाही लागला. एवढ्यात आरडाओडा झाला, येणारे- जाणारे

गोरे जमा झाले. मीर आलम आणि त्याचे सोबती पळाले, पण त्यांना गोऱ्यांनी धरले. दरम्यान पोलीसही येऊन ठेपले. त्यांना पोलिसांच्या हवाली करण्यात आले. जवळच मि. जे. सी. गिब्सन यांचे ऑफिस होते. तेथे मला उचलून नेले. थोड्या वेळाने मला शुद्ध आली, तेव्हा माझ्या तोंडावर वाकलेल्या रेवरंड डोकना मी पाहिले. त्यांनी मला विचारले, "कसे काय वाटते तुला ?"

मी हसून म्हटले, "बरे आहे, पण माझे दात आणि बरगड्या दुखत आहेत." मी विचारले, "मीर आलम कुठे आहे ?"

त्यांनी सांगितले, "त्याला पकडले आहे आणि त्याच्याबरोबरच्या इतरांनाही."

मी म्हटले, "ते सुटले पाहिजेत."

डोक म्हणाले, "ते सारे होईल. इथे तू एका परक्याच्या ऑफिसात पडलेला आहेस. तुझा ओठ फाटला आहे. पोलीस तुला इस्पितळात घेऊन जायला तयार आहेत, पण माझ्या घरी आलास तर मिसेस डोक आणि मी तुझी शक्य तितकी शुश्रुषा करू."

मी म्हटले, "मला तुमच्याकडे घेऊन चला. पोलिसांच्या निरोपाबद्दल त्यांना माझे आभार कळवा. पण तुमच्या इथे येणे मला अधिक पसंत आहे, हे त्यांना कळवा."

एवढ्यात एशियाटिक ऑफिसर मि. चमनीही येऊन दाखल झाले. एका गाडीतून मला त्या सज्जन पाद्र्याच्या घरी घेऊन गेले. त्यांचे घर स्मिट स्ट्रीटवर होते. डॉक्टरला बोलावले होते. दरम्यान मी एशियाटिक अंमलदार मि. चमनी यांना म्हटले, "तुमच्या ऑफिसात येऊन बोटांचे ठसे देऊन पहिला परवाना आपण काढावा, अशी माझी इच्छा होती. ती ईश्वराला मान्य नसावी. पण आता माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्ही आताच सगळे कागद घेऊन यावे आणि मला रजिस्टर करून घ्यावे. माझ्या अगोदर दुसऱ्याची नोंद करू नये, अशी माझी इच्छा आहे."

ते म्हणाले, "त्याची काय घाई आहे ? आता डॉक्टर येतील. तुम्ही आराम करा. मागाहून सर्व काही होईल. दुसऱ्यांना परवाने दिले तरी तुमचे नाव पहिले घालीन."

मी म्हटले, "तसे नाही; माझी प्रतिज्ञा आहे की, मी जिवंत असेन तर आणि ईश्वराला मान्य असेल तर सर्वांअगोदर मीच परवाना काढीन. म्हणूनच माझा आग्रह आहे की, तुम्ही कागद घेऊन या."

मग ते गेले.

माझे दुसरे काम म्हणजे ॲटर्नी जनरलला म्हणजे सरकारी वकिलांना तार करायची की, "मीर आलम आणि त्याचे सोबती यांनी माझ्यावर जो हल्ला केला त्याबद्दल मी त्यांना अपराधी मुळीच मानीत नाही. वाटेल ते झाले तरी त्यांच्यावर फौजदारी चालावी अशी माझी इच्छा नाही. माझ्याखातर तुम्ही त्यांना सोडून द्यावे अशी माझी इच्छा आहे". पण जोहान्सबर्गच्या गोऱ्या लोकांनी ॲटर्नी जनरलला पुढीलप्रमाणे कडक पत्र लिहिले, "गुन्हेगारांना शिक्षा करण्याविषयी गांधीचे विचार वाटेल ते असतील. ते या देशात चालणार नाहीत. त्याला जो मार मिळाला आहे त्याबद्दल तो काही न करो, पण गुन्हेगारांनी कुठे घराच्या कोपऱ्यात मार दिलेला नाही, चांगला राजरोस रस्त्यावर गुन्हा घडला आहे. हा सार्वजनिक गुन्हा मानला पाहिजे. कित्येक इंग्रजसुद्धा गुन्ह्याचा पुरावा देऊ शकतील. गुन्हेगारांना पकडलेच पाहिजे." या हालचालीं-मुळे सरकारी वकिलाने मीर आलमला आणि त्याच्या साथीदाराला पुन्हा पकडले आणि त्यांना तीन-तीन महिन्यांची सक्त-मजुरीची शिक्षा मिळाली. मात्र मला साक्षीदार म्हणून बोलाविण्यात आले नाही.

जमातीला उद्देशून अध्यक्षांमारफत मी एक छोटेसे गुजराती पत्र लिहून प्रसिद्ध करायला पाठवून दिले. "माझी प्रकृती चांगली आहे. मिस्टर आणि मिसेस डोक अंग मोडून माझी सेवा करीत आहेत आणि मी थोड्यांच दिवसांत परत सेवेला हजर होईन.

ज्यांनी मला मार दिला, त्यांच्यावर माझा राग नाही. त्यांनी गैरसमजुतीने हे कर्म केले. त्यांनी त्यांच्या परीने बदला घेतला. त्यांच्यावर केस चालविण्याची गरज नाही."

मि. चमनी आले. यातना होत होत्या, तरी मी माझ्या बोटांचे ठसे दिले. त्यावेळी त्यांच्या डोळ्यात पाणी आलेलेही मला दिसले. त्यांच्याविरुद्ध मला कडक लेखही लिहावे लागले होते. पण संबंध आल्याने माणसाचे हृदय कसे कोमल बनू शकते याचे चित्र माझ्यापुढे उभे राहिले.

# ४२. सत्याग्रहाची पुनरावृत्ती

हिंदी लोकांनी स्वखुषीने परवाने काढून घेतले. आता सरकार खुनी कायदा रद्द करणार होते. पण खुनी कायदा रद्द करण्याचे बिल तयार करण्याऐवजी जनरल स्मट्स यांनी एक नवेच पाऊल उचलले. त्यांनी जे बिल प्रसिद्ध केले, त्यात खुनी कायदा कायमच केला आणि खुषीचे परवाने कायदेशीर मानले. पण या परवाने काढलेल्यांना खुनी कायदा लागू करता येणार नाही असे कलम त्यांनी त्या बिलामध्ये घालून ठेवले. याचा अर्थ असा झाला की नव्या येणाऱ्या किंवा नवे परवाने काढून घेणाऱ्या हिंदी लोकांनासुद्धा खुनी कायद्याच्या अंमलाखाली यावे लागणार. हे बिल वाचून मी तर दिङ्मूढच झालो.

सरकारला सत्याग्रहाचे ‘अल्टिमेटम' पाठविण्यात आले. त्याचा सारांश असा की, समेटाच्या शर्तीप्रमाणे जर एशियाटिक कायदा रद्द करण्यात आला नाही, तर आणि तसे करीत असल्याचा निर्णय जमातीला अमुक मुदतीपर्यंत कळविण्यात आला नाही, तर जमातीने गोळा केलेले परवाने जाळून टाकण्यात येतील आणि त्याकरिता ज्या आपत्ती जमातीवर येतील, त्या विनयाने आणि निश्चयाने जमात सहन करील.

परवाने जाळण्याची जाहीर क्रिया करण्याकरिता सभा बोलाविण्यात आली होती.

सभेला सुरुवात करण्याची वेळ आली. एवढ्यात एक स्वयंसेवक सायकलवरून येऊन पोचला. त्याच्या हातात तार होती. ही तार म्हणजे सरकारचे उत्तर होते. उत्तरात सरकारने जमातीच्या निर्णयाबद्दल दिलगिरी व्यक्त केली होती आणि सरकार आपला निर्णय बदलू शकणार नाही असेही कळविले होते. ती तार सभेपुढे वाचून दाखविण्यात आली. सभेने तिचे टाळ्यांनी स्वागत केले. जणू काय सरकारने निश्चयपत्रातील मागणी जर मान्य केली असती, तर परवान्यांची होळी करण्याचे शुभ कार्य करण्याची जमातीला मिळालेली संधी हातची गेली असती !

या सभेला मीर आलमही होता. त्याने मला मारण्यात आपली चूक झाली असे जाहीर केले आणि आपला अस्सल परवाना जाळण्याकरिता दिला ! त्याने स्वेच्छेने काढावयाचा परवाना तर

काढलाच नव्हता. मीर आलमच्या या कृत्यामुळे सभेच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मी मीर आलमचा हात पकडला आणि हर्षभराने तो दाबला. माझ्या मनात त्याच्याविषयी कधीच रोष नव्हता हे मी त्याला पुन्हा सांगितले.

कमिटीकडे जाळण्याकरिता २००० हून अधिक परवाने आले होते. त्यांचा गठ्ठा कढईत टाकून त्यावर रॉकेल ओतून मि. युसुफ मियांनी त्याला आग लावली. सारी सभा उठून उभी राहिली आणि परवाने जळत होते, तोवर लोकांनी टाळ्या वाजवून मैदान दणाणून सोडले. ज्या काही लोकांनी आपले परवाने आपल्यापाशी राखून ठेवले होते, त्यांनी त्यांचा मंचावर वर्षाव केला आणि तेही त्या कढईत पडले.

या सभेला इंग्रजी वृत्तपत्रांचे बातमीदार आले होते. त्यांच्यावरसुद्धा या साऱ्या दृश्याची फार मोठी छाप पडली आणि त्यांनी सभेचे हुबेहूब वर्णन आपापल्या पत्रांतून केले.

कायदेमंडळाच्या ज्या बैठकीत एशियाटिक कायदा (दुसरा) पास झाला, त्याच बैठकीत एक दुसरे बिलही जनरल स्मट्स यांनी मांडले. त्याचे नाव 'इमिग्रन्टस् रिस्ट्रिक्शन ॲक्ट' हे होते. म्हणजे अप्रत्यक्षपणे या कायद्याने एकही नवा हिंदी दक्षिण आफ्रिकेत दाखल होऊ शकणार नाही, अशी ती युक्ती होती.

हिंदी जमातीच्या अधिकाऱ्यांवर झालेल्या हल्ल्याला विरोध करणे हे जमातीच्या दृष्टीने आवश्यकच होते. त्यामुळे कित्येक सत्याग्रही ट्रान्सवालमध्ये जाणून बुजून दाखल झाले. त्यांना कैद करण्यात आले. मलाही दुसऱ्यांदा पकडले होते.

सन १९१२ च्या ऑक्टोबर महिन्यात गोखले दक्षिण आफ्रिकेला आले. सत्याग्रही आणि सरकारमध्ये तडजोड करणे हे त्यामागील प्रमुख कारण होते. त्यांना विश्वास होता की, जनरल बोथांनी दिलेल्या वचनानुसार ते 'काळा कायदा' मागे घेतील व तीन पौंडांचा कर रद्द करतील. पण जनरल बोथांनी वचनभंग केला.

वचनभंग झाल्याचे मी गोखल्यांना कळविले आणि लढा सुरू करण्याची तयारी केली.

आतापर्यंत परदेशात स्त्री वर्गाला तुरुंगात पाठविणे आम्हा सर्वांना अयोग्य वाटले. पण यावेळी असा एक खटला झाला, ज्यात न्यायाधीशाने निकाल दिला की, दक्षिण आफ्रिकेच्या कायद्यात ख्रिस्ती धर्माप्रमाणे नोंदविलेली गेलेली लग्ने सोडून इतर लग्नांना सरकारी मान्यता नाही. म्हणजेच हिंदु, मुसलमान, पारसी, इ. धर्मविधीप्रमाणे झालेली लग्ने वरील भयंकर निर्णयाने दक्षिण आफ्रिकेत रद्द ठरली आणि म्हणून त्या कायद्यान्वये दक्षिण आफ्रिकेत ज्यांची लग्ने झाली अशा हिंदी स्त्रियांचा दर्जा धर्मपत्नी म्हणून नाहीसा झाला आणि त्या स्त्रियांपासून झालेल्या संततीच्या वारसाचा हक्कही गेला. ही स्थिती स्त्रियांना सहन होणे शक्य नव्हते, तसेच पुरुषांनाही सहन होणे शक्य नव्हते.

स्त्रियांचा अपमान झाल्यानंतर धीर कसा काय राहणार ? स्त्रिया थोड्या असोत किंवा जास्त, जेवढ्या मिळतील तेवढ्यांनी निकराचा सत्याग्रह सुरू करण्याचे ठरविले. आता स्त्रियांना लढ्यात भाग घ्यायला प्रतिबंध करणे शक्य नव्हते; एवढेच नव्हे, पण स्त्रियांना लढ्यात दाखल होण्याकरिता आवाहन करण्याचे आम्ही ठरविले.

स्त्रियांच्या या त्यागाचा मजुरांवर अद्‌भुत प्रभाव पडला. न्यूकॅसल जवळच्या खाणींतील मजुरांनी आपली अवजारे खाली ठेवली. शहराकडे त्यांची रीघ सुरू झाली. मला ते कळताच मी फिनिक्स सोडले आणि न्यूकॅसल येथे जाऊन पोचलो.

मजूर काही पाच पंचवीस नव्हते, शेकडो होते; त्यांचे हजार व्हायलाही वेळ लागायचा नाही. त्यांच्यासाठी घरे कोठून आणू ? खायचे कोठून आणू ? माणसांची गर्दी झाली. इतक्या संख्येने आलेल्या आणि निरंतर वाढत जाणाऱ्या मजुरांना एकाच ठिकाणी आणि कामधंद्यावाचून सांभाळणे अशक्यच नव्हे-भयानक काम होते. मला उपाय सुचला. या तुकडीला ट्रान्सवालात घेऊन जावे आणि जसे ते सोळा पकडले गेले, तसे यांनाही तुरुंगात नेऊन बसवावे. माझ्या येथे जवळजवळ पाच हजार माणसे गोळा झाली असतील.

# ४३. सत्याग्रहाचा विजय

हजारो निरपराध माणसांना तुरुंगात ठेवण्याची शक्ती दक्षिण आफ्रिकेच्या सरकार-पाशी नव्हती. व्हॉइसरॉयलाही ते सहन होण्यासारखे नव्हते. सगळे जग जनरल स्मट्स काय करतात, याकडे नजर लावून बसले होते. अशा वेळी सर्वच सरकारे जे करतात, ते दक्षिण आफ्रिकेच्या सरकारने केले. अशा बिकट अवस्थेतून बाहेर पडायचे म्हणजे लोकमताला भिऊन चालणारी सरकारे नेहमी कमिशन नेमतात. त्याकरवी फक्त नाममात्र चौकशी करण्यात येते, कारण अशा कमिशनचा निकाल पहिल्यापासूनच माहित झालेला असतो आणि कमिशनने शिफारस केली म्हणजे तिचा अंमल झालाच पाहिजे अशी सामान्य प्रथा असते; म्हणजेच कमिशनच्या शिफारशीचा आधार घेऊन, जो न्याय करण्याचे सरकारने पूर्वी नाकारलेले असते, तोच न्याय ती नंतर करतात. जनरल स्मट्सच्या कमिशनमध्ये तीन सभासद नेमले गेले.

कमिशनच्या कार्याबद्दल जनरल स्मट्सचा आणि माझा पत्रव्यवहार चालू झाला. जमातीला ज्या ज्या गोष्टी पाहिजे होत्या, त्या सर्व देण्याची शिफारस कमिशनने केली. थोड्याच दिवसात ज्या कायद्याने हिंदी लोकांचा फायदा व्हावयाचा होता, त्याचा मसुदा युनियन गॅझेटात प्रसिद्ध झाला. त्यानुसार तीन पौंडांचा कर रद्द केला गेला. जो विवाह हिंदुस्थानात कायदेशीर मानला जाईल, तो दक्षिण आफ्रिकेतसुद्धा कायदेशीर मानला जाईल, असे ठरले. दक्षिण आफ्रिकेत राहण्याकरिता जी अधिकारपत्रे हिंदी लोकांना मिळाली होती, ती युनियनमध्ये प्रवेश करण्याचा हक्क असल्याचा पुरावा म्हणून मान्य करण्यात आली.

अशा रीतीने आठ वर्षांनंतर शेवटी हा सत्याग्रहाचा महान लढा संपला आणि दक्षिण आफ्रिकाभर वसलेल्या हिंदी लोकांना स्वस्थता लाभली असे वाटते. १८ जुलै, १९१४ रोजी हिंदुस्थानला जाण्याकरिता मी निघालो. ज्या दक्षिण आफ्रिकेत मी एकवीस वर्षं काढली आणि असंख्य कडू-गोड अनुभव घेतले, ते सोडून जाताना मला अवघड वाटले आणि दुःख झाले.

# खंड ९: स्वदेशी परत आणि आश्रमाची स्थापना

## ४४. पुण्यामध्ये

बऱ्याच वर्षांच्या विदेशवारीनंतर स्वदेशी परतताना मला फार आनंद झाला होता.

गोखले व सर्व्हंट्स ऑफ इंडिया सोसायटीचे सभासद यांनी मला प्रेमजलाने न्हाऊ घातले. मला आठवते की, त्यांनी सर्व सभासदांना पुण्यास बोलाविले होते. सर्वांबरोबर अनेक मुद्यांवर मी मनमोकळेपणाने चर्चा केली.

माझ्या मनातून एक आश्रम काढून त्यात फिनिक्समधील सहवासी मंडळींना घेऊन शक्यतो गुजरातमध्ये राहावयाचे होते. मी गुजराथी असल्यामुळे गुजराथची सेवा करून त्याद्वारे देशाची सेवा करण्यासाठी मी अधिक सक्षम आहे, असे मला वाटत होते. गोखल्यांना हा विचार पसंत पडला व ते म्हणाले, “तुम्ही अवश्य तसे करा. सभासदांच्याबरोबर चर्चेचा निकाल कसाही लागो, पण तुम्हाला आश्रमासाठी लागणारे द्रव्य तुम्ही माझ्याकडूनच घ्यायचे आहे. मी तो माझाच आश्रम समजणार.”

माझे हृदय फुलून गेले. पैसे गोळा करण्याच्या कामातून बरी मोकळीक मिळाली, असे म्हणून मी फार आनंदीत झालो आणि यापुढे मला स्वत:च्या जबाबदारीवर चालावे लागणार नाही, तर प्रत्येक अडचणीमध्ये मला मार्गदर्शक मिळणार या विश्वासामुळे माझ्या डोक्यावरील मोठा भार खाली उतरला, असे मला वाटले.

# ४५. आश्रमाची स्थापना

सत्याग्रह आश्रमाची स्थापना २५ मे १९१५ रोजी अहमदाबादमधील कोचरब येथे झाली.

सुमारे पंचवीस स्त्री-पुरुषांनिशी आश्रमाची सुरुवात झाली. सर्वजण एकत्र जेवीत असत व एकाच कुटुंबातील माणसे असावीत अशा तऱ्हेने वागण्याचा प्रयत्न करीत.

आश्रम अस्तित्वात येऊन थोडे महिनेही लोटले नसतील, इतक्यात मी कल्पना केली नव्हती, अशा तऱ्हेने आमची कसोटी झाली. भाई अमृतलाल ठक्कर यांच्याकडून एक पत्र आले: "एक गरीब व प्रामाणिक अंत्यज कुटुंब आहे. त्याची इच्छा तुमच्या आश्रमात येऊन राहण्याची आहे. त्याला घ्याल का ?"

ते आश्रमाचे नियम पाळण्यास तयार असले, तर त्याला दाखल करण्याची तयारी मी भाई अमृतलाल ठक्कर यांस कळविली. सहायक मित्रमंडळामध्ये खळबळ उडाली. ज्या विहीरीमध्ये बंगल्याच्या मालकाचा भाग होता, त्या विहिरीतून पाणी काढण्यास अडचण पडू लागली. मोटवाल्याच्या अंगावर आमच्या पाण्याचे शिंतोडे उडाले, तरी तेवढ्याने त्याला विटाळ होणार ! त्याने शिवीगाळ सुरू केला. त्याच्या शिव्यांना प्रत्युत्तर देऊ नये व दृढतापूर्वक पूर्वीप्रमाणेच पाणी भरीत जावे असे मी सर्वांस सांगितले. आम्ही शिव्या गुपचूप ऐकून घेतो असे पाहून मोटवाला शरमला व त्रास देईनासा झाला.

पण पैशाची मदत बंद झाली. बहिष्काराच्या अफवा माझ्या कानावर येऊ लागल्या. मी सोबत्यांबरोबर विचार करून ठेवलाच होता की, आपल्यावर बहिष्कार आला आणि आपल्यापाशी कसलीच मदत राहिली नाही, तरीही यापुढे आता आपल्याला अहमदाबाद सोडून चालणार नाही. अंत्यजवाड्यात जाऊन त्यांच्याबरोबर राहू व जे काही मिळेल तेवढ्यावर किंवा मजुरी करून निर्वाह करू.

अखेरीला एके दिवशी मगनलालनी मला नोटीस दिली: "येत्या महिन्याला आश्रमखर्च चालविण्यास आपल्यापाशी पैसे शिल्लक नाहीत."

मी शांतपणे उत्तर दिले,"तर मग आपण अंत्यजवाड्यात राहायला जाऊ."

अशा तऱ्हेच्या अडचणीचा प्रसंग माझ्यावर हा पहिलाच होता असे नाही. प्रत्येक प्रसंगी अखेरच्या घडीला भगवंताने मदत धाडलेली आहे. मगनलालनी नोटीस दिल्यानंतर लवकरच एके दिवशी सकाळी एका मुलाने बातमी आणली, "बाहेर एक मोटार उभी आहे व एक शेठ तुम्हाला बोलावीत आहेत." मी मोटारीपाशी गेलो.

शेठनी मला विचारले, "आश्रमाला काही मदत देण्याची माझी इच्छा आहे; तुम्ही घ्याल का ?"

मी उत्तर दिले, "तुम्ही द्याल तर मी अवश्य घेईन. मला कबूल केले पाहिजे की, सध्या मी अडचणीतही आहे."

"मी उद्या सकाळी याच वेळी येईन. तेव्हा तुम्ही आश्रमात असाल ?" मी होय म्हटले व शेठजी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळी मोटारीचे शिंग वाजले. मुलांनी मला येऊन सांगितले. शेठ आत आले नाहीत. मी त्यांना भेटायला गेलो. ते माझ्या हातात १३,००० रुपयांच्या नोटा ठेवून निघून गेले.

या मदतीची मी कधीच आशा केली नव्हती. मदत देण्याची ही रीत नवीनच दिसली. त्यांनी यापूर्वी कधीही आश्रमात पाऊल टाकले नव्हते. त्यांना पूर्वी एकवारच भेटल्याचे मला स्मरते. आश्रमात यायचेही नाही, विचारपूस नाही, काही नाही; बाहेरच्या बाहेर पैसे देऊन निघून जायचे. माझा हा पहिलाच अनुभव. या मदतीमुळे अंत्यजवाड्यात जावयाचे तहकूब केले. सुमारे एक वर्षाचा खर्च मला मिळून चुकला होता.

# खंड १०: चंपारण्य

## ४६. निळीचा डाग

बिहारमधील चंपारण्यातील शेतकऱ्यांनी आपापल्या जमिनीच्या तीनविसांश भागामध्ये जमिनीच्या मूळ मालकासाठी निळीचीच लागवड केली पाहिजे असे कायद्याचे बंधन होते. वीस कठांचा एक एकर होतो व एकरी तीन कठांची लागवड करणे, याला ‘तीनकठिया'ची पद्धत असे म्हणतात.

राजकुमार शुक्ल नावाचे चंपारण्यातील एक शेतकरी होते. त्यांनाही हे दु:ख सहन करावे लागले होते. चंपारण्यातील शेतकऱ्यांची दु:खे मला समक्ष दाखविण्याची त्यांची इच्छा होती.

१९१७ सालच्या आरंभी कलकत्याहून आम्ही दोघेजण चंपारण्यासाठी रवाना झालो. मला शेतकऱ्यांच्या स्थितीची चौकशी करावयाची होती. निळीच्या मळेवाल्यांविरुद्ध ज्या तक्रारी होत्या, त्यामध्ये कितपत तथ्य आहे तेही पाहावयाचे होते. या कामानिमित्त हजारो शेतकऱ्यांना भेटावे लागणार होते. परंतु अशा तऱ्हेने त्यांच्याशी संबंध येण्यापूर्वी निळीच्या मालकांची बाजू ऐकून घेणे व कमिशनरांना भेटणे मला आवश्यक वाटले. दोघांनाही पत्रे लिहिली.

मळेवाल्यांच्या मंडळाच्या चिटणीसांची भेट झाली, तेव्हा त्यांनी साफ सांगून टाकले की, तुम्हाला तर परकीय म्हणता येईल. तुम्ही आमच्या व शेतकऱ्यांच्यामध्ये पडता कामा नये. त्यातूनही तुम्हाला काही सांगावयाचे असेल, तर मला लिहून कळवा. मी चिटणीसांना नम्रपणे सांगितले की, मी स्वत:ला परकीय समजत नाही व शेतकऱ्यांची इच्छा असेल तर त्यांच्या स्थितीची चौकशी करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे.

कमिशनर साहेबांनी तर धमकीच द्यायला सुरुवात केली व मला पुढेही न जाता तिरहूत सोडून जाण्याची शिफारस केली.

मी सर्व हकीकत सोबत्यांना निवेदन केली व सांगितले की, तपास करण्यास सरकार मला आडकाठी करण्याची शक्यता आहे व तुरुंगात जाण्याचा प्रसंग मला वाटला होता, त्याहूनही

लवकर येईल. अटक व्हायचीच तर मोतीहारीमध्ये किंवा बेतियामध्ये झालेली बरी. त्यासाठी शक्य तेवढ्या त्वरेने तिकडे जाऊन पोचले पाहिजे.

चंपारण्य हा तिरहूत विभागाचा एक जिल्हा व मोतीहारी हे त्याचे मुख्य शहर. बेतियाच्या जवळच राजकुमार शुक्ल यांचे घर होते व त्याच्या जवळपासच्या मळ्यांतील शेतकरी सर्वाधिक रंक होते. त्यांची स्थिती मला दाखवावी अशी राजकुमार शुक्ल यांची इच्छा होती. मलाही ती पाहण्याची इच्छा होती.

म्हणून साक्षीदारांना बरोबर घेऊन मी त्याच दिवशी मोतीहारीला जावयास निघालो. मोतीहारीमध्ये गोरखबाबूंच्या घरी उतरलो व त्यांचे घर जणू काही धर्मशाळा बनून गेले. आमचा सर्वांचा त्याच्यामध्ये कसाबसा समावेश होऊ शकत होता. पोहोचलो त्याच दिवशी समजले की, मोतीहारीपासून सुमारे पाच मैल अंतरावर एक शेतकरी राहत असे, त्याच्यावर अत्याचार झाले आहेत. दुसरे दिवशी मी धरणीधरप्रसाद वकिलांना घेऊन त्याला भेटण्यास जावे असे ठरले. सकाळी आम्ही हत्तीवर बसून निघालो. अर्ध्या वाटेपर्यंत जातो, इतक्यात पोलीस सुपरिटेंडंटचा मनुष्य येऊन थडकला व मला म्हणाला, “तुम्हाला सुपरिटेंडंट साहेबांनी सलाम सांगितला आहे.” मी समजलो. धरणीधर-बाबूंना मी पुढे जावयाला सांगितले. मी त्या निरोप्याबरोबर त्याने आणलेल्या गाडीमध्ये बसलो. त्याने चंपारण्य सोडून जाण्याची नोटीस मला दिली. मला घरी घेऊन गेला व माझी सही मागितली. मी जबाब लिहून दिला की, मी चंपारण्य सोडून जाण्यास तयार नाही; मला पुढे जायचे आहे व तपासही करायचा आहे. निघून जाण्याचा हुकूम मोडल्याबद्दल दुसऱ्या दिवशी कोर्टात हजर व्हावे, असे समन्स मिळाले.

समन्सची वार्ता एका क्षणात सगळीकडे पसरली व लोकांच्या मते पूर्वी कधी न पाहिलेले दृश्य त्यावेळी मोतीहारीमध्ये दिसून आले. गोरखबाबूंचे घर व कचेरी यांमध्ये न मावतील इतके लोक येऊन भरले. सुदैवाने मी माझे सर्व काम रात्रीच आटपून घेतले होते. त्यामुळे मी त्या गर्दीला तोंड देऊ शकलो. सोबत्यांचा उपयोग मला पुरेपूर समजून आला. ते गर्दीवर नियंत्रण ठेवण्यात गुंतून गेले. कचेरीकडे किंवा कोठेही जावे तिकडे टोळ्याच टोळ्या माझ्या मागून येत.

कलेक्टर, मॅजिस्ट्रेट, सुपरिटेंडंट इत्यादी व मी यांच्यामध्ये एक प्रकारचा मित्रभाव जुळून आला. सरकारी नोटिशींचा मी कायदेशीरपणे विरोध करू शकलो असतो. तसे न करता मी त्यांच्या सर्व नोटीशी स्वीकारल्या. त्यावरून व अंमलदारांशी प्रत्यक्ष संबंध आला असता दाखवलेल्या सौजन्यावरून त्यांना कळून आले की, मला त्यांना विरोध करावयाचा नव्हता, तर त्यांच्या हुकूमाचा सविनय भंगच करावयाचा होता. त्यामुळे त्यांना एक प्रकारची निर्भयता लाभली. मला त्रास देण्याऐवजी लोकांवर नियंत्रण ठेवण्याच्या कामी माझ्या व माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीचा त्यांनी खुषीने उपयोग केला. पण त्याचबरोबर त्यांच्या हेही लक्षात आले की, आपली सत्ता आजपासून लुप्त झाली आहे. लोक क्षणभर शिक्षेचे भय विसरून आपल्या नव्या मित्राच्या प्रेमशक्तीच्या अधीन झाले.

येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, चंपारण्यामध्ये मला कोणी ओळखीत नव्हते. असे असताना त्यांची माझी भेट जुन्या मित्रांप्रमाणे झाली. यामध्ये मला ईश्वराचा, अहिंसेचा व सत्याचा साक्षात्कार झाला, असे म्हणण्यात अतिशयोक्ती तर वाटत नाहीच, पण ते सत्य आहे.

चंपारण्यातील तो दिवस मी जन्मात विसरू शकणार नाही असा होता. तो मला व शेतकऱ्यांनाही उत्सवाचा दिवस वाटला.

खटला चालू झाला. सरकारी वकील, मॅजिस्ट्रेट वगैरे घाबरून गेले होते.

शिक्षेसाठी कोर्टात जाण्याची वेळ येण्या-पूर्वीच मॅजिस्ट्रेटचा हुकूम आला की, गव्हर्नर साहेबांच्या हुकुमावरून खटला काढून घेण्यात आला आहे. कलेक्टरकडूनही पत्र आले की, मला करावयाची असेल ती चौकशी करावी व त्या कामी अंमलदाराकडून लागेल ती मदत घ्यावी. इतक्या त्वरित व शुभ परिणामाची आशा आम्ही कोणीही बाळगली नव्हती.

शेतकऱ्यांच्या टोळ्याच्या टोळ्या स्वत:ची हकीकत लिहून देण्यासाठी येऊ लागल्या. हकीकत लिहावयाला सांगणाऱ्याबरोबर त्याच्या जोडीदारांचे लष्कर असावयाचेच. त्यामुळे घराचे पटांगण भरून जाई.

# ४७. निळीचा डाग धुतला

माझ्या उतरण्याच्या ठिकाणी लोकांची गर्दी जसजशी वाढत चालली, तसतसा मळेवाल्यांचा क्रोध वाढत चालला. माझी चौकशी बंद करविण्याचे त्यांच्याकडून होणारे प्रयत्न वाढत गेले.

गव्हर्नर सर एडवर्ड गेट यांनी मला बोलावले व स्वत:ची चौकशी कमिटी नेमण्याचा इरादा मला बोलून दाखविला आणि त्या कमिटीचा सभासद म्हणून काम करण्यास मला पाचारण केले.

चौकशी कमिटीने शेतकऱ्यांच्या सर्व तक्रारी रास्त ठरविल्या आणि निळीच्या मळेवाल्यांनी गैरवाजवी रीतीने घेतलेल्या पैशांपैकी अमुक इतका भाग परत करावा व तीनकठियांचा कायदा रद्द करण्यात यावा अशी शिफारस केली.

अशा तऱ्हेने शंभर वर्षांपासून चालत आलेला तीनकठियांचा कायदा मोडून पडला व त्याबरोबर मळेवाल्यांच्या सत्तेचा अस्त झाला.

# खंड ११: अहमदाबादचे मजूर

## ४८. मजुरांशी संबंध

श्रीमती अनसूयाबाईंचे त्यांच्या मजूर संघासंबंधी पत्र आले होते. मजुरांचे पगार तुटपुंजे होते. पगारवाढीची त्यांची मागणी फार काळापासूनची होती. या बाबतीत त्यांना मार्गदर्शन करण्याची मला हौस होती. म्हणून मी अहमदाबादला गेलो.

माझी स्थिती अतिशय नाजूक होती. मजुरांचा पक्ष मला अतिशय बळकट दिसला. श्रीमती अनसूयाबाईंना आपले सख्खे भाऊ श्री. अंबालाल साराभाई, जे गिरणीमालकांचे नेतृत्व करीत होते, त्यांच्याबरोबर लढावे लागणार होते. गिरणी-मालकांशी माझा सलोख्याचा संबंध होता. त्यांच्याबरोबर लढणे माझ्या जिवावर येत होते. मी त्यांना मजुरांच्या मागणीसंबंधी पंच नेमण्याबद्दल विनविले. परंतु आपल्या व मरुरांच्यामध्ये पंचांनी मध्यस्थी करावी, हेच मालकांना योग्य वाटेना.

मजुरांना मी संप पुकारण्याचा सल्ला दिला. तो सल्ला देण्यापूर्वी मजूर व मजुरांचे पुढारी यांच्याशी भरपूर परिचय करून घेतला. त्यांना संपाच्या अटी समजावून सांगितल्या. त्या अशा:

१. काही झाले तरी शांतता-भंग करावयाचा नाही.

२. ज्यांची कामावर जाण्याची इच्छा असेल, त्यांच्यावर जोरजुलूम करावयाचा नाही.

३. मजुरांनी भिक्षान्न खाऊ नये.

४. संप कितीही लांबला, तरी त्यांनी दृढ रहावे आणि स्वतःजवळचे पैसे संपले, तर इतर मजुरी करून पोटास मिळवावे.

या अटी पुढाऱ्यांनी समजून घेतल्या व मान्य केल्या. मजुरांची जाहीर सभा झाली व तीत त्यांनी ठराव केला की, आपली मागणी मान्य झाल्याखेरीज किंवा तिच्या युक्ता-युक्ततेचा तपास करण्यासाठी पंच नेमले गेल्याखेरीज आपण कामावर जायचे नाही.

मजुरांनी पहिले दोन आठवडे हिंमत दाखविली. शांतताही खूप टिकविली. रोजच्या सभेला हजेरीही चांगली असे. रोज मी त्यांना त्यांच्या प्रतिज्ञेचे स्मरण करून देत असे. “आम्ही मरू, पण आपल्या प्रतिज्ञेपासून कधीही ढळणार नाही,” असे रोज ते मोठमोठ्याने गर्जून सांगत.

पण पुढे ते नरम पडू लागले. मी फिकिरीत पडलो. अशा प्रसंगी माझा धर्म कोणता याचा मी विचार करू लागलो.

सकाळचा प्रहर होता. मी सभेमध्ये होतो. मी पुढे काय करणार आहे याची मला काही कल्पना नव्हती. पण सभेमध्ये मी बोलून गेलो, “मजूर जर पुन्हा सज्ज होत नसतील व निकाल लागेपर्यंत संप टिकवू शकणार नसतील, तर तसा निकाल लागेपर्यंत मी उपवास करणार.”

हजर असलेले मजूर चपापले. अनसूयाबाईंच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा सुरू झाल्या. मजूर म्हणू लागले, “तुम्ही नका; आम्ही उपवास करतो, पण तुम्ही उपवास करता कामा नये. आम्हाला माफ करा, आम्ही प्रतिज्ञा पाळू.”

मी म्हटले, “तुम्हाला उपवास करण्याची जरूर नाही. तुम्ही तुमच्या प्रतिज्ञेचे पालन करा म्हणजे झाले. आपल्यापाशी पैसे नाहीत. आपल्याला मजुरांना भिक्षान्न खाऊ घालून संप चालावयाचा नाही. तुम्ही कसली तरी मजुरी करा आणि आपल्या रोजच्या रोटीपुरते पैसे मिळवा, म्हणजे संप कितीही लांबला तरी तुम्हाला निश्चिंत राहता येईल. माझा उपवास आता निकाल लागण्यापूर्वी सुटणे शक्य नाही.”

माझ्या उपवासाच्या पहिल्या दिवशी तर अनसूयाबाई, इतर अनेक मित्र व मजूर यांनीही माझ्याबरोबर उपवास केला. त्यांनी अधिक उपवास करू नये याबद्दल मी त्यांची मोठ्या मुश्किलीने समजूत घालू शकलो.

अशा तऱ्हेने चोहीकडे वातावरण प्रेममय बनून गेले. मालक केवळ दयेला वश होऊन तडजोड करण्याचे मार्ग शोधून काढू लागले. अनसूयाबाईंच्या घरी वाटाघाटी सुरू झाल्या. श्री. आनंदशंकर ध्रुवही मधे पडले. अखेरीस त्यांना पंच नेमण्यात आले व संप मिटला. मला तीन दिवस उपवास करावा लागला. मालकांनी मजुरांना मिठाई वाटली. एकवीस दिवसांनी तडजोड झाली.

# खंड १२: खेडा सत्याग्रह

## ४९. खेडामध्ये सत्याग्रह

मजुरांचा संप पुरा झाल्यानंतर मला दम घ्यायलाही वेळ मिळाला नाही. लगेच गुजरातमधील खेडा जिल्ह्यातील सत्याग्रहाचे काम हाती घ्यावे लागले.

खेडा जिल्ह्यामध्ये दुष्काळी स्थिती असल्यामुळे वसूल माफ करून घेण्यासाठी खेड्याचे पाटीदार झटत होते.

पीक चार आणे किंवा त्याहून कमी आल्यास त्या वर्षापुरती वसूली माफ झाली पाहिजे, असा कायदा होता. पण सरकारी अंमलदारांची आकारणी चार आण्यांपेक्षा जास्त होती. लोकांकडून पंच नेमण्याची मागणी करण्यात आली. सरकारला ती सहन झाली नाही. करता आली तेवढी विनवणी करून झाल्यानंतर सोबत्यांचा विचार घेऊन मी पाटीदारांना सत्याग्रह करण्याचा सल्ला दिला.

सुरुवातीच्या दिवसांत लोकांमध्ये खूप हिंमत दिसून येत होती. सुरुवातीला सरकारचे इलाजही नरम होते. पण सरकारला जेव्हा दिसले की, लोक अधिकाधिक भक्कम होत चालले आहेत, तेव्हा त्यांनीही उग्र इलाज करण्याचा विचार केला. जप्तीदारांनी लोकांची गुरे विकली, घरांतून वाटेल तो माल हिरावून नेला. चौथाईच्या नोटीसाही निघाल्या. काही गावांची उभी पिके सबंधच्या सबंध जप्त करण्यात आली.

भयभीत झालेल्या लोकांमध्ये उत्साह आणण्या-साठी मी एक युक्ती योजिली. एक शेत अयोग्य तऱ्हेने जप्त करण्यात आले होते व त्यात कांद्याचे पीक तयार झाले होते. ते पीक मोहनलाल पंड्यांच्या नेतृत्वाखाली काढून आणण्याचा सल्ला मी दिला. माझ्या मते यात कायद्याचा भंग होत नव्हता. तसे करण्यामध्ये तुरुंगात जाण्याची किंवा दंड होण्याची धास्ती आहे, हे लोकांना स्पष्ट करून सांगितले होते. मोहनलाल पंड्यांना तेच पाहिजे होते. त्यांनी शेतातील कांदे काढण्याचा निश्चय केला; त्यांच्या जोडीला आणखी सातआठ जण मिळाले. सरकार त्यांना

पकडल्याशिवाय कसे राहील ? मोहनलाल पंड्या व त्यांचे जोडीदार यांच्या अटकेने लोकांमधील उत्साह वाढला. लोक तुरुंगाबद्दल बेफिकीर बनले की, मग सरकारच्या सोट्याने ते दबत नाहीत, तर त्यांना अधिकच शौर्य चढते.

कैद्यांना पोचविण्यासाठी मिरवणूक निघाली, त्या दिवसापासून मोहनलाल पंड्यांना 'कांदेचोर' असा सन्मानार्थी किताब मिळाला व तो आजपर्यंत त्यांच्याकडे चालत आला आहे.

सत्याग्रहींना कमीपणा येणार नाही, अशा तऱ्हेने लढा आटोपण्याचा काही शोभून दिसेल असा मार्ग मिळाल्यास तो अवलंबण्याकडे माझी प्रवृत्ती होती. अशा तऱ्हेचा मार्ग अवचित सापडला. नडियाद तालुक्याच्या मामलेदाराने सांगून पाठविले की, जर सुस्थितीतील पाटीदारांनी आपापला महसूल भरला, तर गरिबांची वसुली तहकूब ठेवण्यात येईल. याबद्दल मी लेखी कबुली मागितली, तीही मिळाली. पण मामलेदार फक्त आपल्या तालुक्यापुरती जबाबदारी घेऊ शकणार होता; संपूर्ण जिल्ह्याची जबाबदारी कलेक्टरची होती. म्हणून मी कलेक्टरला विचारले. त्यांच्याकडून उत्तर आले की, मामलेदार म्हणतात तसा हुकूम निघालेला आहे. मला याची माहितीही नव्हती. पण तसा निघाला असेल, तर लोकांची प्रतिज्ञा पुरी झाली, असे म्हणता येईल. प्रतिज्ञेत हीच गोष्ट होती; म्हणून तेवढ्या हुकूमावर संतोष मानून घेतला.

खेडा सत्याग्रहापासूनच गुजराथच्या शेतकरी-वर्गाच्या जागृतीला व त्यांच्या राजकीय शिक्षणाला सुरुवात झाली. पाटीदारांना स्वतःच्या शक्तीची जाणीव झाली व तिचा कधीच विसर पडला नाही. प्रजेच्या मुक्तीची मदार स्वत: तिच्यावर आहे, तिच्या त्यागबलावरच आहे, ही गोष्ट सर्वांच्या प्रत्ययाला आली. खेड्याच्या निमित्ताने गुजराथच्या भूमीत सत्याग्रहाने आपली पाळेमुळे रोवली.

# ५०. मृत्युशैय्या

त्यावेळी माझा आहार मुख्यत्वेकरून भाजून कुटलेले भुईमूगदाणे व लिंबाचे पाणी असा असे. दाणे प्रमाणाबाहेर खाल्ल्यास बाधक होतात, हे मला कळत असताही ते जास्त खाल्ले गेले. त्यामुळे किंचित मुरडा होऊ लागला.

तो दिवस कसल्यातरी सणाचा होता. दुपारीही मी जेवणार नाही असे कस्तुरबाईला सांगून ठेवल्याचे मला स्मरते. पण तिने मला मोहात गुंतविले व मी त्यात सापडलो. त्यावेळी मी कोणत्याही जनावराचे दूध घेत नसे; अर्थातच तूप, ताक इत्यादीदेखील वर्ज्य होती. म्हणून माझ्यासाठी गहू भरडून तेलावर परतून त्याची लापशी बनविलेली होती. लापशी व मुगाची उसळ माझ्यासाठी ठेवून दिलेली आहे, असे कस्तुरबाईने मला सांगितले, आणि जिव्हालौल्यामुळे माझा निश्चय डळमळला. डळमळला तरी अशी इच्छा होती की, मी कस्तुरबाईची समजूत करण्यापुरते थोडेसेच खाईन, स्वाद पण चाखीन व शरीरही सांभाळून ठेवीन. पण सैतान आपली संधी साधण्यासाठी टपूनच बसलेला होता. जेवायला बसलो आणि मी पोट भरून खाल्ले. स्वादसुख तर पुरेपूर घेतले, पण त्याबरोबर यमराजालाही निमंत्रण दिले. खाऊन एक तासभर लोटला नसेल इतक्यात जोराचा मुरडा सुरू झाला.

औषध मला घ्यावयाचेच नाही, केल्या कर्माचे प्रायश्चित्त भोगणार. चोवीस तासात तीस-चाळीस वेळा शौचास झाले. खाणे मी बंद केलेच होते. सुरुवातीच्या दिवसांत फळांचे रसही घेतले नाहीत; घेण्याची इच्छाही बिलकुल नव्हती. मृत्यू जवळच येऊन ठेपला आहे असे मनाने घेतले.

अशा तऱ्हेने मृत्यूची वाट पाहत बसलो होतो. माझ्या. तब्येतीची रखवालदारी शंकरलाल बनकरांनी आपल्याकडे घेतली होती. त्यांनी डॉक्टर दलालांचा सल्ला घेण्याचा आग्रह केला. डॉक्टर दलाल आले. त्यांची त्वरित निर्णय घेण्याची शक्ती पाहून मी मोहित झालो.

ते म्हणाले, “तुम्ही दूध घेत नाही, तोपर्यंत मला तुमचे शरीर सुधारता येणार नाही. शरीर भरून येण्यासाठी तुम्ही दूध घेतले पाहिजे आणि लोह व सोमल यांची इंजेक्शने घेतली पाहिजेत. एवढे कराल, तर तुमचे शरीर परत सुदृढ करून देण्याची मी हमी देतो.”

"इंजेक्शन द्या, दूध मात्र मी घेणार नाही कारण मी तशी प्रतिज्ञा केली आहे," असा मी जबाब दिला.

"तुमची दुधाविषयी काय प्रतिज्ञा आहे ?" डॉक्टरांनी विचारले.

"गाई-म्हशींवर फुंकरीची क्रिया होते, हे ऐकल्यापासून दुधाबद्दल माझ्या मनात तिरस्कार उत्पन्न झाला व तो मनुष्याचा आहारही नव्हे, असे मी नेहमीच मानीत आलो आहे. म्हणून मी दुधाचा त्याग केला आहे."

"असेच असेल, तर बकरीचे दूध घेता येईल," कस्तुरबाई खाटेपाशी उभी होती, ती चटकन म्हणाली.

"बकरीचे दूध घेतलेत की माझे काम झाले," डॉक्टर मध्येच म्हणाले.

मी डळमळलो. सत्याग्रहाच्या लढ्याबद्दलच्या मोहामुळे माझ्यामध्ये जगण्याचा लोभ उत्पन्न झाला आणि मी प्रतिज्ञेच्या अक्षरार्थपालनावर संतोष मानून प्रतिज्ञेच्या आत्म्याचा घात केला. दुधाची प्रतिज्ञा घेतेवेळी माझ्या डोळ्यांसमोर गाई-म्हशीच होत्या, तरीही प्रतिज्ञा एकंदर दुधाला उद्देशूनच समजली पाहिजे आणि जोपर्यंत कोणत्याही पशूचे दुध मनुष्याला आहार म्हणून निषिद्धच आहे, असे मला वाटते तोपर्यंत ते घेण्याचा मला अधिकार पोचत नाही, हे कळत असुनही मी बकरीचे दूध घ्यायला तयार झालो. सत्याच्या पुजाऱ्याने सत्याग्रहाच्या लढाईसाठी जगण्याची इच्छा करून सत्याला कलंक लावला. माझ्या या कृत्याचा दंश अद्याप भरून निघालेला नाही आणि बकरीचे दूध सोडण्याबद्दल माझे चिंतन चालूच आहे. परंतु सेवा करण्याचा महासूक्ष्म मोह माझ्या पाठीस लागला आहे, तो मला सोडीत नाही.

बकरीचे दूध सुरू केल्यानंतर थोड्याच दिवसांनी डॉ. दलालांनी गुद्द्वाराशी चिरा पडल्या होत्या, त्यावर शस्त्रक्रिया केली व ती यशस्वी झाली. शरीराला आराम पडल्यानंतर मी जगायची आशा बाळगू लागलो. ईश्वराने माझ्यासाठी काम तयारच ठेवले होते.

# खंड १३: रौलॅट ॲक्ट आणि राजकारणात प्रवेश

## ५१. रौलॅट ॲक्ट

अंथरुणातून उठण्याची थोडी आशा वाटू लागली आणि वर्तमानपत्रे वगैरे वाचू लागलो. इतक्यात रौलॅट कमिटीचा रिपोर्ट माझ्या हाती आला. त्यातील शिफारशी पाहून मी चमकून उठलो. वल्लभभाई बहुधा रोज माझ्या समाचाराला येत. त्यांच्याशी मी बोललो व त्याबाबत काहीतरी झाले पाहिजे असे सुचविले. "काय होणार ?" या प्रश्नाचा जबाब देताना मी म्हटले, "थोडी माणसे जरी या बाबतीत प्रतिज्ञेने बांधली जाणारी मिळाली, तरी कमिटीच्या शिफारसीप्रमाणे कायदा झाल्यावर आपण सत्याग्रह हाती घेतला पाहिजे. अंथरुणाला खिळलेला नसतो, तर मी एकटाही झुंजलो असतो आणि इतर मागून येऊन मिळतील अशी आशा केली असती. माझ्या या परावलंबी अवस्थेमध्ये एकट्याने झुंजण्यासारखी माझी मुळीच स्थिती नाही.

अद्याप बिल गॅझेटात आले नव्हते. माझे शरीर तर अशक्तच होते. पण मद्रासहून आलेले आमंत्रण स्वीकारलेच पाहिजे, असे मला वाटले. त्यामुळे मी लांबच्या प्रवासाची जोखीम पत्करली. राजगोपालाचार्य सेलम सोडून मद्रासमध्ये वकिली करणार होते. त्यांच्याबरोबर रोज लढ्याच्या उभारणीसंबंधी विचार चाले. सभा भरविण्यापलीकडे मला दुसरे काही सुचत नव्हते.

अशा तऱ्हेने धामधूम चालली होती. इतक्यात बातमी आली की, बिल कायद्याच्या स्वरुपात गॅझेटमध्ये प्रसिद्ध झाले. ही बातमी आल्यानंतर रात्री मी विचार करीतच झोपी गेलो. सकाळी लवकर उठून बसलो. अर्धवट झोपेत स्वप्नामध्येच मला विचार सुचला. सकाळच्या प्रहरी मी राजगोपालाचार्यांना बोलावून आणून सांगितले:

"मला रात्री अर्धवट झोपेमध्ये विचार सुचला की, आपण या कायद्याच्या प्रत्युत्तरा-दाखल उभ्या देशाला हरताळ पाळण्याची सूचना द्यावी. सत्याग्रह हा आत्मशुद्धीचा लढा आहे. धर्मकार्याची सुरुवात आत्मशुद्धीपासून करावी हे योग्य दिसते. त्या दिवशी सर्वांनी उपवास करावा व कामधंदा बंद करावा."

ही सूचना राजगोपालाचार्यांना फार आवडली. नंतर लगेच इतर मित्रांना कळविली. सर्वांनी पसंत केली. एक लहानशी नोटीस मी लिहून काढली. प्रथम ३० मार्च १९१९ ही तारीख घालण्यात आली होती. मागाहून एप्रिलची ६ तारीख करण्यात आली.

सबंध हिंदुस्थानभर-शहरांत व खेडोपाडी हरताळ पळण्यात आले. ते दृश्य अद्भुत होते.

७ तारखेला रात्री मी दिल्ली-अमृतसरकडे जायला निघालो. पलवल स्टेशन येण्यापूर्वीच पोलीस अंमलदाराने माझ्या हातात हुकूम आणून दिला. “तुम्ही पंजाबमध्ये आल्याने अशांतता वाढण्याचा संभव आहे. सबब तुम्ही पंजाबच्या सरहद्दीत पाऊल टाकू नये,” अशा अर्थाचा तो हुकूम होता. हुकूम दाखवून पोलिसांनी मला उतरून जाण्यास सांगितले. मी उतरण्याचे नाकारून म्हटले, “मी अशांती वाढविण्यासाठी नव्हे, तर बोलावणे आल्यावरून अशांती नाहीशी करण्यासाठी जाऊ इच्छितो. त्यामुळे मला दिलगिरी वाटते की, मला हा हुकूम मानणे शक्य नाही.”

पलवल स्टेशनवर मला उतरून घेतले व पोलिसांच्या हवाली केले. दिल्लीहून येणाऱ्या एका गाडीच्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यात मला बसविले; बरोबर पोलीसपार्टी बसली. मथुरेला पोचल्यावर मला पोलीस बराकीत घेऊन गेले. माझे काय करणार किंवा मला कोठे घेऊन जाणार ते अंमलदार मला सांगू शकला नाही. पहाटे चार वाजता मला उठविले आणि एक मालगाडी मुंबईकडे जात होती, तिच्यामध्ये बसविले. मला मुंबईला मुक्त करण्यात आले.

माझ्या अटकेच्या बातमीने लोक चवताळून गेले होते. मी मोटारीत बसलो. पायधुणी पर्यंत पोचण्यापूर्वीच रस्त्यात खूप गर्दी जमलेली दिसली. लोक मला पाहून हर्षाने वेडे झाले. आता मिरवणूक तयार झाली. 'वंदे मातरम्' व “अल्लाहो अकबर'च्या जयघोषाने आकाशाच्या चिंधड्या उडतात की काय असे वाटू लागले. पायधुणीवर घोडेस्वार दिसले. वरून विटांचा वर्षाव होत होता. मी हात जोडून लोकांना शांत होण्याबद्दल विनवीत होतो. पण आम्हीसुद्धा त्या विटांच्या वर्षावातून बचावून जाऊ असे चिन्ह दिसेना. मिरवणुकीला अब्दुल रहमान गल्लीतून क्रॉफर्ड मार्केटकडे जाण्यास अटकाव करण्याकरिता समोरून घोडेस्वारांची तुकडी येऊन थडकली.

लोकांना फोर्टकडे जाण्यापासून रोखण्याचा त्यांचा प्रयत्न होता. लोक आवरत नव्हते. लोक पोलिसांचे कडे तोडून घुसले. माझा आवाज ऐकू जाण्यासारखी स्थिती नव्हती. अशा स्थितीत घोडेस्वारांच्या तुकडीच्या नेत्याने लोकांवर एकदम घोडे सोडून दिले. त्यांपैकी एखाद्या भाल्याने आमचीही वाट लागली, तर आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही असे मला वाटले. पण त्या समजुतीत अर्थ नव्हता. आमच्या बाजूने सर्व भाले आगगाडीच्या वेगाने हवा कापीत चालले होते. लोकांच्या जमावामध्ये खिंडार पडले; पळापळ सुरू झाली. कोणी चिरडले गेले, कोणाला जखमा झाल्या. घोडेस्वारांना बाहेर पडायला मार्ग नव्हता, तर लोकांना बाजूला सरायला मार्ग नव्हता. घोडेस्वार खाली वाकून घोड्यांना दौडवीत चालले होते. हजारो लोकांचा हा जमाव भेदून जायला त्यांना जे काही क्षण लागले, तेवढे क्षण त्यांना काही दिसतच नव्हते असे मी पाहिले. एकंदर देखावा भयंकर होता. घोडेस्वार व लोक दोघेही वेडे झाल्यासारखेच दिसले.

लोकांना अशा तऱ्हेने विखुरण्यात व रोखण्यात आले. आमच्या मोटारीला पुढे जाऊ दिले. मी कमिशनरच्या ऑफिसपुढे मोटार उभी करविली आणि पोलिसांच्या वर्तणुकीबद्दल कमिशनरांकडे तक्रार करण्यासाठी मी तेथेच उतरलो.

अहमदाबादमध्येही दंगे झाले आहेत, अशी खबर मिळाली होती. मी अहमदबादला गेलो. मला समजले की, नडियादच्या शेजारी रेल्वेचा रूळ उखडण्याचाही प्रयत्न झाला होता; विरमगावला एका सरकारी नोकराचा खून झाला. मी अहमदाबादला जातो तों तेथे 'मार्शल लॉ' पुकारण्यात आला होता. लोक गांगरून गेले होते. लोकांनी आपल्या कर्माची फळे सव्याज भोगली.

स्टेशनवर मला कमिशनर मि. प्रॅटकडे घेऊन जाण्यासाठी एक मनुष्य आला होता. तेही खूप संतापलेले होते. मी शांतपणे जबाब दिला. झालेल्या खुनाबद्दल आपली दिलगिरी व्यक्त केली. 'मार्शल लॉ' अनावश्यक असल्याचेही सुचविले आणि परत शांतता प्रस्थापित करण्यासाठी जे जे उपाय योजावे लागतील, ते ते योजण्याची माझी तयारी आहे, असे सांगितले. जाहीर सभा भरविण्याची परवानगी मागितली. ती सभा आश्रमाच्या जागेमध्ये भरविण्याची माझी इच्छा व्यक्त

केली. ती त्यांना पसंत पडली. मला आठवते त्याप्रमाणे मी १३ एप्रिल रोजी ती सभा भरविली. मार्शल लॉही त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी रद्द झाला. या सभेमध्ये मी लोकांना त्यांच्या दोषांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला. मी प्रायश्चित्तादाखल तीन दिवस उपवास केला व लोकांना एक दिवस करण्याचा सल्ला दिला. ज्यांनी दंग्याधोप्यांमध्ये भाग घेतला होता, त्यांना स्वतःचा गुन्हा कबूल करण्यास सांगितले.

माझे कर्तव्य मला स्पष्ट दिसून आले. ज्या मजुरांमध्ये व इतर लोकांमध्ये मी एवढा वेळ राहिलो होतो, ज्यांची मी सेवा केली होती आणि ज्यांच्याकडून चांगल्या वर्तणुकीची मी आशा ठेवली होती, त्यांनी दंग्यामध्ये भाग घ्यावा हे मला असह्य झाले व त्यांच्या दोषाचा मीही भागीदार आहे असे मला वाटले.

शांततेची शिकवण जोपर्यंत लोक आत्मसात करणार नाहीत, तोपर्यंत सत्याग्रह बंद राखण्याचा मी निश्चय केला.

# खंड १४: खादीचा जन्म

## ५२. खादीचा जन्म

सत्याग्रह आश्रमाची स्थापना केली, तेव्हा आम्ही थोडे हातमाग सुरू केले.

आम्हाला स्वतःचे कपडे तयार करून वापरायचे होते. त्यासाठी आता गिरणीचे कापड वापरण्याचे बंद करून देशी गिरण्यांच्या सुताचे हातमागावर विणलेले कापड वापरण्याचा आश्रमवासियांनी ठराव केला. अशा तऱ्हेने कापड मुद्दाम विणवून घेऊन आम्ही वापरू लागलो व मित्रांमध्येही त्याचा प्रचार केला. आमचा गिरण्यांशी संबंध आला. स्वतः कातलेले सूत स्वतःच विणून घेणे हेच गिरण्यांचे धोरण असल्याचे आमच्या लक्षात आले. त्या आपणहून हातमागाच्या उपयोगी पडत नव्हत्या. त्याला त्यांचा नाईलाज होता. हे सर्व पाहिल्यानंतर आम्ही हाताने सूत कातायला अधीर झालो. हाताने सूत कातू लागेपर्यंत आम्ही पराधीन राहणार असे आम्हाला वाटले. गिरण्यांचे एजंट बनण्यामध्ये आम्ही काही देशसेवा करतो असे आम्हाला वाटेना.

आम्हाला चरखाही कोठे मिळेना किंवा चरखा चालविणाराही कोणी भेटेना. माहिती देण्यासारखे जे कोणी आश्रमात येत, तेवढ्यांना मी विचारीत असे.

सन १९१७ साली गुजराथी बंधूंनी मला भडोच शिक्षण परिषदेत खेचून नेले होते. तेथे मला साहसी स्वभावाच्या गंगाबेन मजमुदार भेटल्या. मी माझी मनोव्यथा त्यांच्यापुढे मांडली आणि चरख्याच्या शोधार्थ भ्रमण करण्याचे शिरावर घेऊन त्यांनी माझा भार हलका केला.

गुजरातमध्ये खूप भटकल्यानंतर बडोदा संस्थानातील विजापूरमध्ये गंगाबेनना चरखा सापडला. पुष्कळ कुटुंबांपाशी चरखे होते, पण ते त्यांनी माळ्यावर टाकलेले होते. पण कोणी त्यांचे सूत घ्यायला तयार असेल व त्यांना पेळू पुरविले जाणार असतील, तर ते सूत कातण्यास तयार होते. गंगाबेनने मला खबर दिली व माझ्या हर्षाला सीमा राहिली नाही. पेळू पुरविण्याचे काम कठीण वाटले. मरहूम भाई उमर सोबानी यांच्यापाशी गोष्ट काढता त्यांनी आपल्या गिरणीतून पेळू पुरविण्याचे काम शिरावर घेतले.

पेळू विकत घेण्याचे माझ्या जिवावर आले. शिवाय गिरणीचे पेळू घेऊन सूत कातण्यात मला मोठा दोषही वाटला. गिरणीचे पेळू घ्यायचे, तर सूत घेण्यालाही हरकत कोणती ? आपल्या वाडवडिलांपाशी गिरणीचे पेळू थोडेच होते ? त्यांनी पेळू कसे बनविले असतील बरे? पेळू बनविणाऱ्यांचा शोध घेण्याची मी गंगाबेनना सूचना केली. त्यांनी हे काम आपल्या शिरावर घेतले. पिंजारी शोधून काढला. त्याला दरमहा ३५ रुपये किंवा त्याहून अधिक पगारावर नेमला. मी खर्चाकडे पाहिले नाही. त्याने काही तरूणांना या कामाचे प्रशिक्षण दिले. इकडे आश्रमामध्येही चरखे सुरू होण्यास वेळ लागला नाही.

# ५३. पूर्णाहुती

आता ही प्रकरणे बंद करण्याची वेळ येऊन ठेपली आहे.

यापुढील माझे जीवन इतके काही जाहीर होऊन बसले आहे, की जनतेला माहीत नाही असे क्वचितच काही असेल.

माझी लेखणी पुढे चालायला कबूल नाही, असेही म्हटल्यास चालेल.

वाचकांचा निरोप घेताना माझ्या मनाला दुःख होत आहे. माझ्या प्रयोगांची मला स्वतःला फार किंमत वाटते. त्यांचे वर्णन मी यथार्थत: करू शकलो आहे की नाही, ते मला माहीत नाही. यथार्थ वर्णन करण्याच्या कामी मी कसूर केली नाही. सत्य मी जसे पाहिले, ज्या मार्गाने पाहिले, तसे ते दर्शविण्याचा मी सतत प्रयत्न केला आहे; आणि वाचकांपुढे त्याचे वर्णन केल्याने माझ्या चित्ताचे समाधान झाले आहे. कारण त्या वर्णनापासून वाचकांनाही सत्य व अहिंसा यांबद्दल अधिक आस्था वाटू लागेल, अशी मला आशा वाटत आहे.

# निबंधासाठी विषय

**प्रकरण १**

१. गांधीजींच्या आईची धार्मिक श्रद्धा तुमच्या शब्दांत वर्णन करा.

**प्रकरण २**

१. गांधीजी सत्यप्रिय होते, हे दर्शविणारे त्यांच्या शालेय जीवनातील प्रसंग सांगा.

२. श्रावण आणि हरिश्चंद्र यांच्या कथा गांधीजींना का आवडत ? तुम्हाला या कथांविषयी काय माहिती आहे ?

३. गांधीजी पुस्तकी अभ्यासापेक्षा वागणुकीला अधिक महत्त्व देत. त्यांचे विचार बरोबर होते का ? कारण सांगा.

४. गांधीजी म्हणत, “सत्य बोलणाऱ्याने व आचरणाऱ्याने गाफील राहता कामा नये.” या वाक्यातून गांधीजींना काय म्हणायचे आहे ते संदर्भासह स्पष्ट करा.

**प्रकरण ३**

१. गांधीजी आणि कस्तुरबा यांचे सुरुवातीचे वैवाहिक जीवन कसे होते ते तुमच्या शब्दांत सांगा.

**प्रकरण ४**

१. मांस खाणे चांगले असते, असे गांधीजींना वाटण्यामागे कोणती कारणे होती ?

२. त्यांनी मांस खाणे का सोडले ?

३. मैत्री काळजीपूर्वक का केली पाहिजे, गांधीजींच्या या प्रकरणातील अनुभवावरून स्पष्ट करा.

**प्रकरण ५**

१. विडी ओढण्याच्या गांधीजींच्या अनुभवा-बद्दल लिहा.

२. गांधीजींनी चूक कबूल केल्याचा त्यांच्या वडिलांवर आणि त्यांच्या स्वतःवर काय परिणाम झाला ? कारणे देऊन स्पष्ट करा.

३. गांधीजींना आत्महत्या का करावीशी वाटली आणि तो विचार त्यांनी का सोडून दिला ?

**प्रकरण ६**

१. गांधीजींनी आपल्या आजारी वडिलांची कोणत्या प्रकारे सेवा केली ?

**प्रकरण ७**

१. गांधीजींची दाई रंभा हिने त्यांना कोणत्या प्रकारे मदत केली ? तिच्या उपदेशाचा त्यांना पुढील आयुष्यात कसा उपयोग झाला ?

२. रामायणाबद्दल गांधीजींचे काय मत होते, ते मत कसे बनले ?

३. त्यांचे इतर धर्माविषयी काय मत होते आणि का ?

४. त्यांचे हे मत आयुष्यभर राहिले का ? त्यांच्या प्रार्थना आणि इतर कार्याचा आढावा घेऊन या प्रश्नाचे उत्तर द्या.

५. गांधीजींच्या मते धर्माचे सार कशात आहे ? मंदिरात जाणे आणि पूजा-अर्चा करणे, किंवा विशिष्ट चाली-रितींचे पालन करणे म्हणजे धर्मपालन असे ते मानीत होते का ?

**प्रकरण ८**

१. गांधीजींना इंग्लंडला जाण्यापूर्वी कोणत्या संकटांचा सामना करावा लागला ?

**प्रकरण ९**

१. बोटीवर गांधीजींना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागले ?

२. रुढी म्हणजे काय ? इंग्लंडला आल्यावर गांधीजींनी पोषाख, अन्न आणि सवयी यांबाबातच्या ब्रिटिशांच्या कोणत्या रुढींना विरोध केला ?

## प्रकरण १०

१. शाकाहारी भोजनाच्या बाबतीत गांधीजींना बोटीवर कोणत्या प्रश्नांना तोंड द्यावे लागले आणि कोणत्या गोष्टींमुळे ते कायमचे शाकाहारी बनले ?

## प्रकरण ११

१. 'सभ्य माणूस' बनण्यासाठी गांधीजींनी कोणकोणत्या गोष्टी केल्या ?

२. हा प्रयत्न त्यांनी का सोडून दिला ?

३. पोषाख, धूम्रपान, मद्यपान, स्वच्छता, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा आणि शिस्तशीरपणा, यांपैकी कोणत्या गोष्टी आपण पाश्चिमात्य लोकांकडून घेतल्या पाहिजेत ? आणखी कोणत्या गोष्टी त्यांच्याकडून घेण्यासारख्या आहेत ?

## प्रकरण १२

१. पैसे खर्च करण्याच्या बाबतीत गांधीजी कसे काटेकोर होते आणि लंडनमध्ये विद्यार्थी म्हणून राहत असताना ते कमीत कमी पैशांत कशा प्रकारे राहत असत ?

२. “स्वादाचे खरे स्थान जीभ नव्हे, तर मन आहे” गांधीजींच्या उदाहरणावरून स्पष्ट करा.

३. गांधीजींनी आपल्या आहारात कोणत्या सुधारणा केल्या ? का ?

४. शरीरव्यापाराला आवश्यक तेवढेच अन्न घेणे योग्य आहे, स्वादाला संतुष्ट करण्यासाठी नव्हे, असे गांधीजी मानीत. तुमचे मत द्या.

## प्रकरण १३

१. लाजाळूपणा ही गांधीजींची कशाप्रकारे ढाल होती ? लाजाळूपणा हा कशाप्रकारे फायदेशीर ठरू शकतो, तुमच्या अनुभवावरून सांगा.

## प्रकरण १४

१. गीतेची कोणती शिकवण गांधीजींच्या मनाला भावली ? या शिकवणीचा अर्थ काय ? तुमच्या स्वतःच्या अनुभवावरून स्पष्ट करा.

२. बायबल काय आहे ? 'गिरीप्रवचन' कोणी दिले ? त्यातील कोणत्या शिकवणीचा गांधीजींवर प्रभाव पडला ?

३. बुद्धाच्या आयुष्यातून आणि संदेशातून गांधीजी कोणती गोष्ट शिकले ? तुम्हाला गौतम बुद्धांविषयी काय माहिती आहे ?

## प्रकरण १५

१. गांधीजींना जातीतून बहिष्कृत करणाऱ्यांवर त्यांनी कशा प्रकारे विजय मिळविला ? गांधीजींनी त्यांच्याविरुद्ध केलेल्या अप्रतिकाराचा फायदा झाला का ?

२. अप्रतिकार आणि दयाळूपणा बाळगून विरोध करणे योग्य की तिरस्कार आणि द्वेष बाळगून विरोध करणे योग्य ? गांधीजींच्या उदाहरणावरून सांगा.

३. वकील म्हणून गांधीजींचा न्यायालयातील प्रवेश तुमच्या शब्दांत वर्णन करा.

## प्रकरण १६

१. पोरबंदरमध्ये ब्रिटिश पोलिटिकल एजंटने गांधीजींना कशी वागणूक दिली, तुमच्या शब्दांत लिहा.

२. कोणत्या गोष्टींनी गांधीजींना भारतातून दक्षिण आफ्रिकेत जाण्यास भाग पाडले ?

## प्रकरण १७

१. दक्षिण आफ्रिकेत प्रवेश करताच कोणती गोष्ट गांधीजींच्या लक्षात आली ?

## प्रकरण १८

१. दक्षिण आफ्रिकेतील डरबन ते मॉरित्झबर्ग या गांधीजींच्या रेल्वेप्रवासाचे वर्णन करा.

२. गांधीजींचा चार्लस्टाऊन ते स्टँडरटन हा शिग्रामप्रवास आणि जोहान्सबर्ग ते प्रिटोरिया हा रेल्वेप्रवास कसा होता ?

**प्रकरण १९**

१. दक्षिण आफ्रिकेत गेल्यानंतर हॉटेलात जागा मिळविण्यासाठी गांधीजींना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले ?

**प्रकरण २०**

१. ट्रान्सवालमधील भारतीयांसमोर कोणते प्रश्न होते ?

२. प्रिटोरियामध्ये असताना फुटपाथवरून चालल्याबद्दल गांधीजींना कोणत्या प्रसंगाला सामोरे जावे लागले ?

**प्रकरण २१**

१. गांधीजींनी कोणत्या पद्धतीने दावा सोडविला ? का ? दाव्याची तडजोड करणे म्हणजे काय ? उदाहरण द्या.

**प्रकरण २२**

१. अब्दुल्ला केसचा निकाल लागल्यानंतर-देखील गांधीजींना भारतात येण्याचा निर्णय का स्थगित करावा लागला ?

**प्रकरण २३**

१. करारबद्ध मजूर म्हणजे काय ?

२. तीन पौंडांचा कर काय होता आणि तो भारतीय मजुरांवर का लादण्यात आला ?

## प्रकरण २४

१. दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांवर कशाप्रकारे अन्याय होत होते, ही गोष्ट भारतीयांपर्यंत पोचविण्यासाठी गांधीजींनी काय केले ?

## प्रकरण २५

१. क्वारंटाईन म्हणजे काय? त्याची योजना का करण्यात आली ?

२. गांधीजींच्या दक्षिण आफ्रिकेतील पुनरागमनावर गोऱ्या लोकांचा का आक्षेप होता ?

३. गांधीजींच्या डरबनमधील वादळी आगमनाचे वर्णन करा.

४. शेवटी गोऱ्यांचा गांधिजींविषयीचा विरोध कसा मावळला ?

## प्रकरण २६

१. गांधीजींनी स्वत:चे कपडे स्वतःच धुण्याचे आणि स्वत:चे केस स्वत:च कापण्याचे कसे प्रयत्न केले, तुमच्या शब्दांत लिहा.

२. स्वत:चे काम स्वत: करण्याचे कोणते फायदे आहेत ?

३. दक्षिण आफ्रिकेत त्यांना काळे म्हणून मिळालेली वागणूक हे आमच्या स्वतःच्याच कर्माचे फळ आहे, असे गांधीजी का म्हणतात ?

४. अस्पृश्तेचे निवारण करण्यासाठी काय केले पाहिजे ?

## प्रकरण २७

१. कस्तुरबाईंनी पंचम जातीतील पाहुण्याचे लघवीचे भांडे उचलण्यास नकार दिल्याने गांधीजी आणि कस्तुरबा यांच्यामध्ये झालेल्या भांडणाचे वर्णन करा.

२. या गोष्टीवरून तुम्ही काय शिकलात ? समोरच्याचे सहकार्य प्राप्त करण्यासाठी काय केले पाहिजे ?

**प्रकरण २८**

१. बोअर युद्धाच्या वेळी गांधीजींनी ब्रिटीशांना कशा प्रकारे मदत केली ? त्यांनी ही मदत का केली?

**प्रकरण २९**

१. गांधीजींनी किमती भेटवस्तू घेण्याचे का नाकारले ?

२. दागिने न स्वीकारण्याच्या गांधीजींच्या मताशी तुम्ही सहमत आहात का ? दागिने का वापरावेत आणि का वापरू नयेत? कारणे द्या.

**प्रकरण ३०**

१. गांधीजींचे पहिल्या महासभेतील अनुभव तुमच्या शब्दांत मांडा.

**प्रकरण ३३**

१. गांधीजींनी गीतेतील श्लोक कशा प्रकारे पाठ केले?

२. गीतेत सांगितलेल्या अपरिग्रहाचा गांधीजींवर कशा प्रकारे परिणाम झाला ?

**प्रकरण ३४**

१. रस्किन यांच्या 'अनटु धिस लास्ट' या पुस्तकाचा गांधीजींवर कसा परिणाम झाला ?

२. या सगळ्या गोष्टी त्यांनी पुढील आयुष्यात कशा प्रकारे अमलात आणल्या ?

**प्रकरण ३६**

१. ‘झुलू बंडा'च्या वेळी गांधीजींनी कोणत्या प्रकारचे कार्य केले ?

२. त्यांचा हा अनुभव त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी आला असे म्हणता येईल का ? कशा प्रकारे ? त्यांनी आश्रमात केलेल्या कार्यावरून स्पष्ट करा.

### प्रकरण ३७

१. कस्तुरबा यांनी मांसाचे सूप घेण्यास कशा प्रकारे नकार दिला आणि त्यात गांधीजींचा सहभाग कशा प्रकारे होता ?

### प्रकरण ३८

१. समोरच्याचे मन वळविण्यासाठी स्वतः त्रास सहन करणे याला सत्याग्रह म्हटले, तर गांधीजींनी कस्तुरबांना मीठ आणि कडधान्ये सोडायला लावली, यामध्ये कशा प्रकारे सत्याग्रह होता, सांगा.

२. तुम्ही अशा प्रकारच्या सत्याग्रहात सहभागी झाला आहात का ? त्यात तुम्हाला कितपत यश मिळाले ?

### प्रकरण ३९

१. शांततेच्या मार्गाने प्रतिकार करण्याच्या या चळवळीला गांधीजींनी सत्याग्रह हे नाव का दिले ? त्याआधी दिले गेलेले पॅसिव्ह रेझिस्टन्स हे नाव का बदलले ?

### प्रकरण ४०

१. एशियाटिक रजिस्ट्रेशन अॅक्टच्या विरोधात कशा प्रकारे सत्याग्रह करण्यात आला ? त्याचा परिणाम काय झाला ?

### प्रकरण ४१

१. मीर आलमने गांधीजींवर केलेल्या हल्ल्याचे वर्णन करा.

२. मीर आलमला शिक्षा व्हावी असे गांधीजींना का वाटत नव्हते ? गांधीजींच्या या दयाळूपणाचा त्याच्यावर काय परिणाम झाला असावा, असे तुम्हाला वाटते ?

### प्रकरण ४२

१. गांधीजींनी एशियाटिक रजिस्ट्रेशन अॅक्टविरोधात सत्याग्रह का केला ?

२. परवाने जाळण्याच्या प्रसंगी काय घडले ?

३. शेवटी सरकारलाच नमते घ्यायला लावणाऱ्या गांधीजींनी सत्याग्रहाचा लढा कशा प्रकारे लढला ?

४. या लढ्यातील विविध टप्प्यांचे वर्णन करा.

**प्रकरण ४५**

१. अंत्यजांना आश्रमात प्रवेश देताना गांधीजींना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले आणि त्यांनी कसे तोंड दिले ?

२. अशा प्रकारची अस्पृश्यता पाळणे योग्य आहे का ? कारणे द्या.

३. भारतातील विविध भाषा बोलणाऱ्या, विविध जाती आणि पंथांच्या लोकांमध्ये एकीची भावना निर्माण करण्यासाठी काय करायला हवे ?

४. अशी समस्या तुमच्या घरी उद्‌भवल्यास तुम्ही काय कराल ?

**प्रकरण ४७**

१. गांधीजींनी चंपारण्यातील निळीच्या मालकांची सत्ता कशी नाहीशी केली ?

२. या प्रक्रियेचा सत्याग्रहाच्या दृष्टीकोनातून विचार करा आणि ती कशी यशस्वी ठरली ते सांगा.

**प्रकरण ४८**

१. गांधीजींच्या मते कामगारांनी कशा प्रकारे संप केला पाहिजे, तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

२. अहमदाबादच्या सत्याग्रहाच्या वेळी गांधीजींनी उपवास का केला ?

३. तो वाद मिटण्यामध्ये गांधीजींच्या उपवासाची कशा प्रकारे मदत झाली ?

४. तो उपवास एक प्रकारे सत्याग्रहच होता, हे स्पष्ट करा.

## प्रकरण ४९

१. खेडा सत्याग्रहाची गोष्ट सांगा.

## प्रकरण ५०

१. गांधीजींनी बकरीचे दूध घेण्यास कशा प्रकारे सुरुवात केली ?

२. गाईंची हत्या थांबविणे, हा गाईंचे रक्षण करण्याचा एक मार्ग आहे. इतर कोणत्या मार्गांनी गाईंचे रक्षण करता येईल ?

## प्रकरण ५१

१. गांधीजींनी रौलॅट ॲक्टविरुद्ध हरताळ पाळला आणि त्यानंतर तो स्थगित केला. गांधीजींनी असे का केले ?

२. या पुस्तकात दिलेल्या सत्याग्रहांच्या उदाहरणांवरून सत्याग्रहासाठी कोणती गोष्ट मुख्यत : आवश्यक आहे, तुम्ही सांगू शकता का ?

## प्रकरण ५२

१. आश्रमात सुरुवातीला गांधीजींना हाताने सूत कातताना आणि कापूस पिंजताना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले ?

२. गांधीजींनी हाताने सूत कातण्यावर आणि विणण्यावर अधिक भर का दिला ? गिरणीमध्ये तयार झालेले कापड त्यांना का पसंत नव्हते ?

३. मिल उद्योग विरुद्ध गृहउद्योगाचे फायदे व तोटे सांगा आणि आपल्या देशाच्या उत्कर्षासाठी यांपैकी आपण काय पसंत कराल? ते कारणांसहित सांगा.

* * * * *